सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ०३ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३०९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## प्रयागराजमध्ये उद्या होणार तिसरे अमृत स्नान!



प्रयागराज : प्रयागराज येथे सुरु असलेल्या महाकुंभात तिसरे पवित्र अमृत स्नानाचे आयोजन वसंत पंचमीनिमित्त सोमवारी पहाटे ५ वाजून २३ मिनिट ते ६ वाजून १६ मिनिटं या वेळेत करण्यात आले आहे. या पर्वात सहभागी होण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यासह जगभरातून रोज कोटीच्या संख्येने भाविक आज दुपारपासून मोठ्या संख्येने याठिकाणी येत आहेत. त्रिवेणी संगमात कोट्यवधी लोकांकडून आस्थेची डुबकी घेतली जाते. महाकुंभात पहिले अमृत स्नान मकर संक्रांतीच्या दिवशी संपन्न झाले. तर दुसरे अमृत स्नान मौनी अमावस्येदिवशी पार पडले. तर आता पुढचे तिसरे अमृत स्नान वसंत पंचमीच्या निमित्ताने होणार आहे.

भाविकांच्या सुरक्षेसह अन्य कोणत्याही पातळीवर चुकीला वाव नको - मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ

वसंत पंचमीच्या अमृत स्नानाच्या पर्वात भाविकांना सुरक्षित स्नान करण्यासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. त्यानुसार संगम तटावर २८ मोक्याची ठिकाणे बनविण्यात आली आहेत. या ठिकाणी पोलिसांसोबतच आरएएफ आणि पॅरामिलेट्रीचे जवान यांची संयुक्त टीम घटनास्थळी तैनात असेल. पंचमी स्नान महोत्सवात कोणतीही त्रुटी न ठेवता व्यवस्था करण्याचे निर्देश यावेळी योगी आदित्यनाथ यांनी दिले. या प्रसंगी आखाड्यांची पारंपारिक मिरवणूक काढली जाईल. तत्पूर्वी संत, कल्पवासी, भक्त आणि पर्यटकांची सुरक्षा आणि सुविधा सुनिश्चित केली पाहिजे. कोणत्याही पातळीवर चुकीला वाव असता कामा नये, असे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.महाकुंभ मेळा परिसरातील पार्किंगची जागा वाढवावी. भाविकांना शक्य तितके कमी चालावे लागेल, अशी व्यवस्था करा. महत्त्वाच्या ठिकाणी वाहतूक व्यवस्थापनाची जबाबदारी सुनिश्चित करण्याचे निर्देश त्यांनी पोलीस अधीक्षक स्तरावरील अधिकाऱ्यांना दिले.

महाकुंभ' चेंगराचेंगरी प्रकरण : सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी

प्रयागराज महाकुंभ मेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीप्रमणी दाखल जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालय सोमवारी सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटनुसार, ही जनहित याचिका ३ फेब्रुवारीसाठी सूचीबद्ध करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात २९ जानेवारी रोजी झालेल्या चेंगराचेंगरीत किमान ३० जणांचा मृत्यू झाला होता आणि ६० जण जखमी झाले होते. या दुर्घटनेला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. सर्व राज्यांना प्रयागराजमधील त्यांच्या सुविधा केंद्रांमध्ये भाविकांना सुरक्षा उपाय आणि मार्गदर्शक तत्त्वांबद्दल मूलभूत माहिती देण्याचे निर्देश देण्यात यावेत,अशी मागणी करणारी जनहित याचिका वकील विशाल तिवारी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड केलेल्या खटल्यांच्या यादीनुसार, मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांचे खंडपीठ ३ फेब्रुवारी तिवारी यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी होण्याची शक्यता आहे.

## अर्थसंकल्पावरून पंतप्रधानांनी काँग्रेस आणि आम आदमी पक्षाला डिवचले

दिल्ली : भारताच्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल (दि १) रोजी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात सर्वसामान्यांना दिलासा देणाऱ्या घोषणा केल्या.

बारा लाखापर्यंतचे उत्पन्न आयकर मुक्त झाल्याने प्रत्येक घराघरात 'लक्ष्मी येती घरा तोचि दिवाळी दसरा' अशी भावना निर्माण झाली. अशातच आता नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत होणाऱ्या निवडणुकांचा प्रचार करण्यासाठी घेतलेल्या सभेत काँग्रेसला आणि आम आदमी पक्षाला टोला लगावलाय.

पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीत होणाऱ्या निवडणुक प्रचार सभेत म्हणाले जर नेहरू यांची सत्ता असती तर १२ लाख रुपयांवर एक चतुर्थांश कर द्यावं लागत होतं. तर इंदिरा गांधी यांची सत्ता असती तर १२ लाख रुपयांवर १० लाख रुपये कर रुपात सरकारला द्यावे लागले असते. दहा ते १२ वर्षांपूर्वी जर तुम्ही काँग्रेस सरकारच्या काळात १२ लाख रुपये कमावले असते तर तुम्हाला २ लाख ६० हजार रुपये कर भरावा लागला असता.

काँग्रेस सरकार आपली तिजोरी भरण्यासाठी कर आकारायची. पण भाजपच्या काळात तुम्हाला १२ लाख रुपयांच्या कमाईवर एकही रुपयाचा टॅक्सही लागणार नाहीये. शनिवारी सादर झालेला बजेट हा गरिबांसाठी होता, असं पंतप्रधान मोदी म्हणालेत.

दरम्यान काल सादर झालेल्या अर्थसंकल्पाचं प्रत्येक स्तरावर स्वागत केले जात आहे.

## डोकं लावा, अर्थसंकल्प समजेल : देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थसंकल्प विरोधकांना समजला नाही, थोडं डोकं लावलं तर अर्थसंकल्प समजेल असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला. उखळाई मंदिराच्या कलशारोहण सोहळ्यासाठी ते हदगाव येथे आले असता पत्रकारांशी बोलत होते.



यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नुकताच सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प मध्यमवर्गीयांसाठी आनंदाचा असल्याची चर्चा होत असतानाच या अर्थसंकल्पावर विरोधकांकडून टीका करण्यात येत आहे. परंतु विरोधकांना हा अर्थसंकल्प समजलाच नाही. डोकं लावलं तर अर्थसंकल्प समजेल असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना लगावला.

गडचिरोली जिल्ह्यात माओवाद्याकडून माजी सभापतीची हत्या करण्यात आली आहे. याविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माओवादी सध्या शेवटच्या घटका मोजत असून अनेक माओवादी शरण येत आहे. यामुळे माओवाद्यांमध्ये नैराश्य पसरले असून या नरेशातूनच माजी सभापतीची हत्या करण्यात आली असावी परंतु या हत्येचा जाब विचारण्यात येणार असून येत्या महिन्याभरात कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. तसेच शक्तीपीठ महामार्गाला केवळ काही मुठभर लोकांचा विरोध आहे. येत्या काही दिवसात कृती समिती भेट घेणार असून त्यांचाही शक्तीपीठ महामार्गाला विरोध नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

## नाशिकहून सुरतच्या दिशेने जाणाऱ्या बसचा भीषण अपघात!

सुरत : सुरतमध्ये भीषण अपघात घडला आहे. बोरगाव-सापुतारा राष्ट्रीय महामार्गावरील माळेगावच्या घाटात रविवारी पहाटे चार ते साडेचारच्या दरम्यान नाशिक मधून गुजरात राज्यात जाणाऱ्या खासगी बस चालकाचे बस वरील नियंत्रण सुटल्याने बस उलटली. यात पाच प्रवासी मृत्यूमुखी झाले असून ४५ प्रवासी जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळाल्यानंतर तातडीने या ठिकाणी ग्रामस्थांच्या मदतीने बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे .

सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे मध्य प्रदेश येथून चार धाम यात्रा करण्यासाठी निघालेली बस गुजरात राज्यातील माळेगावच्या घाटात पलटी झाल्याने यामध्ये रतनलाल देविराम जातव(४१), बोलाराम पोसाराम कुसवा (५५), गुहीबेन राजेशभाई यादव (६०), बिजेंद्र बादल यादव (५५), कमलेश भाई यादव (६०, सर्व राहणार मध्यप्रदेश) यांचा मृत्यू झाला आहे.

बसमधील जखमी २१ प्रवासी यांना शामगव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तर गंभीर जखमी २४ यांना अहावा येथे दाखल करण्यात आले आहे. ही बस ज्यावेळी दरीमध्ये कोसळली त्यावेळी बसचे अक्षरशः दोन तुकडे झाले असल्याचं प्रथमदर्शनी असलेल्या नागरिकांनी सांगितले. असे असले तरी अपघाताचे कारण अद्यापही अस्पष्टच.

## इंद्रायणी नदी फेसाळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण!

### नदीत पाणी सोडणाऱ्यांवर कारवाईची मागणी

पुणे : राज्यभरात एकीकडे गुलेन बॅरी सिंड्रोमच्या रूग्णसंख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होताना दिसत आहे. तर दुसरीकडे ज्या भागात जास्त प्रमाणात रूग्ण आढळून येत आहेत. त्या भागातील पाण्याची तपासणी केली जात आहे, अनेक भागात दुषित पाणी आढळून येत आहे. तर दुसरीकडे गेल्या काही दिवसांपासून पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जीबीएसचे रुग्ण आढळून येत असताना इंद्रायणी नदी मधील पाणी फेसाळल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरात गुलेन बॅरी सिंड्रोमचे सावट असतानाच लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेले आळंदी मधील पवित्र इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली असल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून इंद्रायणी नदी ही वारंवार फेसाळत आहे. इंद्रायणी नदी फेसाळल्यामुळे आळंदीतील नागरिक आणि वारकऱ्यांच्या जीवाची खेळ सुरू असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. पिंपरी चिंचवड मधील अवैधरित्या चालणाऱ्या कंपन्या या इंद्रायणी नदीत रसायन युक्त पाणी सोडतात आणि नदी प्रदूषित करतात मात्र किरकोळ कारवाई करून संबंधित कंपन्यांना अभय दिले जाते आहे. त्यामुळे असे पाणी नदीत सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

राज्यातील एकूण रुग्णसंख्या ही आता १४० वरती पोहचली आहे. यापैकी ७८ रुग्ण पुणे महापालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील आहेत. उर्वरित २६ रुग्ण पुणे महापालिका, १५ पिंपरी-चिंचवड महापालिका, १० रुग्ण पुणे ग्रामीणमधील आहेत. इतर जिल्ह्यांमधील रुग्णसंख्या ११ आहे. एकूण रुग्णांपैकी ४५ रुग्ण अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत, तर १८ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. आत्तापर्यंत २५ रुग्णांना घरी सोडण्यात आले आहे. तर मृतांची संख्या पाचवरती पोहोचली आहे.

## सचिन तेंडुलकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

### बुमराह-मंधानाचा सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून सन्मान, रविचंद्रन अश्विनला विशेष पुरस्कार प्रदान

मुंबई : मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला कर्नल सीके नायडू जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सचिन तेंडुलकरने हा पुरस्कार स्वीकारताना बीसीसीआयचे आभार मानले. मुंबईत बीसीसीआयच्या नमन पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यासाठी भारताचे अनेक आजी-माजी खेळाडू उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात २०२३-२४ या मोसमात आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेट गाजवणाऱ्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला.



सचिनला आयसीसीचे अध्यक्ष आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष जय शाह यांच्याकडून हा खास पुरस्कार प्रदान करण्यात आला. सचिनला हा खास पुरस्कार देताना सर्व उपस्थितांनी उभं राहून त्याचे कौतुक केलं. याशिवाय बीसीसीआयने सचिनसाठी एक खास व्हीडिओ देखील तयार केला होता. जो पुरस्कार प्रदान करण्यापूर्वी दाखवण्यात आला. यावेळी त्याने जुन्या आठवणींना उजाळा दिला.

भारत आणि इंग्लंड संघात रविवारी (२ फेब्रुवारी) मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर टी२० मालिकेतील शेवटचा सामना होणार आहे. त्यामुळे दोन्ही संघ मुंबईत असल्याने या दोन्ही संघातील सदस्यही पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी उपस्थित होते.

सचिनची कारकीर्द

वयाच्या १६ व्या वर्षी १९८९ मध्ये पाकिस्तानमध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण करणाऱ्या सचिनने दोन दशके भारतीय क्रिकेटची सेवा केलेली आहे. २०११ मध्ये मायदेशात आणि तेही मुंबईत त्याचे विश्वविजेतेपदाचे स्वप्न साकार झाले होते. याच मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा निरोपही घेतला होता.

सचिनने २०० कसोटींसह एकूण ६६४ आंतरराष्ट्रीय सामने खेळणाऱ्या सचिनच्या नावावर विक्रमांचेही विक्रम झालेले आहेत. कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा असे विक्रम त्याच्या नावावर आहेत. २०० कसोटी आणि ४६३ एकदिवसीय सामने खेळणाऱ्या सचिनने यात अनुक्रमे १५,९२१ आणि १८,४२६ धावा केलेल्या आहेत; मात्र त्याच्या नावावर एकमेव ट्वेन्टी-२० सामना आहे.

बीसीसीआयने वार्षिक पुरस्कार सोहळ्यात मागच्या वर्षी चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सन्मान केला. यावेळी जसप्रीत बुमराह आणि स्मृती मंधाना यांना सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून सन्मान करण्यात आला. रविचंद्रन अश्विनला विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. सर्फराज खानला सर्वोत्कृष्ट मेन्स डेब्यू तर आशा शोभनाला सर्वोत्कृष्ट महिला डेब्यू पुरस्कार मिळाला. महिला क्रिकेटमध्ये मंधाना सर्वोत्तम फलंदाज आणि दीप्ती शर्मा सर्वोत्तम गोलंदाज ठरली. देशांतर्गत क्रिकेटमध्ये शशांक सिंगला सर्वोत्कृष्ट व्हाईट बॉल अष्टपैलू खेळाडू आणि तनुष कोटियनला रेड बॉल सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.

### बीसीसीआयचे पुरस्कार विजेते खेळाडू

सी. के. नायुडू जीवनगौरव पुरस्कार - सचिन तेंडुलकर, पॉली उम्रीगर ट्रॉफी (सर्वोत्तम पुरुष क्रिकेटपटू) - जसप्रीत बुमराह, सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू - स्मृती मानधना, आंतरराष्ट्रीय वनडेत सर्वाधिक विकेट्स (महिला) - दिप्ती शर्मा (६ सामन्यांत १३ विकेट्स), आंतरराष्ट्रीय वनडेत सर्वाधिक धावा (महिला) - स्मृती मानधना (१३ सामन्यांत ७४७ धावा), सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय पदार्पण पुरुष - सर्फराज खान, सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय पदार्पण महिला - आशा शोभना, बीसीसीआय विशेष पुरस्कार - आर अश्विन, एमए चिदंबरम ट्रॉफी (U19 कुच बिहार ट्रॉफी सर्वाधिक विकेट्स)- विष्णू भारद्वाज, एमए चिदंबरम ट्रॉफी (U19 कुच बिहार ट्रॉफी सर्वाधिक धावा) - काव्या तेवोतिया, जगमोहन दालमिया ट्रॉफी (सर्वोत्तम महिला ज्यूनियर देशांतर्गत क्रिकेटपटू) - ईश्वरी अवसरे, जगमोहन दालमिया ट्रॉफी (सर्वोत्तम महिला सिनियर देशांतर्गत वनडे क्रिकेटपटू) - प्रिया मिश्रा, जगमोहन दालमिया ट्रॉफी (U16 विजय मर्चंड ट्रॉफी सर्वाधिक विकेट्स) - एच जगनाथ, जगमोहन दालमिया ट्रॉफी (U16 विजय मर्चंड ट्रॉफी सर्वाधिक धावा) - एल रायचंदानी, एमए चिदंबरम ट्रॉफी (U23 कर्नल सीके नायडू ट्रॉफी सर्वाधिक विकेट्स प्लेट ग्रुप) - नेईझेको रुप्रओ


## पंढरपुरात रंगला विठ्ठल रुक्मिणी मातेचा विवाह सोहळा!

पंढरपूर : दरवर्षी वसंत पंचमीच्या मुहूर्तावर पंढरपुरात विठ्ठल रुक्मिणीचा विवाह सोहळा पार पडतो. त्याप्रमाणे वसंत पंचमीमिनित्त आज विठ्ठल रुक्मिणी मातेचा सोहळा पार पडला आहे. आज सकाळी १० ते १२ वाजेच्या सुमारास लाखो भक्तांच्या हजेरीत हा सोहळा पार पडला. विवाह सोहळ्यासाठी बंगळूरहून विठ्ठल रुक्मिणीसाठी विशेष पोशाख शिवण्यात आला होता. विवाह सोहळ्यापूर्वी सकाळी काकड आरतीदरम्यान विठ्ठलाला पांढऱ्या रंगाचे वस्त्र परिधान करण्यात आले असून सोन्याच्या मुकुटाऐवजी पांढरे पागोटे घालण्यात आले होते.

## बिडकीन ते दहिगाव रोडवरील गिधाडा येथे ९० वर्षीय वृद्धाला ट्रकने उडवून मृत्यू

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील गिधाडा या गावातील रहिवासी रसूल हुसेन सय्यद ,वय ९० रा. गिधाडा हे दि.१ फेब्रुवारी रोजी दुपारी साडे चार वाजेदर्म्यान रस्ता ओलांडून पायी जात असताना बिडकीन कडून दहेगाव कडे जात असलेली भरधाव ट्रक क्रमांक एम एच ५० १८५७ हिने वयोवृद्ध रसूल हुसेन सय्यद यांना समोरासमोर उडवून देऊन त्यामध्ये रसूल यांच्या उजव्या पायावरून चाक गेल्याने चेंदामेंदा होउन त्यामध्ये रस्त्यावर मोठा रक्तस्त्राव होऊन गंभीर जख्मी झाले.



जखमी रसूल यांना गावातली नागरिकांनी व नातेवाईकांनी ग्रामीण रूग्णालय बिडकीन येथे उपचारासाठी आणले असता यांच्यावर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात संध्यकाळी सहा वाजेदर्म्यान दाखल करण्यात आले होते ,रात्री साडे आठच्या सुमारास उपचारदरम्यान रसूल यांचा मृत्यू झाला त्यांचा दफन विधी दि.२ रविवार रोजी दुपारी चार वाजता झाल्यानंतर संतप्त गावकरी नातेवाईक यांनी रस्ता रोको आंदोलन करून वाहतूक कोंडी केली, रस्ता रोको आंदोलनाची माहिती बिडकीन पोलीसांनी मिळतात घटनास्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके सहपोलीसांनी धाव घेऊन आंदोलन करताना त्यांना समजावून सांगत वाहतूक सुरळीत केली. या अपघातांविषयी बिडकीन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.


केसरीच्या फेब्रुवारी-मार्च सहली म्हणजे भरपूर आनंदाची हमी!
गर्दी कमी, किंमती कमी, सिझन मस्त आणि मौज-मजा जास्त!




काश्मीरचा हिमवर्षाव की राजस्थानचं मोहक वातावरण? युरोपचं ट्युलिप की जपानचं चेरी ब्लॉसम?
जगभरात कुठेही चला. बोनान्झासह विविध ऑफर्सचा लाभ घेत पसंतीची सहल बुक करा आणि हजारो वाचवा.

अनेक डिस्काऊंट्स | मेगा डिस्काऊंट* | बोनान्झा प्राईस* | एक्स गेस्ट* | 6+ ग्रुप* | सिनीअर सिटीझन* | लास्ट मिनीट डिल्स* | 2-18 वर्षे स्टुडंट स्पेशल

स्नो स्पेशल सहली (टूर कोड दिवस)
KF 07 पॅनोरॅमिक काश्मीर वैष्णोदेवी
NR 07 दार्जिलिंग गँगटोक
KC 08 अमेझिंग काश्मीर वैष्णोदेवी
Y3 08 शिमला मनाली - हनिमून
HG 08 डलहौसी धरमशाला अमृतसर
NF 08 नैनिताल मसूरी कॉर्बेट पार्क
KB 09 ऑल ऑफ काश्मीर रॅडिसनसह
NO 11 ऑल ऑफ सिक्कीम दार्जिलिंग
NT 12 अमेझिंग नॉर्थ ईस्ट

ट्युलिप - चेरी ब्लॉसम (टूर कोड दिवस)
JF 08 जपान चेरी ब्लॉसम
JK 09 जपान कोरिया
EQ 09 पॅरिस ब्रुसेल्स ॲमस्टरडॅम गिथॉर्न लुक्झेम्बर्ग
P8 10 युरोप लेक लुगानो
P7 12 इमेजेस ऑफ युरोप
E7 12 एंटायसिंग युरोप
E6 14 बेस्ट ऑफ युरोप
E4 16 वंडर्स ऑफ युरोप
E1 22 ऑल ऑफ युरोप

इझी व्हिसा सहली (टूर कोड दिवस)
FT 06 थायलँड
M1 06 मॉरिशस
FY 07 फुकेत क्राबी बँकॉक
FH 07 हाँगकाँग शेन्झेन मकाऊ
FD 07 बेस्ट ऑफ व्हिएतनाम
MS 08 श्रीलंका
NP 08 नेपाळ
NZ 10 भूतान
FV 10 व्हिएतनाम कंबोडिया

वुमेन्स स्पेशल माय फेअर लेडी (टूर कोड दिवस)
L9 06 नैनिताल कॉर्बेट पार्क
L2 07 काश्मीर
L4 07 लखनौ अयोध्या प्रयागराज वाराणसी
LH 07 लेह लडाख
LP 08 नेपाळ
LJ 08 जपान चेरी ब्लॉसम
L1 08 शिमला मनाली
LL 09 लेह लडाख कारगिल
LE 14 युरोप

इंटरनॅशनल सहली (टूर कोड दिवस)
WS 05 सिंगापूर
F8 06 सिंगापूर मलेशिया
D1 07 दुबई अबूधाबी
JS 08 क्लासिक साऊथ कोरिया
AI 08 फन फिल्ड ऑस्ट्रेलिया
VE 09 इजिप्त हूरघडा
F2 10 सिंगापूर थायलँड मलेशिया
AN 11 ऑल ऑफ न्यूझीलँड
EU 13 इजिप्त ग्रीस टर्की

लास्ट चान्स सहली (टूर कोड दिवस)
WA 04 अमृतसर
WX 05 पुरी भुवनेश्वर चिलिका
SM 05 अंदमान स्वराजद्वीप
B5 06 मुन्नार पेरियार अलेप्पी
RC 07 राजस्थान मारवाड
RF 07 राजस्थान मेवाड माऊंट अबू
SF 08 केरळ कन्याकुमारी
SC 10 केरळ कन्याकुमारी गुरुवायूर
OS 12 श्रीकृष्ण चरित्र यात्रा

PZ 07 अझरबैजान जॉर्जिया 1,55,000*
VU 07 ट्युनिशिया स्पेशल 2,10,000*
PR 08 रशिया मुर्मन्स्क नॉर्दर्न लाईट्स 2,40,000*
अधिक माहितीसाठी QR स्कॅन करा
T & C Apply*

9167 835 071 | 1800 266 1100
सोमवार ते शनिवार 10 ते 7. रविवार 6 पर्यंत.
मुंबई 022-61744100 | विलेपार्ले 7045 23 4545 | बोरीवली 022 69582200 | वसई 7045 00 0031
ठाणे 022-69721100 | डोंबिवली 7045 00 0041 | वाशी 022-69462222 | नाशिक 0253-6914444
पुणे 020-66465555 | बाणेर 020-69101234 | नागपूर 0712-6921717 | कोल्हापूर 0231-2533222
छत्रपती संभाजीनगर चेतना नगर 9822 26 7567 | सिडको 9960 08 2472 | परभणी 9422 17 6466
गरखेडा जालना धाराशिव
KESARI.in



# समतेची माघवारी





तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
सोमवार, दि. ०३ फेब्रुवारी २०२५

**सोलापूर शहर व जिल्ह्यातील माघवारीला जाणाऱ्या सर्व दिंडीचे एकत्रीकरण अखिल भाविक वारकरी मंडळ यांच्या माध्यमातून २००९ रोजी करून प्रस्थान व रिंगण सोहळा सुरु करण्यात आला आहे. माघ शुद्ध षष्टीला श्री मार्कंडेय मंदिर, पंचकट्टा सोलापूर येथे दु. ४.00 वा. केले जात आहे. वारकरी प्रथे प्रमाणे नित्य नियमाचे अभंग व भजन केले जात आहे. त्यावेळी जे उपस्थित सर्व दिंडीतील विणेकरी महाराज व पदाधिकारी यांचा श्री सुरेश फलमारी पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर यांच्याकडून सन्मान केला जातो. नंतर हा पालखी सोहळा 'ज्ञानोबा तुकाराम' असे भजन करत नॉर्थकोट प्रशाला मैदान, सोलापूर येथे पोहोचतो आणि नंतर मान्यवर मंडळींच्या हस्ते अश्वपूजन केले जाते व मान्यवरांचा सन्मान केला जातो.**

## सोलापूरचा ऐतिहासिक माघवारी

# गोलरिंगण सोहळा



तद्नंतर गोल रिंगण केले जाते. आषाढीवारी नंतर वारी परंपरेमध्ये फक्त माघवारीला सोलापूर येथे रिंगण सोहळा होतो, हे ऐतिहासिक आहे. शहरातील सर्व भागातील व सर्व समाजाच्या दिंडीला एकत्रित केले असून हा सोहळा एक परंपरा ठरत आहे. ज्या भाविकांना आषाढीवारी मध्ये जाऊन रिंगण पाहता येत नव्हते. त्या सर्व भाविकांना गोल रिंगण सोहळा सोलापूर शहरामध्ये ''याची देही याची डोळा'' अनुभवता येत आहे. हे सोलापूर भाविकांचे परम भाग्य आहे. शहरातील सर्व दिंडी प्रमुख व पदाधिकारी यांच्या प्रयत्नाने हे यश प्राप्त झाले आहे. नंतर हा सोहळा श्री महादेव मंदिर साठे चाळ, सोलापूर येथे पोहोचतो व नंतर आरती करून समारोप केला जातो .महादेव मंदिर भजनी मंडळ साठे चाळ यांचे कडून व्यवस्थापन केले जाते. यामध्ये शहरातील ३८ ईतर परिसरातील २५ दिंडी सहभागी होतात. शहरातील सर्व दिंडीला सो. म. पा. सोलापूर तर्फे वीणा भेट देऊन सन्मान करण्यात आला आहे. हा सोहळा पाहण्यासाठी हजारो महिला व पुरुष भाविक उपस्थित राहतात.





हभप सुधाकर महाराज इंगळे



हभप संजय महाराज



हभप ज्योतीराम महाराज



हभप बळीराम महाराज

सोलापूर शहरातून तिऱ्हेमार्गे पंढरपूर जाणाऱ्या २३ दिंडी एकत्रित करून त्यामार्गे ही माघवारीतील दुसरे गोल रिंगण माघ शुद्ध अष्टमीला स. ९.३० वा. पाटकर वस्ती, कुरुल ता. मोहोळ येथे केले जात आहे. कुरुल ग्रामस्थ हे यजमान असतात. मोहोळ मार्गे जाणाऱ्या दिंडीतील व माघवारी तिसरे गोल रिंगण महात्मा गांधी विद्यालय, पेनूर येथे केले जात आहे. त्यासाठी पेनूर ग्रामस्थ यजमान असतात. चौथे गोल रिंगण माघ शुद्ध नवमीला सुस्ते ग्रामस्थ यांचे माध्यमातून श्री दत्त विद्यालय, सुस्ते ता. पंढरपूर येथे होत आहे. तसेच माघ शुद्ध दशमीला स. ९.३० वा. जलाराम मठा समोर, पंढरपूर येथे उभे रिंगण केले जाते. तसेच सुधाकर इंगळे महाराज (राष्ट्रीय अध्यक्ष ) यांच्या मार्गदर्शनाने संपन्न होत असून या सर्व कार्यक्रमासाठी जोतिराम चांगभले (प्रदेशअध्यक्ष ), बळीराम जांभळे (राष्ट्रीय सचिव), किसन कापसे (प्रदेश उपाध्यक्ष ), मोहन शेळके (प्रदेश सचिव), बंडोपंत कुलकर्णी (जिल्हा अध्यक्ष ), संजय पवार (शहरअध्यक्ष ), सचिन गायकवाड (शहर उपाध्यक्ष) व सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आसतात .

**- हभप सुधाकर इंगळे महाराज,**
**राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय वारकरी मंडळ, सोलापूर**

रिंगण सोहळ्याचे यंदा १३ वे वर्ष असून या सोहळ्यामध्ये महिलांचा सहभाग अधिक असतो. रिंगण आखताना आतल्या बाजूला एक गोल रिंगण आणि बाहेरच्या बाजूला एक गोल रिंगण केलेला असतं. आतील रिंगणामध्ये सर्व दिंडी प्रमुख, विणेकरी, पखवाज, तुळशी-टाळ घेतलेल्या महिला असतात. आतील रिंगणामध्य नामाचा गजर करत पाऊल खेळला जातो. बाहेरच्या रिंगणाच्या बाजूला भाविक अश्व पाहण्यासाठी, दर्शन घेण्यासाठी थांबतात. रिंगणामध्ये सुरुवातीला धावपट्टीवरून ध्वजधारी वारकरी भाविक धावतात. त्यानंतर पखवाजवादक वारकरी धावतात, त्यानंतर चोपदार, विणेकरी धावतात. त्यानंतर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला भाविकही या रिंगणात प्रामुख्याने धावतात. त्यानंतरन मुख्य अश्वाचे रिंगण पूर्ण होतं आणि अश्वाच्या पायाखालची धूळ कपाळाला लावून वारकरी धन्य मानतो, अशा पद्धतीने रिंगण सोहळा पूर्ण होतो. रिंगण आखण्यासाठी महिलांचे सहकार्य लाभते. त्याच पद्धतीने विष्णुपंत मोरे अजय मोरे अनिकेत जांभळे चैतन्य मोरे यांचे ही सहकार्य लाभते.

**- बळीराम जांभळे,**
**राष्ट्रीय सचिव, अखिल भारतीय वारकरी मंडळ, सोलापूर**

## माघवारीनिमित्त सोलापूर शहरातून निघणाऱ्या विविध दिंड्या

### श्री संत हरळया समाजसेवा भजनी मंडळ जोड भावी पेठ (खणि)

आमच्या समाजात हनुमान मंदिर आहे त्यामध्ये विठ्ठल रुक्मिणी मूर्ती व शिवलिंग आहे सालाबाद प्रमाणे आम्ही १९९३ पासून मागवारी दिंडी निवृत्ती महाराज यांच्या नेतृत्व खाली सुरुवात केली झाल्यावर मारुती मंदिरात नित्यनेम पूजा अर्चना होते तसेच वारीच्या जमा रकमेतून वर्षभरातील देवाची जयंती संतांच्या पुण्यतिथी सोहळा करत असतो. महाशिवरात्री रामनवमी श्रीकृष्ण जन्माष्टमी सप्ताह करत असतो. माघवारी दिंडीत १००० ते १२०० भाविक सहभागी होतात.३२ वर्षापासून दिंडी प्रमुख म्हणून नागनाथ महाराज शिंदे काम पाहतात.

**- नागनाथ महाराज शिंदे,**
**दिंडी प्रमुख विणेकरी**

## श्री संत मुक्ताई मंडळ

श्री संत मुक्ताई मंडळाची स्थापना १९८० साली ह.भ.प अनंत महाराज इंगळे यांनी केली. माघवारी निमित्त सोलापूर येथून संत मुक्ताई पालखी पायी दिंडी सोहळा सुरु केला . यामंडळाचे माध्यमातून अनेक कीर्तनकार तयार केले. प्रत्येक तीर्थ क्षेत्रामध्ये नाम सप्ताह करून वेगळी ओळख निर्माण केली . तसेच महिला प्रवचनकार ही तयार करून महिलांना सुद्धा स्वतंत्र व्यासपीठ निर्माण केले. तानाजी बेलेराव हे विणेकरी व किशोर धायगुडे हे चोपदार आहेत.

**- शंकर भोसले,**
**अध्यक्ष, श्री संत मुक्ताई मंडळ**

## हभप बाबूराव सातारकर भजनी मंडळ

श्री वैकुंठ ह भ प बाबुराव सातारकर भजनी मंडळ जुनी पोलीस लाईन मुराजी पेठ सोलापूर या भजनी मंडळाचे स्थापना १९५२ रोजी झाली. या मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह राम राम जन्मोत्सव ते हनुमान जयंती जन्मोत्सव अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो. तसेच कृष्णजन्माष्टमी हा अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो. कार्तिक महिन्यामध्ये पहाटे पाच ते सात पर्यंत काकडा आरती चालू असते व तसेच रोज सायंकाळी पाच ते सात ज्ञानेश्वरी हरिपाठ रोज केला जातो. वसंत पंचमी पांडुरंगाचे लग्न सोहळा मंदिरामध्ये साजरा केला जातो तसेच रोजची देवाची पूजा देवाची पुजारी अनंत ढेरे महाराज करतात व आठवड्यातून मंगळवार एकादशी भजन मंदिरामध्ये होत असते. माघवारी दिंडी सोहळा १९५२ पासून एकूण २०२५ अखंड सोलापूर ते पंढरपूर पायी दिंडी वारी या मंदिरामधून शंभर लोक या दिंडीमध्ये सहभागी होत असतात. रस्त्याने अन्नदान व भजन करत पंढरपूरला दशमी एकादशी धुवादस त्रियोदशीला माघारी सोलापूरला प्रस्थान होत आहे. या मंडळामध्ये सतत कार्यक्रम चालू असतात चार ते पाच ग्रंथावरची पोथी चालू असते. या मंदिरामध्ये अखंड कार्यक्रम चालू असतात या कार्यक्रमाला या मंडळाचे अध्यक्ष किसन बापू कापसे व तसेच सचिव प्रकाश गोविंद सावंत आणि गायनाचार्य दत्तोबा वाघमारे श्रीकांत भोसले अनंत आप्पा कुलकर्णी प्रदीप ज्ञानेश्वर जाधव अरुण देशमुख राजाभाऊ लांडगे विशाल जाधव विशाल पवार आदिनाथ जावळे मंडळाचे महाराज हरिभाऊ जावळे आळंदी देशमुख अनंता ढेरे महाराज यांच्या सहकार्याने या मंदिरामध्ये कार्यक्रम उत्सव सहभागी होत असतात.

**- किसनबापू कापसे, अध्यक्ष, वैकुंठवासी हभप भजनी मंडळ, जुनी पोलीस लाईन, सोलापूर**

## वडार समाज भजनी मंडळ बुधवार पेठ सोलापूर

वै. ह. भ. प. लक्ष्मण धोत्रे महाराज १९१६ साली मंडळाची स्थापना केली. आजपर्यंत माघवारी अखंडपणे अविरत सुरूच आहे, धोत्रे महाराज यांनी एकनाथ अप्पा वासकर महाराज यांच्याकडून दीक्षा घेतली. त्या फडाचे अनुयायी झाले. ते उत्तम कीर्तनकार म्हणून त्यांच्या नावाची ख्याती झाली, दिंडी ही मोहोळ मार्गे प्रस्थान करते श्री ह. भ. प सूर्यकांत धोत्रे महाराज यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ मार्गे दिंडी निघते, दिंडीचे विनेकरी नागेश पांडुरंग भांडेकर ह.भ. प निशांत धोत्रे व अभिमन्यू धोत्रे दिंडी चे चोपदार म्हणून दिंडीचे कर्तव्य बजावत असतात, आणि पखवाज वादक, श्री ह. भ. प हिरालाल कलकेरी , किरण कुलकर्णी माघ शुद्ध दशमी दिवशी वै. ह. भ. प. लक्ष्मण महाराज धोत्रे यांची पुण्यतिथी असते. त्या दिवशी श्री ह. भ. प सूर्यकांत धोत्रे महाराज यांची कीर्तनाची सेवा असते.

## हनुमान मंदिर जुनी लक्ष्मीमिल चाळ मंडळ

हनुमान मंदिर जुनी लक्ष्मी मिल चाळ डोणगाव रोड ७७ वर्षापासून माघवारी पायी दिंडी सोहळा आजतागायत सुरू आहे या दिंडी सोहळ्याची सुरुवात ह.भ.प.वै. निवृत्ती (दादा) लोंढे त्यांची आई वै. कृष्णामाई लोंढे यांनी केली त्यावेळी मिल-मधील कांही कामगारांना घेवून या दिंडी सोहळ्यास सुरुवात केली.तीर्थयात्र सुखे जावू । वाचे विठ्ठल नाम घेऊ । या विठ्ठल नामाच्या निष्ठेने दिंडी सोहळा सुरू झाला याला पुढे अनेकांचे सहकार्य लाभले. चाळीतील वारकरी ग्रामीण भागातील वारकरी अनेक जणांचा सहभाग यामधे वाढू लागला.परंतु या दिंडी सोहळ्यात ह.भ.प.वै. ज्ञानेश्वर काका लोंढे यांचा परिवार त्यांच्यामागे वै. विवेकानंद लोंढे व सध्या दिंडी प्रमुख चालक असणारे मी. गोपाळ लोंढे (सर) वामन लोंढे, चैतन्य लोंढे हे सर्व हा दिंडी सोहळा अतिशय निष्ठेने चालवत आहेत. पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थव्रत । या तुकाराम महाराजांच्या देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो अभंगाला अनुसरून अनंत समस्या अडचणींना तोंड देत परिवार ही वारी करीत आहे. त्यांना ह.भ.प. श्री रामचंद्र महाराज कोळी (धाराशिवकर) व त्यांचे भजनी मंडळ कासेगावकर भजनी मंडळ तसेच मेडसिंगा ग्रामस्थ आणि समस्त लोंढे परिवार अतिशय निष्ठेने साथ करीत आहेत.

## सद्गुरू गेनूबुवा संतसेवा मंडळ

माघवारी पायी दिंडी सोहळा वर्ष १०८, या मंडळाची सुरुवात १९१७ रोजी सद्गुरू ह.भ.प. गेनू बुवा ज्योती वाघमारे यांनी केली होती. तेव्हा पासून आत्ता पर्यंत ही परंपरा चालू आहे, यादिंडी सोहळ्यात काकडा,प्रवचन,हरी पाठ, व जागर असे कार्यक्रम असतात,शिवाय आमच्या मंडळाच्या वतीने कार्तिक स्नान काकडा आरती,,श्री राम जनमोस्त्व निमित्त गुडी पाडवा ते राम नवमी अखंड हरिनाम सप्ताह, व सर्व संताच्या पुण्यतिथी , व खूप काही सामाजिक कार्य होत असते,आता या दिंडी सोहळा चालख म्हणून मी व आमचे माता नवरात्र महोत्सव तरुण मंडळाचे कार्यकर्ते असे सर्वजण एकत्र मिळून हा दिंडी सोहळा व सप्ताह साजरा करत असतो.

## श्री हनुमान मंदिर सलगरवस्ती माघवारी दिंडी

सन १९४० मध्ये वैकुंठवासी हरिभक्त परायण निवृत्तीबुवा भोसले यांनी स्वखर्चातून मंदिर बांधून दिले व वैकुंठवासी हरिभक्त परायण कोकाटे महाराज यांनी मूर्ती भेट दिली याप्रमाणे म्हणजे स्थापना करण्यात आली. सुरुवातीच्या काळात सलगर वस्ती मधून गुरुवर्य श्री हरिभक्त परायण राशिनकर महाराज यांचे मार्गदर्शनाखाली सण १९७३ पासून माघवारी पायी दिंडी सोहळ्यास सुरुवात झाली. त्यावेळी वैकुंठवासी ह.भ.प. शामराव कारंडे गुरुजी, वैकुंठवासी ह.भ.प. रामभाऊ शिंदे, ह.भ.प. सूर्यभान चव्हाण वैकुंठवासी ह.भ.प. नागनाथ गौर, वैकुंठवासी ह.भ.प. बाबुराव दवले, यांचेसह ह.भ.प. ज्ञानेश्वर भागवत, ह.भ.प. बबन जगताप चंद्रकांत घुले, विष्णू घुले, ह.भ.प. परायण पंढरीनाथ कोकाटे, ह.भ.प. रमेश जगताप, चंद्रकांत झांबरे यांच्यासह दिंडी सोहळा चालू होता. सध्या पायी दिंडी सोहळ्याची परंपरा ह.भ.प. नारायण माने, ह.भ.प. सोमनाथ चोरमुले, ह.भ.प. तुकाराम माशाळ, ह.भ.प. सुनील चव्हाण, श्रीरामलिंग वाकसे ह.भ.प. रघुनाथ सुरवसे, ह.भ.प. ज्योतीराम चांगभले, विनोद गौर, श्रीकांत भागवत, रोहन येडगे यांनी सदरची परंपरा चालू ठेवली आहे. यादिंडी मधील वारकऱ्यांना कुठल्याही प्रकारची आर्थिक खर्च करावा लागू नये, यासाठी मंदिर समितीने सर्व वारकऱ्यांना दिंडी सोहळ्यामध्ये कुठल्याही प्रकारचा खर्च करावा लागू नये यासाठी प्रयत्न करत केले जात आहे.

## श्री कृष्ण भजनी मंडळ, निराळेवस्ती

सोलापूर श्रीकृष्ण भजनी मंडळ सोलापूर ते पंढरपूर पायीवारी दिंडी सोहळा २२ वर्षे कार्यरत आहे. या पायी दिंडी सोहळ्यामध्ये धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात आहोत. अंध व अपंग यांना आर्थिक मदत व अन्न दान करीत आहोत. हरिपाठ प्रवचन, कीर्तन, हरिजागर अनेक कीर्तनकारला सहभागी करून घेत आहोत. धार्मिक कार्यक्रमाचा प्रसार करीत आहोत. प्रत्येक युवकला कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करीत आहोत. अशी ह्या मंडळाची परंपरा जपत आहोत तसेच भागवत कथा आणि राम कथा या माध्यमातून जनजागृती करत आहोत.

**- हभपभानुदास बचुटे,**
दिंडीचालक, श्री कृष्ण भजनी मंडळ, निराळे वस्ती, सोलापूर

## श्री संत नामदेव विठ्ठल मंदिर ट्रस्ट

**हिच व्हावी माझी आस ।**
**जन्मोजन्मी तुझा दास ।।**
**पंढरीचा वारकरी ।**
**वारी चुको न दे हरी ।।**

या अभंगवानी प्रमाणे समर्थ सद्गुरू श्री विरनाथ मल्लनाथ महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज व सद्गुरू श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या आधीपत्या खाली आपल्या श्री नामदेव विठ्ठल मंदिर चा माघवारी परंपरा सन १९६१ सालापासून वै. ह. भ. प. दगडोबा बुवा होमकर व वै. ह. भ. प. शिवशंकर (आप्पा) निकते यांच्या मार्गदर्शनाने माघ वारी दिंडीची परंपरा सुरू झाली होती. विश्वस्त अध्यक्ष मुरलीधर रेळेकर तसेच संस्थेचे विश्वस्त आणि मार्गदर्शक राजा होमकर यांच्य नेतृत्वाखाली दिंडी सोहळा आयोजित केला जातो. त्यात सेवेकरी म्हणून पतंगे, रेळेकर,ढवळे, बोंडगे, पिसे, सर्वदे,बाचाल,उपरे, निकते व अनेक समाजबांधव दिंडीत सहभागी होतात. दिंडीचे नेतृत्व अरुण होमकर,अनिल बोंडगे, नामदेव बाचल हे करतात. पंढरपूर मुक्कामी वारकऱ्यांची मोफत औषध उपचारांची सेवा २५ वर्षापासून राजा होमकर यांची अखंडित चालू आहे. या परंपरेत समर्थ सद्गुरु गुरुबाबा महाराज यांचे द्वादशी चे कीर्तन संपन्न झाल्यानंतर सद्गुरूंच्या हस्ते मानाचे श्रीफळ घेवून वारकऱ्यांचा सन्मान केला जातो. त्रयोदशी दिवशी सद्गुरू गुरूबाबा यांच्या चक्रिभजनचा प्रसाद रुपी आशीर्वाद घेतात आणि श्री. विठ्ठल रुक्मिणी मातेचे मंदिरात दर्शन घेवून वारकरी परतीच्या वाटेला लागतात.

**-दास पतंगे,**
सचिव, संत नामदेव विठ्ठल मंदिर ट्रस्ट, सोलापूर

## सद्गुरू बाजीअण्णा महाराज मंडळ

स्वामी काज गुरु भक्ती पितृ वचन सेवा पती!हेची विष्णुची महापूजा!!असं तुकोबाराय सांगतात तशी विशेष गुरुभक्ती, गुरुनिष्ठा दिसून येते ती आमच्या सद्गुरू बाजी अण्णा महाराज गुरु भक्त मंडळाकडे आमच्या माघवारीची परंपरा इतकी उज्वल आहे की, जागतिक कोरोना महामारीचं संकट सुद्धा आमची वारी थांबवू शकलं नाही. त्याही काळात जाता - येता पायी वारी पूर्ण अबाधितपणे पार पडली. सोलापूरचं वारकरी वैभव ह.भ.प. सुधाकर महाराजांच्या सबळ पाठींब्यामुळे ही वारी आम्ही निष्ठेने न घाबरता पार पाडू शकलो. वारी खंडीत झाली नाही. याचा धरीन अभिमान!करीन आपुले जतन!!आताही वडजी, येणकी, सलगरवस्ती, वारद चाळ,संगमेश्वर नगर,पुणे, मुंबई ज्या ज्या ठिकाणी शिष्य सांप्रदाय आहे तिथून वारीसाठी हजर राहून वारी पार पाडली जाते.गुरुवर्य ह. भ. प. नामदेव महाराज देवकते यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व बजरंग जाधव यांच्या नेतृत्वामध्ये २०२४ पासून हा सोहळा पूर्णपणे विनामूल्य झाला आहे.फार मोठ्या वैभवामध्ये निष्ठेने वारी पार पाडण्यासाठी तरुण पिढीचं योगदान खूप मोठं आहे.देवाकडे एकच विनंती की अशी वारी आमच्याकडून आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत घडावी, पुढच्याही जन्मी याच वारकरी कुळामध्ये जन्म मिळावा व वारी चालू रहावी. पंढरीचा वारकरी, वारी चुको नेदी हरी!

**-बजरंग जाधव,**
सद्गुरु, बाजी अण्णा महाराज मंडळ

## श्री संत दिगंबर महाराज भजनी मंडळ सेटलमेंट, सोलापूर

श्री संत दिगंबर महाराज भजनी मंडळ यांच्या दिंडीची परंपरा ह.भ.प वै.विश्वास महाराज गायकवाड यांचे आजोबा वै.दिगंबर महाराज (तुळजाराम) गायकवाड यांच्या परंपरेतून विश्वास महाराज गायकवाड यांच्याकडे आली. श्रीगुरु वै.गु.दादासाहेब मफरे महाराज यांचा अनुग्रह हभप वै.विश्वास महाराज गायकवाड यांना होता. हभप वै.(तुळजाराम) दिगंबर महाराज यांनी २१ दिवस अनुष्ठान करून अनुष्ठानानंतर अन्न पाण्याचा त्याग करून त्यांनी परमार्थिक वारसा निर्माण केला. दिंडीची परंपरा चालू केली ते शिवभजन करायचे शिव भजन केल्यानंतर त्याचं सांप्रदायात रूपांतर होऊन विश्वास महाराजांनी गेल्या ७५ वर्षापासूनची दिंडीची परंपरा पुढे चालू ठेवलेली आहे. त्यानंतर स्वतः रामकृष्ण हरी मंदिर सेवा प्रतिष्ठान स्थापन करून तिथे पांडुरंग रुक्मिणी श्रीकृष्ण आणि श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून त्या दिंडीचे वैभव वाढवून स्वतःची दिगंबर महाराजांची दिंडी परंपरा चालू आहे . वडिलांची रीत जाणतसो या न्यायाप्रमाणे माझ्या वडिलांची मिरासी गा देवा तुझी चरणसेवा पांडुरंगा आज विश्वास महाराज यांचे सुपुत्र हभप सचिन महाराज गायकवाड व कनिष्ठ बंधू हभप नागनाथ महाराज गायकवाड हेही या दिंडीच्या व्यवस्थेबद्दल तत्पर असून इतर सर्व समाजाला आपल्या समाजाचा उद्धार व्हावा या दृष्टिकोनातून सेटलमेंट भागातील कैकाडी समाजाला घेऊन पंढरपूर वारी घडावी आणि भक्ती मार्गाला लावावं अशा पद्धतीची तळमळ करून विश्वास महाराजांनी चालू केलेली ही परंपरा आहे ती आज चालू आहे उत्तर उत्तर मंदिराचा सुद्धा उत्कर्ष होत आहे आणि मंदिरात नित्यनेमाने दर गुरुवारी भजन आणि दोन्ही एकादशी ,विनायक चतुर्थी असे कार्यक्रम सतत पार पडत असतात दरवर्षी देवाच्या वाढदिवसानिमित्त वार्षिक सप्ताह तुकाराम बीज ते नाथ षष्ठी पर्यंत होतो अशाच परंपरेतून उत्कर्षाकडे निघालेले हे श्री संत दिगंबर महाराज भजनी मंडळाची दिंडी संस्था सोलापूर मध्ये कार्यरत आहे.

**- हभप वै. विश्वास महाराज गायकवाड,**
संस्थापक, श्रीसंत श्री संत दिगंबर महाराज भजनी मंडळ

**संकलन : यशवंत गुरव, मो.८८८८६५०७५५**



## श्री विठ्ठल मंदिर मातंग समाज ट्रस्ट, भजनी मंडळ एसटी स्टँड

मातंग समाजातील धार्मिक परंपरा जपणाऱ्या वारकरी बांधवानी या मंदिराची स्थापना १७९४ मध्ये केली म्हणजेच २३१ वर्षांपूर्वी या मंडळाची स्थापना झाली ब्रिटिश काळापासून सोलापूर ते पंढरपूर माघारी पायी चालत जाण्याची परंपरा सुरू झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठ्या प्रमाणात याला स्वरूप प्राप्त झाले यामध्ये प्रामुख्याने ह.भ.प.परशुराम रणदिवे महाराज, ह.भ.प.मारुती साठे महाराज,ह.भ.प कृष्णाजी रणदिवे ह.भ.प.माधव वाघमारे, ह.भ. प. सिद्राम जाधव, ह.भ.प.बलभीम जाधव, ह.भ.प सौदागर कसबे,. ह.भ.प माधव जाधव,ह.भ.प.सिताराम कसबे इ. मंडळींचा सहभाग होता. कालांतराने धर्मादाय आयुक्तांकडे याची नोंद केल्यानंतर बाळकृष्ण जाधव हे चेअरमन म्हणून काम पाहू लागले. सध्या या मंडळाची धुरा ह.भ.प.नामदेव रणदिवे महाराज हे दिंडी प्रमुख व विणेकरी म्हणून दिंडी सांभाळत आहेत. चोपदार म्हणून सुरेश लोखंडे हे काम पाहतात.

**-अमरनाथ जाधव,**
**ट्रस्टी चेअरमन, श्री विठ्ठल मंदिर मातंग समाज ट्रस्ट**



## पाणीवेस भजनी मंडळ

पाणीवेस दिंडीची सुरुवात होऊन ७४ वर्षे झाली. दिंडीची सुरुवात ह. भ. प. नरहरी पौळ, ह. भ.प दगडोबा घोडके, ह.भ. प. लिंबाजी डुरे, बाबुराव डोके, बबन मोरे, सौदागर मोरे, मुकुंद देशमुख, सोपान सावंत,यांनी केली. यानंतर आता उत्तम मोरे, प्रभूभाऊ मोरे,हरी मोरे, रामदास डोके,सोमा जनगवळी, नागनाथ पवार, गणेश वारे ही परंपरा पुढे नेत आहेत. सध्या ह.भ. प. गणेश वारे हे दिंडी प्रमुख म्हणून वारसा पुढे नेत आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माता-पालक मेळाव्यामध्ये मॉंटेसोरी शाळेत 'हळदी-कुंकू' ने भरले रंग!



छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : मॉंटेसोरी बालक मंदिर, प्राथमिक विभागाच्या वतीने मकरसंक्रांतीनिमित्त शनिवार, १ फेब्रुवारी रोजी माता-पालक मेळावा व हळदी-कुंकू कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने स्नेहभाव जपत उत्साहात पार पडला. संस्थेच्या श्रीमती सुवर्णा गिरमे अध्यक्षस्थानी होत्या. प्रसिद्ध स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. अपर्णा देशमुख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तथा माजी नगरसेविका कीर्ती शिंदे, शोभा मालाणी, मधुरा महाजन, मुख्याध्यापक कैलास देशमुखे व आ. कृ. वाघमारे प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक दत्तात्रय हाके यांची सपत्निक उपस्थिती होती.

गणेश वंदनेनंतर दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर श्रीमती सोनल पहाडे यांनी प्रास्ताविक करत कार्यक्रमाची भूमिका विशद केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध नृत्याविष्कार सादर करून कला आणि संस्कृतीचे दर्शन घडवले. 'जन्म बाईचा' आणि 'सण आणि संस्कृती' या विषयांवर विद्यार्थ्यांच्या प्रभावी सादरीकरणांने उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला.

प्रमुख अतिथी डॉ. अपर्णा देशमुख यांचा परिचय श्रीमती अमृता न्यायाधीश यांनी करून दिला. डॉ. देशमुख यांनी आरोग्यदायी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले.

खास आकर्षण म्हणजे सांस्कृतिक स्नेहगाणी. डॉ. देशमुख आणि मधुरा महाजन यांनी आपल्या सुरेल गायनाने वातावरण भारावून टाकले. श्रीमती सुवर्णा गिरमे यांनी 'गुरू' या विषयावरील पदाने वातावरण भक्तिरसात न्हावून निघाले. श्रीमती शोभा मालानी यांनी राधा-कृष्णाची एक हृदयस्पर्शी प्रार्थना गाऊन सोहळ्याची सांगता भक्तिमय वातावरणाने झाली. सूत्रसंचालन श्रीमती उल्का धनंजय पाठक यांनी, तर श्रीमती सुजाता देहाडे यांनी आभार प्रदर्शन केले.

### संस्कृतीचा सुरेख संगम

स्नेह, संस्कृती आणि सुसंस्कार यांचा सुरेख संगम म्हणून या सोहळ्याची आठवण उपस्थितांच्या मनात कायम राहील. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवानी पाठक, सुनिता देशमुख, रुपाली कोल्हारे, संगीता बडगुजर, स्वाती अब्बू, माकोल, सूर्यवंशी, मोरे, साळुंके, काथार, गेहेरवार आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शहरात विविध मंदिरांमध्ये गणेशयाग, अभिषेक, पूजन आदी कार्यक्रमांनी गणेशजयंती उत्साहात

## श्रीगणेश...श्रीगणेश जयघोषाने शहर भक्तिमय

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

शहर परिसरात विविध 'श्री' मंदिरांमध्ये श्रीगणेश जयंती गणेशयाग सह विविध कार्यक्रमांनी भक्तिभावाने साजरी करण्यात आली. श्रीगणेश...श्रीगणेश जयघोषाने शहर भक्तिमय झाले होते. शनिवारी, १ फेब्रुवारी २०२५ रोजी गणपती मंदिरांमध्ये दर्शनासाठी भक्तगणांच्या रांगा लागल्या होत्या.

'गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया' च्या गजरात शहरातील सर्व गणपती मंदिरात भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले. शहरातील सर्व गणपती मंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रम घेऊन गणेश जयंती उत्सव साजरा करण्यात आली. संपूर्ण शहर बाप्पाच्या गजराने भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.

गणेश जयंतीचा शहरात अपूर्व उत्साह दिसून आला. त्यानिमित्त सकाळपासून शहरातील संस्थान गणपती मंदिर, काळा गणपती मंदिर, वरद गणपती मंदिर याशिवाय गणेश टेकडी येथील गणपती मंदिरांसह शहरातील विविध गणपती मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी सकाळपासूनच भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी रांगा लावलेल्या होत्या. यावेळी शहरातील मंदिरात बाप्पाचा अभिषेक करून पूजन करून आरती करण्यात आली. अनेकांनी बाप्पासाठी नैवेद्य दाखवून, पूजन करून आरती करण्यात आली. यावेळी घरोघरी देखील बाप्पाचा गजर करत गणेश जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

बाप्पाचा जन्मोत्सव साजरा करून भाविकांनी दर्शन घेतले. यावेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, प्रफुल्ल मालाणी, सुनील अजमेरा, सुनील चौधरी, प्रमोद शिंदे, विजय पिंपळे आदींची उपस्थिती होती. सायंकाळी '५६ भोग' चा प्रसाद बाप्पाला दाखवून पूजा केली जाणार आहे.

### जनकल्याणासाठी प्रार्थना

शहराचे ग्रामदैवत व संस्थान गणपती मंदिरात सकाळपासून गणेश जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी '२१ कुंडी' याग करून जणकल्यासाठी बाप्पाला प्रार्थना करण्यात आली. महेश पिंपळे परिवाराच्या हस्ते बाप्पाचा अभिषेक करून पूजन करण्यात आले. भागवतकार प. पू. विजयकुमार पल्लोड यांच्यासह आर्दीच्या मार्गदर्शनाखाली २१ कुंडी यागास प्रारंभ झाला. यावेळी २१ जोडप्यांनी याग केला. दुपारी १ वाजेपर्यंत २१ कुंडी याग करण्यात आला. यावेळी जणकल्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

# शिक्षक पात्रता परीक्षेचा निकाल संकेतस्थळावर प्रसिद्ध

छत्रपती संभाजीनगर, दि.३१(जिमाका)-महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दि.१० नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचा निकाल (अंतरिम) परिषदेच्या http://mahatet.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. यानिकालासंदर्भात गुणपडताळणी वा काही त्रृटी आक्षेप असल्यास http://mahatet.in या संकेतस्थळावर दि.१ ते ६ फेब्रुवारी दरम्यान उमेदवारांच्या लॉगईन मधील ऑनलाईन पद्धतीने नोंदविता येईल. अन्य मार्गाने आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. ज्या उमेदवारांचा निकाल राखीव आहे अशांनी आपले निवेदन दि.६ फेब्रुवारी पर्यंत mahatet.msce@gmail.com या इमेलवर पाठवावे.



**भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघाचे गंगापूर तालुका अध्यक्षपदी पत्रकार अलिम, चाऊस यांची निवड झाल्या नंतर गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांनी सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी सहकारी पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या यावेळी माजी नगराध्यक्ष फैसल चाऊस यावेळी उपस्थिती होती.**

# रामदास गव्हांडे यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२ फेब्रुवारी : तालुक्यातील घोसला येथील रामदास कौतिक गव्हांडे (वय.७९) यांचे दि.१ शनिवार रोजी सकाळी १० वाजता . अल्पशा आजाराने निधन झाले.त्याच्यांवर दि.२ रविवार सकाळी १० वा.घोसला येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुलं,सुना,नातवंड असा परीवार आहे.ते घोसला येथील विकास सोसायटीचे माजी चेअरमन होते.

# एमजीएममध्ये 'सॅटर्डे लॉ फोरम : विकली इन्साईट्स'ची सुरुवात



छत्रपती संभाजीनगर, दि.२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लिगल स्टडीज अँड रिसर्चच्या वतीने 'सॅटर्डे लॉ फोरम : विकली इन्साईट्स' सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना कायदा क्षेत्रातील व्यक्तींकडून प्रत्यक्ष ज्ञानासह त्यांचे अनुभव ऐकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. कायदा क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे प्रतिथयश व्यक्ती या उपक्रमाच्या माध्यमातून विविध विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधत आहेत.

या उपक्रमांतर्गत दर शनिवारी एका प्रख्यात विधितज्ञास निमंत्रित करत समकालीन काळातील विषय देऊन चर्चा घडविण्यात येते. उच्च न्यायालय आणि जिल्हा न्यालालयात तसेच न्याय क्षेत्रात विविध पदांवर कार्यरत असणारे कायदेतज्ञ या उपक्रमात सहभागी होत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

आतापर्यंत या उपक्रमांतर्गत तीन व्यक्तींनी सहभाग घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. यामध्ये खालील व्यक्तींचा समावेश आहे.

१. 'प्रोफेशनल काउन्सिलिंग फॉर लिगल प्रॅक्टिस इन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रिब्युनल' या विषयावर महाराष्ट्र ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रिब्युनल औरंगाबाद बेंचचे डेप्युटी रेजिस्ट्रार संदीप मुंडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

२. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठातील विधीज्ञ अजिंक्य रेड्डी यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त 'इम्पॉवरिंग व्हाईसेस : अनपॅकिंग व्होटर राईट्स इन इंडिया' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

३. 'लॅंग्वेज मॅटर्स : हाऊ क्लीयर कॅम्युनिकेशन कॅन मेक ऑर ब्रेक अ लीगल केस' या विषयावर सपना कपूर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

'सॅटर्डे लॉ फोरम : विकली इन्साईट्स'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कायदा क्षेत्रात प्रत्यक्षपणे काम करणाऱ्या व्यक्तींना भेटता येत असून यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होत आहे. तसेच विद्यार्थ्यांना कायदा क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या विविध संधींबाबत माहिती मिळत असल्याचे संचालिका डॉ.झरताब अंसारी यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक ॲड .रीना मानधनी, स्कूल ऑफ लिगल स्टडीज अँड रिसर्चचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी काम करत आहेत.

# ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे महिलांचा हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न



तभा वृत्तसेवा

बिडकीन : पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा अंतर्गत वयवृद्ध साठी तसेच दिव्यांगांसाठी, शालेय विद्यार्थ्यांसाठी, व नागरिकांसाठी, अनेक विविध उपक्रम राबवल्या जातात आत्ताच काही दिवसापूर्वी महिलांचा पवित्र सण मकर संक्रांत या सणानिमित्त दि ३१ जानेवारी रोजी महिलांना हळदी कुंकू कार्यक्रम करून कचरा टाकण्यासाठी डस्बिन बकेट वाटप करण्यात आला याप्रसंगी सरपंच सलीम महंमद पठाण तालुका समन्वयक संदिप जाधव सर ग्रामपंचायत अधिकारी आशाताई तुपे,उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे,रेखा इंदापुरे,मीरा हाडे,गायत्री तुपे,कांचन बिडकर,मीना माळवे,कोमल निकम,मीनाक्षी धुमाळ,अनिता पठारे,तेजस जाधव दिलीप गोरे,गणेश गायकवाड,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ मोठ्या संख्येने महिला व गावकरी आर्दीची उपस्थिती होती.

# सहकार महर्षी माणिकराव पालोदकर पालोद येथील महाविद्यालयात आनंद नगरीचे आयोजन



पालोद- येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयात अनंदनगरीचे आयोजन करण्यात आले. पालोद येथे आयोजित करण्यात आलेल्या आनंद नगरी कार्यक्रमाचे उदघाटन जि. प. पलोद चे मुख्याध्यापक श्री दिलीप सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले, तर सोबत कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य श्री ज्ञानेश्वर काकडे उपस्थित होते.

याप्रसंगी पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः बनविलेल्या विविध पदार्थांचे ५० हून जास्त स्टॉल लावलेले होते. येणाऱ्या युगात प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळणार नाही त्यामुळे त्यांना व्यवहार ज्ञान हवे आणि व्यवसाय सुद्धा करता यायला हवा; हा या मागील उद्देश आहे, असे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री ज्ञानेश्वर काकडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक श्री दिलीप जाधव, श्री माणिक परदेशी, श्री प्रदीप कानडजे, श्री संजय चापे, श्री कृष्णा पाटील,श्री राजेश ठोंबरे, श्री सुनील सागरे, श्री भास्कर केरले, श्रीमती जयश्री चापे, श्रीमती महादेवी ठवरे, श्रीमती हर्षदा सनांसे, श्री पंढरीनाथ कदम, प्रा योगेश निंभोरे, श्री प्रफुल कळम, डॉ रमेश काळे, श्री गजानन सपकाळ, श्री गणेश दिवटे, श्री संतुकराव मोरे, श्री अक्षय निकम व इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी नवनवीन पदार्थाचा आस्वाद घेऊन आनंद नगरीचा मनसोक्त आनंद घेतला. बहुसंख्य विद्यार्थि ,गावकरी व पाहुण्यांच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.

# पुणे येथे पहिली आशियाई टॅक्‍योन चॅम्पियनशिपमध्ये छत्रपती संभाजीनगरचा संघ विजयी




तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २ फेब्रुवारी : बालेवाडी क्रीडा संकुलात २९ ते ३१ जानेवारी रोजी झालेल्या एशियन कराटे स्पर्धेत संभाजीनगर येथील प्रहार मार्शल आर्ट असोसिएशन ऑफ भारत च्या संघाने कूमिते व ग्रुप कूमिते मध्ये १ सुवर्ण ६ रोप्य ८ कास्य पदक जिंकून आपले नाव केले ह्या स्पर्धेत आयोजन महाराष्ट्र टॅक्‍योन असोसिएशन चे प्रेसिडेंट आमदार राजू भोले जळगाव सिटी दक्षिण कोरियाचे मास्टर जू उंग्सेओ आशियाई टॅक्‍योन फेडरेशनचे महासचिव ॲड. राज वागतकर सर व महाराष्ट्राचे सेक्युरिटी मिलिंद काटमोरे सर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पदक वितरण करण्यात आले प्रहार मार्शल आर्ट असोसिएशन छत्रपती संभाजीनगर संघटनेचे अध्यक्ष निलेश पाटील सचिव सागर महाजन उपाध्यक्ष दुर्गेश पाटील एशियन रेफ्रिरि कुणाल शिंदे सर कराटे प्रशिक्षक ओम पाटील सर यांचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभत आहे विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचे खालील प्रमाणे नाव १.आर्यन त्रिवेदी (सुवर्ण पदक) २ व्यंकटेश करंजीकर (रोप्य पदक) ३ लव गुप्ता ,(रोप्य पदक) ४ सर्वेश साळुंखे (रोप्य पदक) ५.प्रांजल जोशी (रोप्य पदक) ५.आराध्या बेडसे (रोप्य पदक) ७.राणी डुकरे (रोप्य पदक) ८.तन्वी पाठक (कास्य पदक) ९ अबोली भोंडवे (कास्य पदक) १०.मयंक डाके (कास्य पदक) ११.राज सरोवर (कास्य पदक) १२.पार्थ देशमुख (कास्य पदक) १३.रुद्र गोलमडू (कास्य पदक) १४.आर्यन चौधरी (कांस्य पदक) १५.सोहम चौधरी (कास्य पदक) इत्यादी खेळाडूंनी एशियन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता विजयी झालेल्या खेळाडूंची महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अनिल पाडळकर सर सुनील पाडळकर सर सरस्वती विद्यामंदिर चे मुख्याध्यापिका गायत्री पाडळकर मॅडम व सर्व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शालिवाहन पतसंस्थेला बॅंको ब्लु रीबन पुरस्कार



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०२ : अॅम्बे व्हॅली, लोणावळा येथील निसर्गात रंगलेला सहकाराचा भव्य दिव्य सोहळा, सोबत सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांची मांदियाळी, अशा सहकारमय वातावरणात १०० ते २०० कोटी ठेवी असणाऱ्या पतसंस्थांमध्ये पैठण च्या शालिवाहन पतसंस्थेला 'बॅंको ब्ल्यु रिबन - २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने संस्थेचे अध्यक्ष किशोर चौहान यांचे नेतृत्वाखाली पैठण ची शालिवाहन पतसंस्था पुन्हा एकदा महाराष्ट्रातील पतसंस्थांसाठी रोल मॉडेल ठरली आहे.

चेअरमन किशोर चौहान व सर्व संचालक मंडळ यांचे सक्षम नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेली पैठण येथील शालिवाहन पतसंस्था ही २८ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करत असतांना महाराष्ट्रभर १३ शाखा, ७कोटी ९ लाख ८६ हजार रूपयांचे एकूण वसूल भाग भांडवल, २० कोटी ५४ लाख ४५ हजार रूपयांचा एकूण स्वनिधी, २५० कोटी रूपयांचा एकूण व्यवसाय व सलग ऑडिट वर्ग 'अ',नियमित ९८% कर्ज वसूली, १ टक्क्यापेक्षा कमी एनपिए आणि सोबत संस्थेचे सभासद, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक यांची भक्कम साथ या आधारे सलग सातव्यांदा या पुरस्काराची मानकरी ठरली. मा. सहकार आयुक्त श्री चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते शालिवाहन चे चेअरमन किशोर चौहन यांनी बॅंको ब्ल्यू रिबन- २०२४ या पुरस्काराचा स्वीकार केला. यावेळी संस्थेचे संचालक दीपक लखमले, वरिष्ठ अधिकारी शिवाजी घोडसे, मुख्य वसुली अधिकारी रामदास संदलसे, जनसंपर्क अधिकारी नरेश सिकची, शाखा व्यवस्थापक महेंद्र कोळगे आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (२९) **धर्मरक्षक**

चांद्याच्या एका सभेत धर्म रक्षणाची कल्पना विषद करताना डॉक्टर जी म्हणतात - आम्ही हिंदू लोक धर्मनिष्ठ आहोत हे खरे; पण सर्वच हिंदूंनी धर्मरक्षण व धर्म पालन यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. स्नान संध्यादि- वैयक्तिक धार्मिक आचार पूजा यथासांग करणे म्हणजे धर्मरक्षण नव्हे. धर्म जगवण्यासाठी या पूजाविधी, व्रतवैकल्ये आवश्यक आहेत हे खरे. पण हिंदू धर्मावर होणाऱ्या हल्ल्याचा प्रतिकार या पूजा विधी मुळे होणार नाही. त्यासाठी प्रतिकार करण्याची शक्ती हवी. तरच हिंदू मानाने जगू शकेल. यासाठी संघात सैनिकी बाह्य शारीरिक शिक्षण देतात. संघटनाचे पाठ शिकवतात. हिंदू समाजाच्या ठिकाणी शक्ती आत्मविश्वास व स्वाभिमान उत्पन्न झाला पाहिजे; याचसाठी हा प्रयत्न असतो. परंतु अहिंसेचे पुजारी संघवाल्यांना हिंसक म्हणतात. काही कर्मठ म्हणतात संघवाले गंध लावत नाही, संध्या करत नाही, सारे जण सरमिसळ जेवतात आणि स्वतःला धर्मरक्षक म्हणतात. संघवाले 'धर्मरक्षक वीर व्रतधारी बने' असे कोणत्या अर्थाने म्हणतात. त्यांची ही भाषा फसवी व पोकळ आहे अशी टीका करतात. याला उत्तर देताना डॉक्टर म्हणतात या देशाची- धर्माची - संस्कृतीची सर्वतोपरी जबाबदारी हिंदूंची आहे हे विसरू नये हे उत्तम. अन्यथा हिंदूंचा नरसंहार होत राहील आणि आम्ही गुलामीला आमंत्रण देऊ. लक्षात ठेवा. 'हिंदू जगे- देश जगे- स्वाभिमान संकल्प जगे' क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# टाकळी रा. रा.येथील भागडे वस्तीला नवीन मिनी अंगणवाडी इमारतीसाठी निधी उपलब्ध करून द्या

## आ बंब यांच्याकडे संजय जाधव यांची निवेदनाद्वारे मागणी



खुलताबाद : तालुक्यातील जि.प.प्रशाला टाकळी रा.रा. या शाळेला दत्तक घेऊन ड्यूएल डेक्स ,बायोमेट्रिक्स हजरी मशीन व संगणक कक्ष, आपल्या आमदार निधीमधून देण्यासाठी गावकऱ्यांचे मागणीचे निवेदन व मौजे टाकळी रा.रा. गावापासून अंदाजे दोन किमी अंतरावर भागडे वस्ती येथे सध्या उघड्यावर अंगणवाडी भरते अंगणवाडी मंजुरीसाठी चा प्रस्ताव दि. २९.११ .२०२५ ला .गट विकास अधिकारी पंचायत समिती खुलताबाद यांना दिलेला आहे .

आ प्रशांत बंब यांच्या निधीमधून अंगणवाडी इमारत मंजुरी मिळावी म्हणून निवेदन देऊन. संजय जाधव शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य . वृद्ध कलावंत, खुलताबाद तालुका उपाध्यक्ष यांनी .आ बंब यांच्याशी चर्चा करून निवेदन दिले. तसेच जि.प.प्रशाला टाकळी रा.रा. या शाळेला दत्तक घेऊन शाळेच्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी ड्युएल डेस्क, आधुनिक शिक्षणासाठी संगणक कक्ष आणि शिक्षकांच्या बायोमेट्रिक हजेरी साठी हजरी मशीन शाळेत व्यवस्थापन समितीचे घेतलेल्या ठरावासह निवेदन दिले. निवेदनावर व्यवस्थापन समितीचे सदस. वृद्ध कलावंत खुलताबाद तालुका उपाध्यक्ष संजय जाधव, सकाहारी वद्रे, दादासाहेब भागडे व मोहन गोलवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भारतीय जनता युवा मोर्चा वतीने निलजगाव फाटा ते पोरगाव रोडवर गतिरोधक करण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

बिडकीन : पैठण तालुक्यातील बिडकीन येथे २ फेब्रुवारी रविवार रोजी विजय चव्हाण यांच्या संपर्क कार्यालय मध्ये भाजपा सदस्य नोंदणी अभियान कार्यक्रम पार पडला यावेळी बिडकीन परिसरातील व तालुक्यातील कार्यकर्ते पदाधिकारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.तसेच या कार्यक्रमानंतर भारतीय जनता युवा मोर्चा यांच्या वतीने आज दिनांक २ फेब्रुवारी रोजी बिडकीन पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले सविस्तर माहिती अशी की निलजगाव फाटा ते करमाड जाणारा रोड वरती रोज आपघात घडत असून या अपघातामध्ये बऱ्याच जणांचा जीव गेला आहे या रोडवरची मोठी रहदारी असल्याने, तसेच रोडवरील अतिक्रम वाढल्याने रोज अपघात घडत आहे, या रोड लगत शाळा महाविद्यालय, रोज विद्यार्थ्यांना,व नागरिकांना या रस्त्यावरून प्रवास करावा लागत असल्याने,या रोडवरती तातडीने गतिरोधक टाकण्यात यावे असे निवेदन भारतीय जनता युवा मोर्चा यांच्या वतीने बिडकीन पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक मंजीत सिंग सेना यांना निवेदन देण्यात आले आहे यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष लक्ष्मण औटे, राजगौरव वानखेडे, तुषार सिसोदे,अँड राहुल बाबर,माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, रंगनाथ लघाणे, बप्पासाहेब शेळके, गणेश काळे,चंद्रकांत हुड,राम खणसे, सुनील गडदे, विठ्ठल मोगल, दत्तात्रय बांडे, गणेश दाणे,भागचंद कोथिंबीरे, ग्रामपंचायत सदस्य अविनाश राठोड,महेमुद शहा, निलेश धडे,निकेश राऊत, सद्दाम पठाण, किशोर धर्मे, अभिजित ढोकफळे, अर्जुन भवर,परवेज अत्तार, दादासाहेब तांबे, संतोष तोतला, दादासाहेब शिंदे,शुभम औटी, आदीं भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मार्शल आर्ट्स यांच्या वतीने मुलींसाठी मोफत प्रशिक्षण



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २ फेब्रुवारी : मार्शल आर्ट्स प्रशिक्षक मास्टर पवन घुगे यांच्या वाढदिवसानिमित्त. खास करून मुलींसाठी स्वसंरक्षणाचे सात दिवस फ्री प्रशिक्षण देण्यात येणार आहे मास्टर पवन घुगे यांचा दि २ फेब्रुवारी रोजी वाढदिवस आहे प्रत्येक वर्षी मास्टर पवन घुगे आपला वाढदिवस शालेय मुलींना मोफत प्रशिक्षण देतात या वर्षी पण . मुली व महाविद्यालयीन युवती महिलांसाठी स्वसंरक्षणाचे महत्त्व कार्यशाळेनिमित्त दि २ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी मुलींना कराटे कुंगफू लाटी काटी चे प्रशिक्षण देण्यासाठी परिसरातील मुलींना देण्यात येणार आहे. पालकांनी या प्रशिक्षणासाठी आपल्या कन्येला या प्रशिक्षणात भाग घेण्यासाठी पाठवावे. मिशन मार्शल आर्टस संघटनेचे अध्यक्ष मास्टर पवन घुगे, सचिव प्रवीण घुगे, यांचे विशेष मार्गदर्शन या कार्यशाळेत विद्यार्थिनींना मिळणार आहे प्रशिक्षिका राधा घुगे, कोमल राठोड, ऋतुजा रणवळकर, ऋतुजा भालेराव, धनश्री शिदवडकर, प्रशिक्षक श्याम बुधवंत, राम बुधवंत, राम चौरे, श्रीकृष्ण कानडे, गौरव टोकटे, प्रवीण घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर चालणार आहे असे पवन घुगे यांनी सांगितले आहे.

## प्रासंगिक

**मंगेश पाठक**

# चौफेर विकासाचा संकल्प

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी काल, शनिवारी लोकसभेत सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे देशाच्या चौफेर विकासाचा संकल्प होय. केवळ औपचारिकता पार पाडण्यासाठी त्यांनी अर्थसंकल्प सादर केलेला नाही. गेली पाच वर्षे देशाने ज्या गतीने आर्थिक प्रगती साधली, त्या पृष्ठभूमीवर सादर केल्या जाणाऱ्या या अर्थसंकल्पाकडे सगळ्यांचेच डोळे लागले होते. आपल्याला काय मिळणार, कुठल्या सोईसुविधा उपलब्ध होणार, कररचनेत बदल होईल का, शेतकऱ्यांसाठी काय असेल, मध्यमवर्गीयांना दिलासा मिळेल का, असे अनंत प्रश्न जनतेच्या मनात असताना काल सादर झालेला अर्थसंकल्प विकासाची व्यापक दिशा ठरवणारा, सर्व स्तरातील जनतेला, विशेषतः मध्यमवर्गीय करदात्यांना दिलासा देणारा आणि बेरोजगारांना आश्वस्त करणारा आहे, ही आनंदाची बाब म्हटली पाहिजे. कृषी क्षेत्रापासून तर वाहन उद्योगापर्यंत अर्थमंत्र्यांनी अनेक मोठ्या घोषणा करून केंद्रातल्या मोदी सरकारचा मानस स्पष्ट केला आहे. आगामी काळात देश कुठल्या दिशेने जाणार, हे सहज लक्षात यावे, एवढा सरळ आणि स्पष्ट असलेला अर्थसंकल्प यापूर्वी क्वचितच सादर झाला असेल. मध्यमवर्गीय माणसाच्या पदरी नेहमीच निराशा पडते. परंतु, यावेळी त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यात आल्याचे दिसते आहे. यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन्, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सरकारचे अभिनंदन करावेच लागेल. नेहमीची जी कररचना आहे, त्यात कुठलाही बदल न करता ती आहे तशीच कायम ठेवण्याची घोषणा न करता सर्वसामान्यांना मिळालेला मोठा दिलासा समाधानकारकच आहे. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवून मिळेल, अशी अपेक्षा सर्वसामान्य लोकांना होती. ती बरोबरही होती. पण, सरकारकडून ती एकदम बारा लाखांपर्यंत वाढविली जाईल, अशी अपेक्षा कुणी केली नव्हती. फारतर आठ लाख आणि जास्तीत जास्त दहा लाखांपर्यंत मर्यादा वाढेल असा एक मतप्रवाह होता. सगळ्यांना अशी अपेक्षा नव्हती. पण, सरकारने जबरदस्त कृपा केली आणि अनपेक्षित सुखद धक्का दिल्याने जनमानस आनंदित झाले आहे. सरकारने अतिशय पारदर्शक अर्थसंकल्प तयार केला आणि तो संसदेत सादर केला, यासाठीही सरकारचे कौतुक करावेच लागेल.

अपेक्षेप्रमाणे बिहार आणि आंध्रप्रदेशसाठी विशेष घोषणा अर्थसंकल्पात आहेत. त्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीची तरतूदही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे, ही आनंदाची बाब असताना विरोधकांनी मात्र टीकेची झोड उठवली आहे. वास्तविक, देशात कुठेही मोठी निवडणूक नाही. असे असतानाही कोट्यवधी आयकरदात्यांसाठी करमुक्त उत्पन्नाची मर्यादा बारा लाखांवर नेऊन सरकारने मध्यमवर्गीय करदात्यांची आपल्याला चिंता आहे, हे कृतीने दाखवून दिले आहे. सगळे काही निवडणुकांवर डोळा ठेवूनच करायचे असते तर सरकारने आता सवलती दिल्या नसत्या. पण, या देशातील १४० कोटी नागरिकांचे भले झाले पाहिजे, ही मोदी सरकारची प्रामाणिक भावना आहे आणि म्हणूनच सरकारने जनताभिमुख असा अर्थसंकल्प सादर केला.

देशातील सुमारे ४८ कोटी मध्यमवर्ग आहे. तो भारतीय जनता पक्षाचा पाठीराखा आहे. गेल्या तीन निवडणुकांमध्ये मध्यमवर्गाने मोदी यांच्या सरकारच्या पाठीशी आपली ताकद उभी केली होती; परंतु सरकारने हा वर्ग आपल्याला सोडून जात नाही, असे गृहीत धरून सामान्यजनांच्या अपेक्षा आतापर्यंत फारशा गांभीर्याने घेतल्या नव्हत्या. दहा वर्षांमध्ये मध्यमवर्गाचे उत्पन्न वाढत होते; परंतु वाढणारे उत्पन्न प्राप्तिकरात जात होते. त्यामुळे हा वर्ग काहीसा नाराज झाला होता. दिल्लीत हा वर्ग जास्त आहे. त्याचा विचार करून तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात मास्टरस्ट्रोक मारला होता. त्यांनी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची घोषणा केली. आता दिल्ली विधानसभेपाठोपाठ बिहार विधानसभेचीही निवडणूक आहे. सरकार आता कोणतीच जोखीम पत्करायला तयार नाही. त्यामुळे आपल्या पाठीराख्या मध्यमवर्गाला एकीकडे खूश करायचे आणि त्याला त्याच्या आवडीच्या गोष्टीत मोठ्या प्रमाणात खर्च करायला लावायचा, ही नीती अर्थसंकल्पात वापरण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात खर्च करणारा हाच घटक देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात हातभार लावत असतो. मग तो करभरणा असो वा बाजारातील खरेदी; इतर घटकांपेक्षा या घटकांच्या हातून होणारी उलाढाल मोठी असते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबरच करातून वाचणारा पैसा बाजारात कसा येईल, याची तजवीज करण्यात आली. त्यासाठी इलेक्ट्रिक वाहने, मोबाईल, टीव्हीचे



सुटे भाग स्वस्त करताना मोठे टीव्ही मात्र महाग करून ठेवले. मोदी सरकार एकदाचे करदात्यांना पावले. पूर्वीच्या तीन लाख रुपयांच्या करमुक्त मर्यादेच्या तुलनेमध्ये आता चार लाखांचे उत्पन्न करमुक्त असेल. त्याव्यतिरिक्त गृहकर्ज, मेडिक्लेम, ठरावीक गुंतवणुकीवर १२ लाखांपर्यंतच्या कमाईवर नोकरदारांना छदामही भरावा लागणार नाही. पुढे जो काही कर द्यावा लागेल, तो सवलत, सुटीच्या माध्यमातून पुन्हा वसूल करता येईल.

गेल्या वर्षी देशात अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर करदात्यांनी नाराजी व्यक्त केली होती, कारण त्यांना महागाई, कर्जाचे हप्ते आणि कराच्या ओझ्याची चिंता होती. गेल्या वर्षी तीन लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होते. यंदा वाढीव एक लाख रुपयांवर सूट मिळणार आहे. पूर्वी सात लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होते. ते आता १२ लाख रुपयांपर्यंत झाले आहे. प्रमाणित वजावटी विचारात घेऊन ही सवलत असेल. तज्ज्ञांच्या मते वाचलेला हा पैसा पुन्हा बाजारात फिरेल, तो बँकेत गुंतवला जाईल अथवा नोकरदार वर्ग ही बचत बाजारात खर्च करेल. त्यामुळे सुस्तावलेल्या अर्थव्यवस्थेला गती मिळेल आणि विकसित भारतासाठी मोठा वृद्धिदर गाठणे सोपे होईल. केंद्र सरकारने आज तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा पूर्ण अर्थसंकल्प मांडला. या अर्थसंकल्पातून सरकारने अनेक मोठ्या घोषणा केल्या. केंद्र सरकारने अर्थसंकल्पामधून गोरगरिबांना दिलासा देण्याचे काम केले आहे. तसेच शेतकरी, महिला आणि नोकरदारांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. एवढेच नव्हे तर, रुग्णांसाठीही केंद्र सरकारने आपले हात मोकळे केले आहेत. केंद्र सरकारने एक दोन नव्हे तर, गंभीर आजारावरील ३६ औषधे करमुक्त केली आहेत. त्यामुळे ही औषधे स्वस्तात मिळणार आहेत. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर बनवण्याचा निर्णयही केंद्र सरकारने घेतला आहे. कॅन्सरवरील उपचारासाठीची औषधे आता स्वस्त होणार आहेत. सहा जीवनरक्षक औषधांवरील सीमा शुल्क पाच टक्के करण्यात आले आहे.

अर्थमंत्र्यांनी देशातील विमा क्षेत्रातील गुंतवणूक परकीय गुंतवणूकदारांसाठी खुली करताना ही रक्कम भारतातच वापरण्याचे बंधन घातले आहे. त्यामुळे आरोग्य विमा क्षेत्रात स्पर्धा होणार असली, तरी आरोग्य विमा जीएसटीमुक्त करण्याची मागणी मात्र विचारात घेतली गेली नाही. या सरकारने कृषीसह सर्वच क्षेत्रांमध्ये 'एआय' तंत्रज्ञान वापरण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या जागा कमी असल्यामुळे विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहतात. आर्थिक स्थिती चांगली असलेली मुले खाजगी मेडिकल कॉलेजमध्ये शिकतात; मात्र गरीब कुटुंबातून आलेली मुले वेगळ्या क्षेत्रांत जातात. आता सीतारामन् यांनी मोठा दिलासा दिला आहे. त्यांनी येत्या पाच वर्षांमध्ये वैद्यकीयच्या दहा हजार जागा वाढवणार असल्याची घोषणा केली आहे. विद्यार्थ्यांसाठी ही मोठी गोष्ट ठरणार आहे. या विद्यार्थ्यांना सरकारी वैद्यकीय कॉलेजमध्ये शिक्षण मिळणार असून खाजगी कॉलेजमध्ये पैसा खर्च करण्याची गरज पडणार नाही.

महिलांसाठी या अर्थसंकल्पामध्ये बरेच काही आहे. सरकार दहा हजार कोटी रुपयाचे योगदान देऊन 'स्टार्ट अप्स'साठी निधीची व्यवस्था करणार आहे. सरकार पहिल्यांदा पाच लाख महिला, एससी आणि एसटी उद्योजिका घडवण्यासाठी दोन कोटी रुपये कर्ज देईल. महिलांना सहज अटींवर विनातारण कर्ज मिळेल. त्यामुळे त्यांना छोट्या आणि मध्यम आकाराचा व्यवसाय सुरू करता येईल. महिलांना उद्योग वाढवण्यासाठी डिजिटल ट्रेनिंग, विपणन सहकार्य आणि सरकारी योजनांशी जोडण्याची संधी दिली जाईल.

सीतारामन् यांनी अर्थसंकल्प मांडताना शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. यात शेतकरी क्रेडिट कार्डची मर्यादा दोन लाखांनी वाढवली. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकाराचे दरवाजे ठोठावण्याची गरज भासणार नाही. युरिया उत्पादनात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी सरकार बंद पडलेले तीन युरिया प्रकल्प पुन्हा सुरू करणार आहे. युरिया पुरवठा वाढवण्यासाठी आसामच्या नामरूप येथे १२.७ लाख मेट्रिक टन वार्षिक क्षमतेचा प्रकल्प लावला जाईल. त्यामुळे युरियाची आयात कमी होईल; परंतु गेल्या वर्षभरात खतांच्या अनुदानात केलेली कपात आणि त्यामुळे महाग झालेल्या खतांवर उपाय सापडत नाही. कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाला चालना देण्यासाठी मात्र अर्थसंकल्पात तरतूद नाही. डाळ आणि कापसासाठी धोरण जाहीर केले असले, तरी पूर्वीचा अनुभव लक्षात घेता शेतकरी या धोरणाला किती प्रतिसाद देतात, यावरच सगळे काही अवलंबून राहील. कमी उत्पादकता असलेल्या शंभर जिल्ह्यांची निवड करून उत्पादकता वाढवण्यावर भर देण्याचा सरकारचा प्रयत्न चांगला आहे. त्या अर्थाने अर्थसंकल्पाचे स्वागत करता येते.

देशातील जनतेला धार्मिक स्थळी आवर्जून जाता यावे, म्हणून सरकारतर्फे धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. सरकारच्या कररचना आणि गुंतवणुकीबाबतच्या धोरणावर भांडवली बाजाराने नकारात्मक प्रतिक्रिया नोंदवली. गेल्या चार सत्रांमध्ये तेजी अनुभवणाऱ्या गुंतवणूकदारांना अर्थसंकपल्पाने निराश केले आहे. सीतारामन् यांनी भाषणामध्ये नवीन प्राप्तिकर कायद्याचा ओझरता उल्लेख केला. पुढील आठवड्यात हे विधेयक सादर होईल, असे त्यांनी सांगितले. या विधेयकासाठी तज्ज्ञांची एक समिती अगोदरच बनवण्यात आली आहे. नवीन कायदा हा दोन अथवा तीन भागांत असेल. त्यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून कसरत सुरू होती. सरकार याविषयीचे विधेयक सादर करणार आहे. त्यानंतर करदाते आणि तज्ज्ञांच्या हरकती, प्रतिक्रियेनंतर त्यात सुधारणा करण्यात येईल. आता या नवीन प्राप्तिकर कायद्यामुळे जुना कायदा इतिहासजमा मानण्यात येत आहे. प्राप्तिकर कायद्याचे सुधारित स्वरूप हे अत्यंत सोपे आणि सुटसुटीत असेल. हे विधेयक व्यक्ती, संस्था, उद्योग आणि सरकारला विविध न्यायालयीन कचाट्यातून बाहेर काढण्याचे काम करेल. त्यापोटी नाहक खटले दाखल करण्याची वेळ येऊ नये यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. या पृष्ठभूमीवर अर्थसंकल्प चांगला आहे, मात्र त्यात काही अभिनव पावले दिसली नाहीत, असे वाटते. ▮

पुणे

## रविवारची पत्रे

### वसंत पंचमीचे महत्त्व

वसंत पंचमी हा उत्सव माघ शुद्ध पंचमी या तिथीला साजरा करतात. सर्व ऋतूंचा राजा असणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल वसंत पंचमीच्या दिवशी लागते. या दिवशी विद्येची अधिष्ठात्री देवता महासरस्वती आणि श्री लक्ष्मी यांचा जन्मदिन साजरा करण्यात येतो. ही तिथी वागेश्वरी आणि श्री पंचमी या नावानेही प्रसिद्ध आहे.

अशी मान्यता आहे की सृष्टीची रचना केल्यानंतर जेव्हा ब्रह्मदेवाने आपल्या संसाराकडे बघितले तेव्हा त्यांना सगळीकडे निर्जनता आणि शांतता जाणवली. हे बघून ते उदास झाले. तेव्हा श्रीविष्णूच्या आज्ञेने त्यांनी आपल्या कमंडलातून पाणी घेऊन पृथ्वीवर शिंपडले. त्या पाण्यामुळे पृथ्वीवर कंपन होऊन त्यातून एक चार भुजा असलेली देवी प्रकट झाली. त्या देवीच्या एका हातात वीणा, दुसरा हात वरमुद्रेत आणि इतर दोन हातात ग्रंथ आणि माळ होती. जेव्हा देवीने वीणा वादन केले त्यानंतर पृथ्वीवरील सर्व जीवजंतूंना वाणी प्राप्त झाली.



त्या क्षणानंतर देवीला सरस्वती असे म्हटले गेले. तसेच सरस्वतीला वागेश्वरी, भगवती, शारदा, वीणा वादिनी यासह अनेक नावे आहेत. संगीताची जन्मदात्री म्हणूनही सरस्वतीची पूजा केली जाते.

शाळा, महाविद्यालयांमध्ये या दिवशी सरस्वतीची पूजा केली जाते. लहान मुलांवर ज्ञानाचा संस्कार व्हावा तसेच सरस्वतीचा आशीर्वाद मिळावा म्हणून त्यांना या दिवसापासून पाटीवर अक्षर गिरवणे शिकवले जाते. विद्यारंभ संस्कारासाठी हा सर्वोत्कृष्ट दिवस मानला जातो. तसेच सर्व प्रकारच्या शुभकार्यासाठीही हा दिवस शुभ मुहूर्त मानला जातो.

या दिवशी पहाटे अभ्यंग स्नान करून पूजा करतात. कलशाची स्थापना करून त्यात सरस्वती देवीला आवाहन करून तिचे पूजन करतात. पिवळ्या रंगाची फुले देवीला अर्पण करतात. पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करण्याला या दिवशी विशेष महत्त्व आहे. नवीन पिकांच्या लोंब्या आणून त्याचा नैवेद्य अर्पण करतात.

या दिवशी विद्यार्थी, कलाकार, गायक, संगीतकार आणि लेखक तसेच इतर भक्त देवी सरस्वतीची उपासना करतात. गायक सुंदर स्वर मिळावा यासाठी प्रार्थना करतात. आपणही सर्वांनी देवी सरस्वतीकडे आपल्या मुलांसाठी सात्त्विक बुद्धी, विद्यार्जन, स्मरणशक्ती प्रदान करण्याची प्रार्थना करू या. आदर्श अशा रामराज्यासाठी सगळ्यांची बुद्धी सात्त्विक कर, उत्तम वाणी सगळ्यांना प्राप्त व्हावी अशी प्रार्थना करू या.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

### विद्या प्राप्ती हेच आदर्श विद्यार्थी जीवन

आदर्श विद्यार्थी जीवन म्हणजे शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि उद्दिष्टपूर्तीसाठी सतत प्रयत्नशील राहणारे जीवन. विद्यार्थी जीवन हे मनुष्याच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे, कारण याच काळात व्यक्तिमत्त्व घडते, भविष्याचे स्वरूप ठरते आणि जीवनातील महत्त्वाच्या मूल्यांची शिकवण मिळते. एक आदर्श विद्यार्थी तो असतो जो ज्ञानाची प्राप्ती किंवा शिक्षणाला जीवनाचा पहिला आदर्श मानतो. ज्याला शिक्षणाची इच्छा नाही तो आदर्श विद्यार्थी होऊ शकत नाही. हे ज्ञानच माणसाला नम्र, सहिष्णू आणि सदाचारी बनवते. शिक्षण घेऊनच विद्यार्थी भविष्यात सक्षम नागरिक बनू शकतो. आदर्श विद्यार्थी नेहमीच शिस्तबद्ध असतो. त्याच्यामध्ये वेळेचे व्यवस्थापन, उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजना बनवणे आणि शालेय कामे योग्य प्रकारे पूर्ण करणे यासारखे गुण असतात. शिस्त म्हणजे नियमितता, परिश्रम आणि आत्म-नियंत्रण. शिस्तबद्ध विद्यार्थी वर्गातच नाही तर जीवनाच्या विविध क्षेत्रांत यश प्राप्त करतो. यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वातसुद्धा सकारात्मक परिवर्तन घडते.

आदर्श विद्यार्थ्याला चांगली पुस्तके आवडतात. पुस्तकात नमूद केलेल्या गोष्टी तो लक्षात ठेवतो आणि त्या आपल्या जीवनात लागू करतो. तो चांगल्या गुणांचा अंगीकार करतो. वाईटापासून दूर राहतो. त्याचे मित्रही चांगल्या गुणांनी परिपूर्ण असले पाहिजेत. आदर्श विद्यार्थी हा सरळ आणि सत्यवादी असावा. त्याने आळशी होऊ नये. मेहनती आणि समर्पित असणे आवश्यक आहे. अभ्यासासोबतच खेळ आणि इतर उपक्रमांमध्येही सहभागी व्हावे. शाळेत होणाऱ्या सर्व प्रकारच्या उपक्रमांत सहभागी होऊन व्यक्तिमत्त्व घडवावे. आदर्श विद्यार्थी नेहमी आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवतो.

वेळेचे नियोजन आणि त्याचे काटेकोर पालन, अभ्यास, खेळ आणि विश्रांती यामध्ये संतुलन राखणे, फक्त पाठांतर न करता, समजून घेण्यावर भर देणे, नवीन गोष्टी शिकण्याची आणि आत्मसात करण्याची जिज्ञासा बाळगणे. अडचणींना संधी मानून त्यावर मात करण्याची वृत्ती, नेहमी आनंदी राहून, इतरांना प्रेरणा देणे, नियमित व्यायाम, योगा आणि ध्यान यामुळे शरीर व मन स्वस्थ ठेवणे, पोषणमूल्य असलेले अन्न घेणे आणि सुसंस्कृत सवयी जोपासणे, गुरुजनांच्या शिकवणीचे पालन करणे, पालकांचे मार्गदर्शन आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, मित्र, सहकारी आणि समाजाशी चांगले संबंध ठेवणे, जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करणे. आदर्श विद्यार्थी जीवन म्हणजे अशी जीवनशैली ज्यामध्ये विद्यार्थी त्याचा अभ्यास, वर्तन आणि नैतिक मूल्ये सुसंगत आणि संतुलित पद्धतीने विकसित करतो. आदर्श विद्यार्थी नेहमीच शिस्तबद्ध असतो. वेळेचा योग्य वापर करणे, नियमित अभ्यास करणे आणि शाळा किंवा महाविद्यालयाच्या नियमांचे पालन करणे महत्वाचे आहे. नियमितपणे गृहपाठ आणि प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे आणि वर्गात उपस्थित राहणे. आदर्श विद्यार्थी जीवन म्हणजे जीवनातील प्रत्येक क्षणाला महत्त्व देऊन, ज्ञान आणि शिस्त यांच्या माध्यमातून स्वतःचे भविष्य घडवणे. जीवन केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर कुटुंब, समाज आणि राष्ट्रासाठीही महत्त्वाचे आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

●● ●●

### आरोग्य विमा : सामान्य व विशेष विमाधारक वागणूक

अभिनेता सैफ अली खानला लीलावती रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे. मात्र पाच दिवसांसाठी त्याचं हॉस्पिटल बिल ३५ लाख रुपयांवर गेलं आहे आणि विमा कंपनीने त्याचा इतक्या मोठ्या रकमेचा वैद्यकीय दावा तत्काळ मंजूर केला आहे. यावरून मुंबईतील एका वैद्यकीय व्यावसायिकाने प्रश्न उपस्थित केले होते. आता तर मुंबई असोसिएशन ऑफ मेडिकल कन्सल्टंट्सने या संघटनेने सुद्धा इन्शुरन्स रेग्युलेटरी अँण्ड डेव्हलमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया जी भारतातील इन्श्युरन्स सेक्टरची देखरेख करणारी सरकारी संस्था आहे, जिचे प्राथमिक ध्येय पॉलिसीधारकांचे हित सुरक्षित ठेवणे आणि इंडस्ट्रीची वाढ सुनिश्चित करणे आहे यांना पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केल्याची बातमी वाचण्यात आली. यामध्ये संघटनेने सर्वसामान्य वैद्यकीय विमा पॉलिसीधारकांना या विमा कंपन्यांद्वारा मिळणारी वागणूक त्यांच्या दावा मंजुरी बाबतच्या येणाऱ्या अडचणींवर, त्याच वेळी सेलिब्रिटीज यांना देण्यात येणारी विशेष वागणूक यावर प्रामुख्याने प्रकाश टाकला आहे.

मुंबई असोसिएशन ऑफ मेडिकल कन्सल्टंट्स या संघटनेने उचललेले मुद्दे आज सर्व सामान्यांना आरोग्य विमा दावा मंजूर होण्याबाबत तसेच यात येणाऱ्या अडचणी बाबतचे आहे. आज या क्षेत्रातील बहुतांश आरोग्य विमा विकणाऱ्या कंपन्यांद्वारा सर्व सामान्यांचे दावे मनमानी तऱ्हेने नाकारले जातात त्यासाठी अस्पष्ट पॉलिसी कलमांचा गैरवापर करतात जे की सर्व सामान्य पॉलिसी घेणाऱ्याला माहीत नसतात. त्या शिवाय आरोग्य विमा दावा देण्याबाबतच्या प्रक्रियेत प्रचंड विलंब करतात. त्याशिवाय काही वेळेस असे दिसून येते एकतर्फीपणे दाव्याची रक्कम पुरेशा औचित्याशिवाय यामधील कमी केली जाते. मग याबाबत प्रश्न विमा कंपन्यांना विचारले तर कंपनी द्वारा नियमावर बोट ठेवले जाते. सोबतच आरोग्य विमा घेण्यापूर्वी पॉलिसीच्या अटी आणि शर्तींचे काळजीपूर्वक पुनरावलोकन केले होते का? असे सुनावले जाते. आज सर्व सामान्य माणूस आरोग्य विमा न घेण्याची मागील काही कारणे म्हणजे विमा कंपन्यांवर विश्वास नसणे, आरोग्य विमा घेण्याची प्रक्रिया जटिल, मुख्यतः दावा करण्याची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट असणे, पॉलिसीमधील छुप्या अटी व शर्ती असणे ही आहेत. अभिनेता सैफ अली खानच्या दाव्यामुळे आरोग्य विमा कंपन्या आणि यातील त्रुटी, दावा मंजूर करण्याबाबत सर्व सामान्य पॉलिसीधारकांना भेडसावणाऱ्या यातील अडचणी, यातील भेदभाव या इन्शुरन्स रेग्युलेटरी अँण्ड डेव्हलमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया जी भारतातील इन्श्युरन्स सेक्टरची देखरेख करणारी सरकारी संस्था आहे तिच्या तसेच केंद्र सरकार समोर आल्यात. या प्रकरणातून देशातील सर्व सामान्यांना आरोग्य विमा संबंधित दावा मंजुरीबाबत येणाऱ्या अडचणी केंद्र सरकार तसेच आयआरडीए येत्या काळात दूर करेल अशी आशा आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२१९५०७५०

●● ●●

### कारखान्यातील कामगारांची सुरक्षा आवश्यक

कारखान्यात वाढणाऱ्या अपघातांच्या घटनांमुळे कामगाराच्या सुरक्षेविषयी धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. कारखान्यातील अनेक कामगार धोक्याचे काम करीत असतात. त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी ही कारखान्यातील यंत्र सुरक्षा आधारित असते. कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षेकडे लक्ष देण्यासाठी कर्मचारी, अधिकारी नियुक्त केले जातात. परंतु कंपनीच्या फिटनेस बाबतीत अनेक कारखान्यांचे दुर्लक्ष होत असल्याने तेथे अपघाताच्या घटना वाढण्याचे प्रमाण वाढले आहे. कारखान्यात अनेक अत्याधुनिक यंत्रे बसविले असतात. त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने कामगारांना अपघाताला सामोरे जावे लागते. यात अनेक कामगारांना आपला जीवही गमवावा लागतो, तर काहींना अपंगत्व येते. अपघाताच्या घटनांमुळे कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले आहे. कारखान्यात काम करणारा कामगार धोक्याचे ठिकाणी काम करीत असताना कामगारांना सुरक्षा विषयक नियम आणि सुरक्षा देणारी व्यवस्था कारखाना प्रशासनाद्वारे देणे गरजेचे असते. परंतु कित्येक कारखान्यात याकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु कारखान्यातील कामगार सुरक्षा विषयक धोरण कागदोपत्री असल्याने त्यामुळे धोका पत्करला जात असतो. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कारखान्यामध्ये केला जात असून सुद्धा कामगारांना मोठा धोका पत्करावा लागत असतो. सुरक्षेविषयी निष्काळजीपणामुळे अनेक कामगारांना अपघातात जीव गमवाव लागतो. धोक्याचे काम करत असताना प्रशासनाद्वारे कामगारांच्या सुरक्षेची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच कारखान्यातील यंत्राच्या देखभालीकडे दुर्लक्ष न करता आवश्यक त्या सुरक्षा आणि सुविधेकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

●● ●●

### धर्माधिष्ठित समाज आणि शिक्षणाची आवश्यकता!

एक बातमी वाचली आणि मन सुन्न झाले. वारंवार तोच विचार मनात येत आहे. एका कोवळ्या वयाच्या बालिकेने पाश्चात्त्य विचारांच्या आणि ऑनलाईन गेमच्या अधीन जाऊन, मृत्यूनंतरच्या गूढ गोष्टी उलगडण्यासाठी पूर्वनियोजितपणे, शांत डोक्याने आत्महत्या केली. हे चित्र अजूनच बेचैन करून गेलं. कारण आजपर्यंत अनेक अशा घटनांमध्ये याच वर्गातील कोवळी बालके बळी पडलेली आहेत.

अशा घटना घडल्या की अनेक जण पालकांना दोष देऊन मोकळे होतात. पण माझ्या मते, अशा प्रकरणांमध्ये तथाकथित सर्वधर्मसमभाव ही समाजरचना आणि त्या आधारावरची आजची शिक्षणपद्धती कारणीभूत आहे. कारण केवळ हिंदूंच्या मनावर सर्वधर्मसमभावाचा पगडा जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आला आहे. यामुळे हिंदू वर्ग धर्मशिक्षणापासून दूर जात आहे. तथाकथित सर्वधर्मसमभावाच्या या समाजात मात्र मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्माचे शिक्षण आजही दिले जाते. तिथे कोणीही प्रश्न उपस्थित करत नाही. परंतु हिंदू शाळांमध्ये जरा कुठे गीतेचा अध्याय शिकवायचे म्हटले, तर दुर्दैवाने चार हिंदूच त्याला विरोध करतात आणि ते बंद करण्यास भाग पाडतात.

हिंदू धर्मात जन्मापासून मृत्यूपर्यंत आणि मृत्यूनंतरच्याही प्रत्येक रहस्याचे गूढ उलगडून सोप्या पद्धतीने सांगण्यात आले आहे. गुरुकुल पद्धतीत या सगळ्यांचा अभ्यास होत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शंका-कुशंका निर्माण होत नसत. परंतु आजच्या शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थी अर्धवट ज्ञानाने भरलेले आहेत. आजकाल शाळांमध्ये लैंगिक शिक्षणाचे तास घेतले जातात, असे ऐकले आहे. हे शिक्षण कशा पद्धतीने दिले जाते, त्यामध्ये जबाबदारीची जाणीव करून दिली जाते का? याचा विचार व्हायला हवा. कारण आज मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग रिलेशनशिपमध्ये गुंततो किंवा समलिंगी विवाहासारख्या समाजघातक गोष्टी अंगीकारतो.

एकंदरीत काय, तर धर्मशिक्षण नसल्यामुळे हिंदू विद्यार्थी धर्मांतरित होतो, हिंदू तरुणी लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकतात, हिंदू बालकांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे, तर काही जण रिलेशनशिपसारख्या समाजघातक गोष्टींकडे वळत आहेत. याला जबाबदार असलेल्या सर्वधर्मसमभाव या समाजरचनेत आणि शिक्षणव्यवस्थेत बदल होणे आवश्यक आहे.

आज माझ्या या विचारांवर अनेक जण विरोध करतील. या घटनेला धर्माचा रंग दिला किंवा आधुनिक शिक्षणपद्धतीवर टीका केली, असे म्हणतील. अशा सर्वांना हात जोडून विनंती आहे की कृपया याचा गांभीर्याने विचार करा. कारण अशा घटना एका विशिष्ट समाजातच वारंवार घडत आहेत. शिक्षणपद्धतीच्या संदर्भातील मुद्देही सगळ्यांनाच माहीत आहे.

विद्वान मंडळी, राजकीय क्षेत्रातील दिग्गज, शिक्षण क्षेत्रातील विचारवंत आणि प्रत्येक पालक यांनी याचा विचार करावा. पुन्हा गुरुकुलाप्रमाणे सर्वसमावेशक धर्मशिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या धर्माचे शिक्षण देण्याची सोय असावी. तेव्हाच खऱ्या अर्थाने सर्वधर्मसमभाव ही समाजरचना अस्तित्वात येऊ शकेल.

**केतकी हरदास**/नागपूर

●● ●●

### प्रदूषण रोखण्यासाठी आम्ही बदलणे आवश्यक

'प्रदूषण, भारतीय संस्कृती आणि आम्ही' हा अग्रलेख वाचला. प्रदूषण हे आजच्या काळातील सर्वांत मोठे आव्हान बनले आहे. ते आपल्या पर्यावरणाला, आरोग्याला आणि जीवनशैलीला मोठ्या प्रमाणात प्रभावित करत आहे. भारतासारख्या देशात, जिथे संस्कृतीची मुळे खूप खोलवर रुजलेली आहेत, प्रदूषणाने आपल्या परंपरा आणि मूल्यांनाही धोक्यात आणले आहे.

भारतीय संस्कृती ही निसर्गाशी एकरूप होण्याची शिकवण देते. आपल्या वेद, पुराण आणि इतर धार्मिक ग्रंथांमध्ये निसर्गाचे देवत्व करण्यात आले आहे. वृक्षांची पूजा, नद्यांचे पूजन, पर्वत आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण या गोष्टी आपल्या संस्कृतीचाच एक भाग आहेत. मात्र, आजच्या काळात आपण या मूल्यांपासून दूर जात आहोत. वायुप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण आणि मृदाप्रदूषण. या सर्व प्रकारच्या प्रदूषणाचे आपल्या आरोग्यावर, पर्यावरणावर आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम होतात. प्रदूषणामुळे श्वसनाच्या समस्या, कर्करोग, हृदयविकार आणि इतर अनेक आजार होण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रदूषणामुळे जैवविविधता नष्ट होत आहे, हवामान बदल होत आहे आणि नैसर्गिक संसाधने संपत आहेत. प्रदूषणामुळे उत्पादकता कमी होते, पर्यटन उद्योगाला धक्का बसतो आणि आरोग्य सेवांवर खर्च वाढतो.

भारतीय संस्कृतीने निसर्गाचे संरक्षण करण्याचे शिकवले असले आज आपण पाहतो की आपणच निसर्गाचे सर्वांत मोठे शत्रू बनले आहोत. प्रदूषणामुळे आपली संस्कृती आणि मूल्ये धोक्यात आली आहेत. प्रदूषणामुळे नद्या आणि तळी प्रदूषित झाले आहेत, ज्यामुळे धार्मिक स्थळांचे सौंदर्य कमी झाले आहे. प्रदूषणामुळे पर्वत आणि वने नष्ट होत आहेत, ज्यामुळे आपले धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांना आधार देणारे निसर्ग सौंदर्य नष्ट होत आहे. प्रदूषणामुळे औषधी वनस्पतींचे नुकसान होत आहे. कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे आणि योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे, खाजगी वाहनांचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे, ऊर्जा वाचवण्यासाठी प्रयत्न करणे, अधिकाधिक झाडे लावणे, सरकारला पर्यावरण संरक्षणासाठी कठोर कायदे करण्यासाठी दबाव टाकणे आवश्यक आहे. ▮

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

## संस्कृती

**श्रीश देवपुजारी**

# सरस्वती पूजनाचे औचित्य

१९६०-७० च्या दशकात शाळांमध्ये दर शुक्रवारी सरस्वती पूजन होत असे. गूळ-फुटाण्याच्या प्रसादाची प्राप्ती हाच बालगोपालांचा आनंदाचा विषय. 'सरस्वती विद्येची देवता' आहे, इतकेच वाक्य विद्यार्थ्यांना माहिती असे. पण विद्या म्हणजे काय, विद्यार्थी या शब्दाचा अर्थ काय, याची पुसटशी कल्पना त्या काळात शालेय विद्यार्थ्यांना नसायची. सरस्वती नदी अस्तित्वात नाही. तेव्हा आपली भारतीय सभ्यता ही सिंधू घाटी सभ्यता आहे, हे इतिहासाच्या पुस्तकात लिहिलेले असे.

१९८०-९० च्या दशकात मोरोपंत पिंगळे व प्रसिद्ध पुरातत्त्वविद् डॉ. वाकणकर (उज्जैन) यांनी सरस्वती शोधयात्रा काढली. या उपक्रमाला जगाधरीचे उद्योजक पद्मश्री दर्शनलाल जैन व चेन्नईचे शोधकर्ता कल्याण रमण यांनी वाहून घेतले. त्यांच्यासारख्या अनेकांच्या प्रयत्नाला यश येऊन आज भारतीय हे सांगण्याच्या स्थितीत आले आहेत की, सरस्वती नदी अस्तित्वात होती व भारतीय सभ्यतेचा उद्भव सरस्वती नदीच्या तीरावर झाला.

**सरस्वती सभ्यतेचा उद्गम** : आयआयटी, आयआयएससी, ओएनजीसी, इस्रो इत्यादी संस्था व इतर शास्त्रसंबद्ध संस्था (जशा पुरातत्त्वशास्त्र, भूगर्भशास्त्र, जलविज्ञान, हिमनदी शास्त्र, दूरस्थ संवेदन, भूगर्भीय जल इत्यादी) यांनी हे सिद्ध केले आहे की, आता सरस्वती नदी हे सत्य आहे. उपग्रहांच्या द्वारा प्राप्त चित्रे, भूजल संशोधन, वेगवेगळी शोधपत्रे, सर्व्हे ऑफ इंडियाचे मानचित्र व महसूल रेकॉर्ड सरस्वतीच्या सत्यतेला प्रमाणित करतात. ऋग्वेदात सरस्वतीची 'अम्बीतमे, नदीतमे व देवितमे' अशी विशेषणे वापरली आहेत. आमच्या प्राचीनतम सभ्यतेच्या विकासात सरस्वती नदीचे विशेष स्थान आहे. भूपरिवर्तनामुळे १६०० किलोमीटर लांबीच्या हिमालयापासून सिंधू सागरापर्यंत वाहणाऱ्या सरस्वती नदीचे पाणी आटले. ही घटना ४००० इसवीसनापूर्वी झाली असावी, असे आजपर्यंत प्रकाशित शोधांवरून अनुमान करता येते. पण भारतीयांच्या मनातील सरस्वती अजून जिवंत आहे.



हिमालय पर्वताच्या गढवाल क्षेत्रातल्या बंदरपूंछ हिमनद्यांच्या समूहापासून सरस्वती नदीचा उद्गम झाला. दक्षिण-पश्चिम दिशेने वाहात जात शिवालिक पर्वत शृंखलेच्या पायथ्याशी, हरयाणा प्रांतातील, यमुनानगर जिल्ह्यातील, आदिबद्री या स्थानी ही नदी भूमीवर अवतरित झाली. हिच्या तटावर कुरुक्षेत्र, सिरसा, कालीबंगन, पिलिबंगन, सूरतगड, पेहोवा इत्यादी नगरांचा विकास झाला. पेहोवा हे नाव पृथू राजाच्या नावावरून पडले आहे. पृथूने आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर १२ दिवस भेटीला येणाऱ्यांना सरस्वतीचे पाणी पाजले, असा उल्लेख ऋग्वेदात आहे. मार्कण्डेय, वशिष्ठ, विश्वामित्र, पराशर, याज्ञवल्क्य, च्यवन, कपिल मुनी इत्यादी ऋषींचे आश्रम सरस्वती नदीच्या काठी होते. ही नदी पुढे पंजाब, राजस्थान, गुजरात या राज्यांमधून वाहात सागराला मिळते. १२०० पेक्षा अधिक गावे या नदीच्या तटावर होती. या नदीचे पात्र ३ ते १२ किलोमीटरपर्यंत रुंद आढळते. यावरून नदी किती विशाल असेल, याची कल्पना येते.

सरस्वती नदीचा उल्लेख ऋग्वेदात ७५ वेळा आहे; उलट गंगेचा उल्लेख केवळ एकदाच आहे. आदिबदरी येथे व्यासांनी १८ हजार श्लोकांच्या भागवत पुराणाची रचना केली. महाभारतातील युद्ध सरस्वती व द्रिशद्वती या दोन नद्यांच्या मधल्या भूमीवर लढले गेले, असा उल्लेख महाभारतात आहे. त्या संपूर्ण युद्धभूमीलाच कुरुक्षेत्र म्हणतात. या नदीमुळे एकेकाळी थार वाळवंट हिरवेगार होते. या नदीच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न व्हावेत, अशी जनतेची मागणी आहे.

**विद्या** : विद्येची देवता सरस्वती हिचे पूजन शिशिर ऋतूत, माघ महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या पंचमीला होते. या तिथीला 'वसंत पंचमी'देखील म्हणतात. हा पूर्व भारतात समाजोत्सव आहे. विद्या या शब्दाची व्याख्या विष्णुपुराणात 'सा विद्या या विमुक्तये' अशी केली आहे. म्हणजे विद्या तिला म्हणतात, जी मुक्ती प्रदान करते. सध्या जे शिक्षण सामान्य विद्यालय, महाविद्यालय व विश्वविद्यालयांमध्ये दिले जाते ते 'नियुक्ती' प्रदान करते, मुक्ती नाही. जी शास्त्रे भारताच्या बाहेर उत्पन्न झाली आहेत, ती सगळी नश्वर जगताशी संबंधित आहेत. म्हणून त्यांना लौकिक शास्त्रे म्हणतात. तीच शास्त्रे शिक्षणात आहेत. उदा. भौतिक, रसायन, जीव, वनस्पती इत्यादी. भारतात दोन्ही प्रकारची शास्त्रे विकसित झालीत - लौकिक व अलौकिक. अलौकिक शास्त्रे मुक्ती प्रदान करतात. अलौकिक शास्त्रे केवळ संस्कृत विद्यालय, महाविद्यालय व विश्वविद्यालयांमध्ये शिकविली जातात.

**अलौकिक शास्त्रे** : संस्कृत भाषेत १६ दर्शनांचे प्रतिपादन 'सर्वदर्शनसंग्रह' या माधवाचार्यांनी लिहिलेल्या पुस्तकात केले आहे. त्यातील चार्वाक दर्शन सोडले तर अन्य १५ दर्शनांचे उद्दिष्ट मुक्ती, समाधी, मोक्ष, कैवल्य, निर्वाण हे आहे. ती १५ शास्त्रे म्हणजे विद्या. यापैकी किमान एक शिकणे व त्यानुसार जीवन यापन करणे म्हणजे विद्येची उपासना करणे. याचाच अर्थ सरस्वतीची आराधना करणे. यासाठी आधी संस्कृत भाषा व नंतर व्याकरण शिकावे लागते, तेव्हाच शास्त्रात प्रवेश होतो. म्हणून आपण सर्वांनी संस्कृत शिकायला वसंत पंचमीपासूनच सुरुवात करावी व संकल्प करावा की मी पुढे शास्त्र शिकेन. ▮

संस्कृतभारती

shreeshdeopujari@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# महानुभाव पंथाच्या श्रद्धास्थळांचा विकास करणार : फडणवीस

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०२ फेब्रुवारी**

पुढील पाच वर्षामध्ये महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रध्दास्थळांचा विकास करण्याचा संकल्प राज्य शासनाने केला आहे. काही ठिकाणी विकास कामांना सुरुवात झाली आहे, उर्वरित ठिकाणी लवकरच कामे सुरु होतील,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

नांदेड जिल्ह्यातील महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या हदगाव येथील श्री. गुरुवर्य बापू नगर परिसरातील श्रीकृष्ण देव उखळाई मंदिराच्या नवपर्व व कलशारोहण सोहळ्यात उद्घाटक म्हणून ते उपस्थित होते. मराठवाडा,विदर्भ व महाराष्ट्रातील ठीक ठिकाणच्या महानुभाव पंथाच्या मठाधिपतींसह हजारोच्या संख्येने महानुभवपंथीय या सोहळ्याला उपस्थित होते.

वैराग्यमूर्ती मठाधिपती महंत श्री. योगी बापू यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तर माहूर पिठाधीश कवीश्वराचार्य माहुरकर बाबा यांच्यासह परिसरातील मठाधिपती धर्मपीठावर विराजमान होते. महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या या मठाधिपतींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महानुभाव पंथीयांसाठी केलेल्या कार्यकर्तृत्वाला लक्षात घेऊन स्तुती सुमनांनी साकारलेले सन्मानपत्र बहाल केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम चक्रधर स्वामीना दंडवत घातला. त्यानंतर धर्मपीठावरून बोलताना सर्वज्ञ चक्रधर स्वामी व त्यांच्या अनुयायांनी अतिशय विपरित परिस्थितीत धर्म रक्षणाचे कार्य केल्याचे स्मरण केले.महानुभव पंथीयांच्या कार्यकर्तृत्वाचा त्यांनी गौरव केला.परकीय आक्रमणामुळे कृष्णदेवाची पुजा करून घेणे, हिंदू म्हणवून घेणे कठीण होते. त्या काळात चक्रधर स्वामीनी जातीपाती, पंथाचा विचार न



करता महानुभव दाखवला, समरसता व समतायुक्त समाज त्याकाळी देशात निर्माण केला.

महाराष्ट्र शासनाने राज्यभरात आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी महानुभाव पंथीयांचे मंदिर आहेत. त्या मंदिरांचा विकास करण्याचे काम केल्याचे सांगितले.रिद्धपुरचा पांचाळेश्वर, जाळीचा देव, गोविंदप्रभू देवस्थान या अनेक ठिकाणी संवर्धनाचे काम सुरु आहे. याही पुढे हे कार्य सुरू राहील,असे आश्वस्थ केले. तसेच या स्थळांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे हटविण्यासाठी चर्चे तून मार्ग काढून येथील विकास कामे केली जातील. चांगल्या कामांसाठी राज्य सरकार ताकदीने पाठिशी उभे राहील, असे सांगितले.

यावेळी त्यांनी महानुभावपंथीयांच्या ग्रंथ प्रेमाची, धर्म साहित्य निर्मितीच्या चिकाटीचे कौतुक केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, राजमान्यता मिळाली. यामध्ये महानुभाव साहित्याचा मोठा वाटा आहे. आपण जे पुरावे दिले आणि जे स्वीकारले गेले.यातील एक महत्वाचा पुरावा लीळाचरित्र होते. मराठी भाषा किती प्राचीन याचा पुरावा यानिमित्ताने देता आला.लीळाचरित्र ग्रंथ ज्या ठिकाणी लिहिला गेला, त्या रिद्धपूरला मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठाचा विकास पुढील टप्यात करण्यात येणार आहे. महानुभाव पंथाच्या माध्यमातून मराठी भाषा विद्यापीठाचा उपयोग करून आपले साहित्य ,विचार,अध्यात्म जगभरामध्ये पोहोचवण्याचे काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. देशाच्या कानाकोप-यात नाही तर अफगाणिस्तानपर्यंत महानुभव पंथ पोहोचला आहे. आज इतका मोठा संप्रदाय आपल्याला समतेच्या अधिष्ठानावर काम करतांना दिसतो. आज या धर्मपीठावर या स्थानावर इतकी मोठी महंत मंडळी येऊन गेली. तत्पूर्वी, त्यांनी आगमन झाल्यानंतर जीर्णोद्धार करण्यात आलेल्या उखळाई माय मंदिरात जाऊन मायचे विडाअवसर ( दर्शन घेतले ) केले. आजच या ठिकाणी संत महात्म्यांच्या उपस्थितीत कलशारोहण झाले. हे मंदिर पाचशे वर्षापूर्वीचे असल्याची मान्यता आहे. यावेळी त्यांनी श्रीकृष्ण मूर्तीचे भक्तार्पण केले. कार्यक्रमाचे आयोजक वैराग्यमूर्ती दत्ता बापू यांचा त्यांनी सत्कार केला. भक्तांना प्रातिनिधिक सेवा पुरस्कार बहाल केला. या कार्यक्रमाला बाळासाहेब ठाकरे हरीद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ.हेमंत पाटील, हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर,आ. भीमराव केराम, आ. आनंद पाटील बोंढारकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर,आ. बालाजी कल्याणकर,नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार सुरेखा नांदे, आदीसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या महानुभव पंथाचे पिठाधीशांसह मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक योगीबापु विद्वांस यांनी केले तर आभार संदिपराज दादा कपाटे यांनी मानले. यावेळी अविनाश ठाकरे व कारंजेकर बाबा यांनी मनोगत व्यक्त केले.

**महाराष्ट्रातील उपस्थित पीठाधीश**

अ.भा.म.प. अध्यक्ष प.म.श्री विद्वांसबाबा, माहूर पिठाधीश आचार्य श्री माहूरकरबाबा, उपाध्य कुळाचार्य वर्धनस्थबाबा, प.म.श्री. रिधपुरकर बाबाजी, पारिमांडाल्य कुळाचार्य लासुरकर बाबाजी, कविश्वर कुळाचार्य करंजेकर बाबाजी, प.म.श्री मठाधीपती महंत योगीबापु, श्रीगुरु दत्ताबापु, गोपीराजबाबा, कान्हेराज बाबा विद्वांस,पुणंताबेकर महानुभाव, परसराज बाबा विद्वांस, संदीपराज शास्त्री कपाटे, अर्जुनराज दादा नांदेडकर, रमेशराज शास्त्री कपाटे, महंतबाबा वाघोदेकर, बाळकृष्णदादा सरळ, भाईदेवमुनी नांदेडकर, मधुकरदादा धाराशिवकर,विजयराजदादा कारंजेकर आदीसह अन्य पिठाधीशांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी श्रीमती शकुंतला पाटील

**देगलूर**-तालुक्यातील शिवणी येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक जाहीर करण्यात आली होती.रमेश सोनकांबळे शिवणीकर माजी पं. स. सदस्य देगलूर यांच्या मार्गदर्शनाखाली ती निवडणूक न करता गावातील प्रतिष्ठित नागरिकांना एकत्र बसून निवडणूक न करता बिनविरोध करण्याचे ठरवण्यात आले. त्यात चेअरमन पदासाठी श्रीमती शकुंतलबाई निळकंठराव पाटील तर वाईस चेअरमन इरशेट्टी माधप्पा जक्कावाड यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आले.सदस्य हणमंत मारोती पेंडपल्ले,माणिक संगप्पा कवरे, संग्राम गवर्धन पाटील, रमेश लालू सोनकांबळे,रमेश इरन्ना पेंडपल्ले, शिवराज हणमंतराव पाटील, हणमंत मारोती माली पाटील, संजय गंगायप्पा मठपती, हणमंत सिद्धगोड्डा हड्डे, यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आले आहे. निवडणूक अधिकारी म्हणून श्री तम्मेवाड,गुलबराव कुलकर्णी,सचिव राजुरे यांनी कार्यरत होते. या वेळी उपसरपंच नंदकुमार पाटील, हणमंत बुक्के, बसवंत जक्कावाड,शिवराज तांगवार, बसवंत तांगवार, रघुनाथ गाडेकर, चंद्रकांत मठपती, बसवंत चेंडके, चंद्रकांत वाघमारे, बाबू उपलवारे, गंगाराम उपलवारे, शिवराज कवरे, विजय कुलकर्णी, माधव जक्कावाड, दयानंद मठपती, व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते. त्यांच अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिले.

### मुदखेड मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार साहेबराव हौसरे यांचा सत्कार



**मुदखेड**-सामाजिक शैक्षणिक साहित्यिक सांस्कृतिक आधी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुदखेड येथील दैनिक गोदातीर समाचारचे ज्येष्ठ पत्रकार साहेबराव हौसरे यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठाण उमरीच्या वतीने दि.२७ जानेवारी रोजी मुदखेड येथे चौथ्या जनसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य समेलनात माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आला आहे. साहेबराव हौसरे यांना उत्कृष्ट पत्रकारिता २०२५ चा पुरस्कार मिळाल्याबद्दल मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने दि. ३१ जानेवारी रोजी शासकीय विश्रामग्रह येथे त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. तसेचे सा. सिता वार्ता चे मुख्य संपादक कुणाल चौधरी यांनी देखील हौसरे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी सा. देशवाणीचे संपादक शेख अजगर हुसेन साब, उत्तम हानमंते, साहेबराव गागलवाड, संतोष पाटील गाडे,प्रल्हाद मस्के, सिद्धार्थ चौदंते, धम्मा कांबळे, अब्दुल रज्जाक, हाफिज कुरेशी, महम्मद हकिम, यांची उपस्थीती होती.साहेबराव हौसरे यांना पुरुस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

### साध्वी मुक्ताईनाथ माऊली यांच्या भागवत कथेला उमरीत सुरूवात

**उमरी**-उमरी शहरातील श्रीसंत दासगणूनगर, शिक्षक कॉलनी भागात दिनांक २ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण



व लक्ष्मण शक्ती प्रसंग कथेचे आयोजन करण्यात आले आहे. साध्वी बालयोगिनी महंत ह भ प मुक्ताईनाथ माऊली यांची दररोज दुपारी एक ते चार वाजेपर्यंत श्रीमद् भागवत कथा होणार आहे. दरम्यान या सप्ताहात काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भागवत कथा, हरिपाठ व रात्री हरी जागर असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. ज्ञानेश्वरी व्यासपीठ प्रमुख ह भ प बालाजी महाराज ठाकूर, संगीतमय साथ देण्यासाठी मृदंगाचार्य मनोजकुमार सिंगनगावकर, गायनाचार्य संतोष महाराज बितनाळकर, दिगंबर पांचाळ, राम महाराज ठाकूर, ज्ञानेश्वर देवकर, कृष्णा वडजे, पुंडलिक मंगलवाड, प्रमोद करडे, भजनी मंडळातील तुकाराम पेशरवार, किशन देवकर, पप्पू देवकर, आनंदा सिंगनवाड, गणेश वडजे, शिवाजी मंगरूळे, दिगांबर पांचाळ यांची संगीत साथ लाभणार आहे. दिनांक आठ फेब्रुवारी सायंकाळी सहापासून ते दिनांक नऊ फेब्रुवारी सकाळी सात वाजेपर्यंत लक्ष्मण शक्ती प्रसंग कथा होईल. तसेच दिनांक नऊ फेब्रुवारी सकाळी दहा वाजता साध्वी बालयोगीनी महंत ह भ प मुक्ताईनाथ माऊली यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सर्व धार्मिक कार्यक्रमाच्या भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसंत दासगणू नगर, शिक्षक कॉलनी उमरी येथील समस्त गावकरी मंडळींनी केले आहे.

# नांदेडमध्ये आजपासून दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,दि. ०२ फेब्रुवारी**

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातर्गत जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि ३ व ४ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले असून या संदर्भात जिल्हा समाजकल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील दिव्यांग शाळेच्या सर्व मुख्याध्यापकांसह व्यवस्थापकीय अधीक्षक व समिती प्रमुखांनी या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेची जय्यत तयारी केली आहे.

३ डिसेंबर जागतिक दिनाचे औचित्य साधून दरवर्षी दिव्यांगाच्या शाळेतील विदयार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत घेण्यात येते.दिनांक ३ फेब्रुवारी रोजी दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा पोलीस कवायत मैदानात होणार आहेत. तसेच दिनांक ४ फेब्रुवारी रोजी कुसुम सभागृह नांदेड येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी अभिजित राऊत, स्वामी रामानंद विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी किर्तिका सी.एम, श्रीमती दलजितकौर जज, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. संदिप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा राजकुमार मुक्कावार, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग लातूर अविनाश देवसटवार,सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग नांदेड शिवानंद मिनगिरे, जिल्हा माहिती अधिकारी, प्रविण टाके, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत व सांस्कृतिक कार्यक्रमात दिव्यांगाच्या अस्थिव्यंग, मूकबधिर, मतिमंद, अंध या प्रकारातील जवळपास ८५० मुले मुली सहभागी होणार आहेत. या दिव्यांग विदयार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हा समाजकल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी सर्व मुख्याध्यापक, व्यवस्थापकीय अधीक्षक, विविध समित्याचे प्रमुख व सदस्य यांच्या उपस्थितीत दिव्यांग विदयार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था, भोजन व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, मैदानाची व्यवस्था, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन या सह अनेक विषयायांचा तेरा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

# आदिवासी महिलांचा आज स्नेहमिलन मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

देशातील अनेक मागास समाजापैकी एक पण स्वाभिमानी असलेली आदिवासी जमात भलेही स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवनंतरही आर्थिकदृष्ट्या कमकुवत असेल परंतु सांस्कृतिक आणि नैसर्गिकदृष्ट्या मजबूत आहे. आदिवासी समाजात आजही मातृसत्ताक संस्कृती असून एकूण लिंग गुणोत्तराचा विचार करता महिलांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. याच समाजातील महिला माता सावित्री, माता जिजाऊ, माता रमाई यांचा वारसा जपत हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करून ३०० च्यावर महिलांना पुस्तकांचे वाण देणार आहेत. याप्रसंगी समाजातील प्रतिष्ठित महिलांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. शहरातील मालेगाव रोडवरील रेड्डी गार्डनमध्ये ३ फेब्रुवारी रोजी आंध आदिवासी महिला मेळावा,हळदी कुंकू व स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आदिवासी महिलांचे नृत्य,गायन, मूक अभिनय, भजन, खेळ व वक्तृत्व अशी अनेक कला गुणदर्शन, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

त्याच ठिकाणी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आणि इतरही अनेक वस्तूंचे विक्रीसाठी स्टॉलही लावण्यात येणार असून ३०० आदिवासी महिला मेळाव्यात सहभागी होणार आहेत. सोमवारी सकाळी ११ पासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही विविध वस्तूंची विक्री होणार असून ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन आंध आदिवासी महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आदमपुरात हरिनाम सप्ताह व भागवत कथेला आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. ०२ फेब्रुवारी**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे सोमवार दि.०३ फेब्रुवारी पासून ४५ व्या अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथेला प्रारंभ होत आहे. भागवताचार्य ह.भ.प.योगेश महाराज अग्रवाल वसमतकर यांच्या रसाळ वाणीतून नियमित दुपारी २ ते ५ प्रवचन ऐकता येणार आहे.समवेत ऑर्गन वादक संतोष महाराज, तबला वादक सोपान महाराज, झाँकीवाले बापू महाराज अमळनेरकर हे साथसंगत करणार आहेत. हा भक्तिरूपी सोहळा यशस्वी करण्यात सर्व गावकरी एकमनाने गुंतले आहेत. येथील अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा आदमपूर गाव परिसरात दरवर्षीप्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण असते. दि.०३ फेब्रुवारी पासून क्रमाने ह.भ.प. व्यंकट महाराज एकलारकर, ह.भ.प. चंद्रकांत महाराज लाठीकर, वारकरी भूषण ह.भ.प. ज्ञानोबा माऊली महाराज सिंदगीकर, ह.भ.प.माधव गुरूजी वडगावे पांगरीकर, ह.भ.प.वासुदेव महाराज कोलंबीकर,ह.भ.प.गुरूराज महाराज देगलूरकर, ह.भ.प. योगेश महाराज गवंडगावकर, अखेर दि.१० फेब्रुवारी रोजी ह.भ.प.चांगदेव महाराज काकडे कंडारीकर यांच्या उपस्थितीत काल्याचे किर्तन हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

# नव्या घड्याळाचे काटे आता लवकरच फिरणार..!

## पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

जुना मोंढा येथील ऐतिहासिक टॉवरवरील घड्याळ बसविण्याची प्रक्रिया नांदेड वाघाळा महापालिकेने सुरु केली असून त्यासाठी संबंधित ठेकेदारांकडून लवकरच निविदा दरपत्रके मागविण्यात येणार असल्याची माहिती आहे. पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी ही घड्याळ बसविण्यासाठी मनपा नांदेडसह थेट मंत्रालयात धडक मारली होती. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

नांदेड शहरातील जुना मोंढा भागात शहराचे वैभव असलेल्या टॉवरवरील घड्याळ गेल्या अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत आहे.



मनपा उद्यान विभागाने २०१८ मध्ये नवीन घडी बसविली होती. परंतु ती बंद बडली. तेव्हापासून घड्याळ्याचे काटे स्थिर आहेत. ही घडी बसविण्यात यावी व शहराचे गतवैभव पुन्हा प्राप्त व्हावे यासाठी पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी गेल्या काही दिवसांपासून स्थानिक मनपा प्रशासनासह नगरविकास मंत्रालय आणि मुख्यमंत्र्यांना निवेदने सादर करून याकडे लक्ष्य वेधले होते. वागदरीकर यांच्या निवेदनाची दखल घेऊन मनपा आयुक्तांनी नांदेड-वाघाळा महापालिका उद्यान अधिक्षकांना नवीन घड्याळ बसविण्यासाठी आवश्यक त्या निविदा दरपत्रके मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्याच्या सूचना काही दिवसांपूर्वीच दिल्या आहेत. त्यामुळे टॉवरवरील घड्याळ बसविण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली असून पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याचे मानले जात आहे.

# पारसमल दर्डा यांची रेल्वे डिव्हिजन सदस्यपदी हॅट्रीक बिनविरोद्ध निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०२ फेब्रुवारी**

उमरी शहरातील प्रसिद्ध व्यापारी पारसमल दर्डा यांची हैद्राबाद रेल्वे डिव्हीजन सदस्य पदी पुनच्छ एकदा निवड झाली असून रेल्वे विभागात सदस्यपदी निवड होण्याची हॅट्रीक झाली आहे.



हैद्राबाद रेल्वे विभागाने पारसमल दर्डा यांचे उमरी रेल्वेस्टेशन सह विभागात मोडणाऱ्या विविध रेल्वेस्टेश समस्या संदर्भात महत्वाचे मुद्दे समोर करून जनतेच्या समस्याचे निवारण केले आहे दर्डा यांनी वेळो वेळी पदाचा उपयोग जनहितासाठी केल्याने यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांची दखल घेऊन हैदराबाद डिव्हिजनच्या रेल्वे डी. आर. यु. सी. सी. सदस्य पदी फेर निवड करण्यात आली आहे. त्यांची निवड झाल्याबद्दल खासदार प्राचार्य रवींद्र चव्हाण, राज्यसभा खा. अशोक चव्हाण, खा.अ डॉ. अजित गोपछडे, आ. राजेश पवार, माजी आ. प्रकाश पोकर्णा, उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर, भाऊसाहेब देशमुख गोरठेकर, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, माजी नगराध्या प्रविणभाऊ सारडा, नांदेड जिल्हा मधवर्ती बॅक संचालक कैलास देशमुख गोरठेकर, उमरी भाजपा नेते बापूसाहेब कौवडगावकर, प्रसिद्ध व्यापारी खाज्या सेठ , शिवसेना शिंदे गट तालुका प्रमुख सुभाष पेरेवार, शासकीय गुत्तेदार संजीव विठ्ठलराव सवई, शेतकरी पुरस्कृत नेते सुभाष देशमुख गोरठेकर (नाना), विष्णू पंडित, विष्णू अट्टल, अनिल दर्डा, बाबू राजा झंवर, महेश पंडित, श्यामसुंदर लापसेटवार, पत्रकार बी .व्ही चव्हाण, पी. जी. गिलचे , शेख हुसेन्नी , लक्ष्मीकांत देशमुख, प्रल्हाद हिवराळे, अब्दुल समद, अनिल सोनकांबळे, कैलास सोनकांबळे, साहेबराव तुरेराव, त्रिरत्न सवई, अशोक मामीडवार, गजानन श्रीरामवार, श्रीनिवास अनंतवार, विठ्ठल मुकावार बालाजी येरावार, न. पा वरिष्टीट लिपीक गणेश मदने, दासा शिंदे, नगसेवक प्र. सोनू वाघमारे, रतन खंदारे छावा राजेश जाधव तालुक्यातील सर्व साराजीक राजकीय संघटना , व्यापारी मित्रपरिवार उमरी रेल्वे स्टेशनचे सर्व कर्मचारी पत्रकार बंधू आदींनी पारसमल दर्डा यांच्या निवडी बद्दल अभिनंदनाचा वर्षाव करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत .

# मंदिराच्या उभारणी साठी पुढाकार घ्यावा : बिंगेवार

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०२ फेब्रुवारी**

समाज बांधव एक संघ राहवे, शिक्षणाचा ध्यास घ्यावा व प्रगती साधावी तसेच सर्वांच्या आर्थिक सहकार्याने मार्कंडेय मंदिराच्या उभारणी साठी पुढाकार घ्यावा असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष जगन्नाथ बिंगेवार यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जगन्नाथ बिंगेवार तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा. शंकरराव कुंटुरकर, प्रा. शंकर पवार आदि उपस्थित होते. या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महर्षि मार्कंडेय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याच कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी व समाज संघटनेचे नवनियुक्त पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास पोशट्टी सब्बनवार, नरेश जिठ्ठावार, नरेश सब्बनवार, डॉ. अश्विनी सब्बनवार, राजेश्वर कनकमवार, साईनाथ बाबलीकर, राहुल सब्बनवार, अशोक पडकुटलावार यांच्या सह शहर व परिसरातील महिला व पुरुष उपस्थित होते.

# उपविभागीय कृषी अधिकारी राजकुमार रणवीर यांची भोकर येथे प्रक्षेत्र भेट

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ०२ फेब्रुवारी**

दि.२७ जानेवारी २०२५ रोजी भोकर येथील भोसी ताटकळवाडी बोरवाडी आमदारी वाडी व वाकद येथे उपविभागीय कृषी अधिकारी राजकुमार रणवीर तसेच मंडळ कृषी अधिकारी भोकर प्रमोद कद्रेकर यांनी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत ठिबक व तुषार ची तपासणी तसेच राष्ट्रीय अन्न व पोषण अभियानांतर्गत रब्बी गहू लागवड प्रात्यक्षिक यांची पाहणी केली.

त्यासोबतच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बराटे यांनी तालुका कृषी अधिकारी भोकर कार्यालयास भेट देऊन मा.मुख्यमंत्री यांच्या क्षत्रिय तसेच कार्यालयीन १०० दिवसांच्या कृती आराखड्याबाबत कार्यालयीन तसेच क्षत्रिय कर्मचाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना सूचना दिल्या तसेच कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रात्यक्षिके कृषी यांत्रिकीकरण योजना इत्यादी कामांची पाहणी केली यावेळी तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी याबाबत कृषी विभागाच्या योजना सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. आनंद रूमनवाड बोरगाव या शेतकऱ्यांनी त्यांच्या प्रक्षेत्रावर लागवड केलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पेरू पिकाच्या लागवडीची पाहणी केली तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर व पावर विडर याची तपासणी केली व सदरील अवजाराचे वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करण्यात यावे अशा सूचना दिल्या. सदरील भेटीदरम्यान कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना बाबत प्रक्षेत्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी प्रात्यक्षिक प्लॉटची पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे जेणेकरून त्यांचे आर्थिक स्थैर्य व उत्पादनात वाढ होईल अशा सूचना दिले तसेच पुढील आठवड्यामध्ये इतर मंडळातील विविध प्रक्षेत्रांना भेटी देण्यात येणार असण्याचे सांगितले.

# अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळ सिडको कार्यालयातील कामास विलंब : साटोटे

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

नांदेड येथील सिडको कार्यालयातील मालमत्ता धारकांची कामे वेळेवर होत नसल्याने शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांनी सिडको प्रशासक गजानन साटोटे यांना विचारपुस करण्यात आली.

तेव्हा यापुढे येथील कामे प्रलंबित राहणार नाहीत असे आश्वासन सिडको कार्यालयाचे प्रशासक यांनी दिले. नांदेड सिडको कार्यालय येथील मालमत्ता धारकांचे व भोगवटदारांचे कामे वेळेवर होत नसल्याने शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांनी प्रशासक गजानन साटोटे यांना धारेवर धरून जाब विचारण्यात आला.



सिडको येथीलअनेक लोकांचे कामे प्रलंबित असताना तुम्ही वेळेवर कामे का ? करत नाही. चार चार महिने एखाद्या कामासाठी मालमत्ता धारकांना कार्यालयाच्या चकर माराव्यात लागतात तेव्हा तुम्ही काय करता. असे अनेक प्रश्न उपस्थित करून प्रशासकास धारेवर धरले तेव्हा प्रशासक गजानन साटोटे यांनी सांगितले की या कार्यालयात पूर्वीपासूनच अपुरे कर्मचारी असल्याने व माझ्याकडे चार चार कामे पाहण्याची जबाबदारी वरिष्ठांनी दिली असल्यामुळे मला महिन्यातून काही दिवस तिकडे काही दिवस इकडे काम लागते. तेव्हा मला सारखे वेगवेगळ्या ठिकाणी दोन दोन दिवस कामे करत फिरावे लागते. त्यामुळे कामाला विलंब लागत असतो सदरील समस्या सोडविण्यासाठी मी वरिष्ठांना कर्मचारी वाढवण्या विषयी चर्चा करून सदरील प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करीन. सदरील कार्यालयीन कामकाजाची विचारपूस करने विनय गिरडे यांचे योग्येच असल्याचे ही सांगितले. तसेच या ठिकाणच्या दलाला मुळे इतर लोकांचे कामे प्रलंबित आहेत. मी माझ्याकडून कामे प्रलंबित राहू देत नाही. यापुढे दलालांना या कार्यालयात येण्यास आवर घालण्याचे आदेश मी दिले आहेत. अशी माहिती सिडकोचे प्रशासक साटोटे यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रेल्वेमार्गासाठी निधी मंजूर करुन तातडीने काम सुरु करा! : खा. देशमुखांची रेल्वेमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०२ फेब्रुवारी**

यवतमाळ-वाशिमसह नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना रेल्वे सुविधा उपलब्ध व्हाव्यात व या भागातील पर्यटनाला चालना मिळावी या दृष्टीने यवतमाळ -वाशिम लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे (ऊबाठा) खा. संजय देशमुख यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची दि.३१ जानेवारी रोजी भेट घेत महत्त्वाच्या रेल्वे मार्गांची कामे व्हावीत अशी मागणी त्यांनी या भेटीदरम्यान केली. विशेष महत्वाचे म्हणजे वाशिम-पोहरादेवी-दिग्रस-माहूर

आदिलाबाद व वाशिम-बडनेरा रेल्वे हे मार्ग विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे कसे आहेत हे केंद्रीय रेल्वेमंत्री मंत्र्यांना पटवून देत या दोन्ही मार्गांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असल्याचे स्मरण करून देत, आता प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी तातडीने मंजुरी देऊन आवश्यक निधी मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

वर्धा, नांदेड महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाला गती देण्यासाठी प्रयत्न केल्या जात आहे. परंतु वर्धा-नांदेड हा महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्प संथ गतीने सुरू असून,या प्रकल्पाला गती देऊन तो तातडीने पूर्ण व्हावा अशी मागणीही खा. देशमुखांनी केंद्रीय रेल्वे मंत्री वैष्णव यांच्यासोबत चर्चा करताना लावून धरली. यवतमाळ -वाशिम या मतदारसंघासह नांदेड जिल्ह्यातील जनतेला रेल्वे प्रवास उपलब्ध झाला पाहिजे. धार्मिक व औद्योगिक स्थळांशी रेल्वे मार्ग जोडले जावेत यासाठी खा.संजय देशमुख हे प्रयत्नशील आहेत.या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन आवश्यक निधी मंजूर करावा, अशी मागणी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना खा.देशमुखांनी केल्याचे समजते.

वाशिम-पोहरादेवी-दिग्रस-माहूर-आदिलाबाद व वाशिम-बडनेरा हे प्रस्तावित रेल्वे मार्ग कशाप्रकारे महत्त्वाचे ठरणार आहेत हे खा.देशमुखांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना सविस्तर माहिती देत पटवून दिले. ते म्हणाले कि, रेल्वे मार्गामुळे नवीन उद्योगांसह पर्यटनक्षेत्राला वाव मिळेल. वाशिम ते बडनेरा हा मार्ग महत्त्वाचा आहे. बडनेरा, अमरावतीकडे नवा उद्योगासह व्यापाराचा मार्ग खुला होईल. त्यामुळे वाशिम जिल्ह्याचा व्यापारी विकास होईल आणि



या मार्गामुळे इतर महत्त्वाची शहरे व राज्यांशी रेल्वे जोडणी होईल. हे दोन्ही मार्ग पूर्ण झाल्यास वाशिमला एक महत्वाचे रेल्वे जंक्शन म्हणून ओळख मिळेल. वाशिम जिल्ह्याची 'आकांक्षित जिल्हा' म्हणून ओळख पुसली जाईल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

खा.संजय देशमुख यांनी यावेळी नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्यासाठी मागणी करताना नांदेड-नागपूर व्हाया अकोला-वाशिम पॅसेंजरसह नांदेड-हरिद्वार व्हाया वाशिम नवीन रेल्वे सुरू करण्यासोबत सुरत-भुसावळ एक्सप्रेस (क्रमांक १९००६/०७) वाशिमपर्यंत विस्तार करावा. तिरुपती-अकोला व्हाया वाशिम विशेष रेल्वे गाडी (क्रमांक ०७६०६/०७) शिर्डीपर्यंत वाढवावी. नांदेड-पटना विशेष रेल्वे गाडी (क्रमांक ०७६१५/१६) स्थायी करण्यात यावी. या गाडीमुळे वाराणसी, प्रयागराज, अयोध्या, बुद्धगया आणि पटना यासारख्या धार्मिक स्थळांसाठी प्रवाशांना कायमस्वरूपी सुविधा मिळेल. नांदेड-कुर्ला रेल्वे गाडी (क्रमांक १७६६५/६६ व १७६६७/६८) तातडीने सुरू करावी अशीही मागणी त्यांनी केली.

उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने २९ ऑगस्ट २०२३ रोजी नांदेड-कुर्ला व्हाया वाशिम-अकोला मार्गावर नवीन रेल्वे सुरू करण्याचे आदेश दिले होते. मात्र, दोन वर्षे उलटूनही ही गाडी सुरू झालेली नाही. त्यामुळे तातडीने कार्यवाही करून ही रेल्वे गाडी सुरू करण्यात यावी, अशी मागणी खा. संजय देशमुख यांनी केली आहे.

विशेष महत्वाचे म्हणजे वाशिम ते पोहरादेवी-दिग्रस-माहूर-आदिलाबाद या मार्गांचे सर्वेक्षण आटोपले आहे. त्यासाठी निधीची गरज असल्याने तो तातडीने मंजूर करुन उपलब्ध करून द्यावा असा आग्रह रेल्वेमंत्र्यांकडे खा.देशमुखांनी यावेळी लावून धरला.

बंजारासमाजाची पवित्र काशी म्हणून समजले जाणारे, अराध्य दैवत तिर्थक्षेत्र पोहरादेवी व महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असलेले प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र माहूर ही धार्मिक स्थळे महत्त्वाची आहेत. पोहरादेवी हे बंजारा समाजाचे अत्यंत महत्त्वाचे धार्मिक स्थान आहे.या दोन्ही तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी राज्यभरासह कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश किंबहुना देशभरातून लाखो भाविक दरवर्षी देवदर्शनासाठी तसेच पर्यटनासाठी येतात. त्यामुळे या मार्गाच्या माध्यमातून त्या भाविकांच्या व पर्यटकांच्या सोयीसुविधेसाठी देखील ही एक महत्त्वपूर्ण रेल्वे जोडणी निर्माण होईल. याशिवाय नांदेड जिल्ह्यातील माहूर हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असून,श्री रेणुकादेवी चे जागृत देवस्थान असलेले एक महत्त्वाचे देवस्थान आहे. अशा ह्या सर्व महत्तांमुळे, 'पोहरादेवी ते माहूर' या मार्गावर रेल्वे सुविधा सुरू केल्यास या पवित्र स्थळांशी जोडणी होऊन देशभरातून भाविकांना जलद,थेट,सरळ व सुकर प्रवासाची सोय उपलब्ध होऊन भाविकांना सुकरपणे दर्शन व पर्यटकांना निसर्ग सौंदर्याचा आनंद घेता येईल.

खा.संजय देशमुख यांनी वाशिम-पोहरादेवी-दिग्रस-माहूर-आदिलाबाद हे रेल्वे मार्ग विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे कसे आहेत याबद्दल केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना सविस्तर माहिती देत पटवून सांगत या मार्गाचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी तातडीने मंजूरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली असून,माहूर हे भौगोलिक रचनेनुसार नांदेड जिल्ह्यात तर राजकीय रचनेनुसार हिंगोली लोकसभा मतदारसंघ येत असल्याने नांदेड चे खा. तसेच हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे (ऊबाठा) खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी देखील खा.संजय देशमुख यांच्या या मागणीला खांद्याला खांदा लावून आणखी बळ दिल्यास हा रेल्वेमार्ग नक्कीच लवकरात लवकर सुरू होईल अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त वृत्त

### बाहेती ट्रस्ट तर्फे फेब्रुवारी मध्ये नांदेड येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिर

**नांदेड-** केशरबाई गणेशलालजी बाहेती चॅरिटेबल ट्रस्ट नांदेड च्या वतीने सर्व जाती धर्मातील महिला पुरुषांकरिता घेण्यात येणारे आरोग्य तपासणी शिवीर या वर्षी खालील वेळापत्रकाप्रमाणे करण्यात येत असून नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन ट्रस्ट तर्फे करण्यात आले आहे. या वर्षी सीबीसी, ग्लुकोज, प्लाजमा, एच बी ए १ सी, हेमोग्लोबिन, लिवर फंकशन टेस्ट, किडनी फंकशन टेस्ट, थायरोइड पॅनल १, लिपीड फंकशन टेस्ट या सोबतच विटामीन डी, विटामीन बी १२, कॅल्शियम इत्यादि रक्ताच्या अनेक नवीन चाचण्या तसेच ईसीजी, बोन डेन्सिटि टेस्ट, बीएमआई यांचे सह नांदेड मधील अनेक नामांकित डॉक्टर आणि हृदयरोग तज्ञ यांचे वतीने आरोग्य तपासणी केली जाणार आहे. या शिबिरात प्रथम नाव नोंदणी करणाऱ्या फक्त १५० स्त्री-पुरुषांची आरोग्य तपासणी केली जाईल. नाव नोंदणी शुल्क फक्त रुपये १२५० असून दिनांक २ ते ८ फेब्रुवारी दरम्यान श्री रमेश डागा, गोविंदराज ज्वेलर्स सराफा, नांदेड मो. ९४२२१७२४९९, श्री संतोष मणियार, गणेशलाल पेपर मार्ट, गुरुद्वारा चौक मो. ९४२१३२५२६९, सीए गोविंदप्रसाद मुंदडा, सन्मान प्रेसटीज, स्टेशन रोड, नांदेड मो. ९८२३१२०५५५, निखिल बाहेती, बाहेती एंड कंपनी पारसी अंजुमन वजीराबाद नांदेड मो. ९४०४८०९२९१, ओमप्रकाश इंदाणी वेंकटेश्वरा ट्रेडर्स स्टेट बँक ऑफ इंडिया, नवा मोंढा नांदेड मो. ९४२२१७१२७३ या पैकी कुठेही नाव नोंदणी करता येईल. नाव नोंदणी शुल्क अहस्तातरणीय आणि अपरिवर्तनीय असेल. रक्ताच्या चाचण्या मेट्रोपोलीस लॅब या सुप्रसिद्ध संस्थेतर्फे ११ ते १३ फेब्रुवारी दरम्यान आणि आरोग्य तपासणी १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी १ दरम्यान अश्विनी हॉस्पिटल शिवाजी नगर नांदेड येथे करण्यात येतील. तरी जास्तीत जास्त लोकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष निखिल बाहेती, कार्याध्यक्ष गोपाललाल लोया, सचिव प्रा. किशनप्रसाद दरक, कोषाध्यक्ष एड. अशोक भुतडा, उपाध्यक्ष एड. पुरुषोत्तम भक्कड व कार्यकारी मंडळाने केले आहे.

### महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव समितीतर्फे आयोजित शोभायात्रा ढोलताशाच्या गजरात निघाली

**नांदेड-**१ फेब्रुवारी रोजी महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव समिती तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पदमशाली समाजाचे आराध्य दैवत महर्षी मार्कंडेय ऋषींच्या जन्मोत्सव निमित्त शनिवारी १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता भव्य दिव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली ही शोभायात्रा मार्कंडेय मंदिर चौफाळा -जुना मोंढा व परत चौफाळा मार्कंडेय मंदिर ह्या मार्गाने काढण्यात आली. या शोभायात्रेत ते नेहमीप्रमाणे सांस्कृतिक धार्मिक अशा झाकी होत्या . मार्कंडेय ऋषींची झांकी, मार्कंडेय मुर्ती-रथ, पद्मशाली समाजाचे विणकर हातमाग झाकी, घोडे, ओपन टॉप जिप्सी यामध्ये मार्कंडेय ऋषींची प्रतिमा असेल, लहान मुलांचे वारकरी भजनी मंडळ, मुलींचे लाठी काठी प्रदर्शन, भव्य ढोल पथक, व एकाच वेशभूषेत महिला मंडळ, घोडे अशा झाक्या ह्या शोभायात्रेत होते. या शोभायात्रासाठी मार्कंडेय जन्मोत्सव समितीचे सर्व कार्यकर्ते गेला १ महिना झाला प्रयत्न करत होते. या शोभायात्रेत पद्मशाली समाज प्रत्येक भागातून चौफाळा येथे एकत्र आला होता. महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव समिती तर्फे पद्मशाली समाज बांधव अतिशय उत्साहाणे मोठ्या संख्येने ह्या शोभायात्रेत सहभागी झाल्याबदल आभार व्यक्त करण्यात आले.तसेच लवकरच महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव समितीतर्फे पद्मशाली समाजासाठी वैकुंठ रथ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.तसेच ह्याच दिवशी महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव समिती नांदेड महर्षी मार्कण्डेय जन्मोत्सव समिती नांदेड व डॉ. प्रकाश बोटलवार व त्यांची टीम आयोजित महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव सोहळा निमित्त मोतीबिंदू तपासणी व मोती ऑपरेशन शिबीर घेऊन साजरा करण्यात आला. तसेच चष्मे सुद्धा मोफत देण्यात आले.

# जरणोव्दार शिवलिंग विरभद्र मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. ०२ फेब्रुवारी**

बिलोली तालुक्यातील मौजे सगरोळी नगरीचे ग्रामदैवत असलेल्या शंभू महादेवाचे जिरणोव्दार गेल्या काही वर्षापासून चालू होते सदरील मंदिराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर गेल्या सात दिवसापासून विविध धार्मिक कार्याच्या माध्यमातून मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कळशारोहन आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दि ३१ जाने २०२५ रोजी श्री श्री श्री १००८ जगद्गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामी केदार पीठ व सर्व शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत शंभू महादेव मंदिराचे जिरणोध्दार शिवलिंग वीरभद्र मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा बसवलिंग शिवाचार्य महाराज जुकलकर शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर मल्लिकार्जुन शिवाचार्य महाराज खतगावकर सिद्ध दयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर शंकर लिंग शिवाचार्य महाराज हानेगावकर विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर चंद्रशेखर महाराज देगलूरकर बसवलिंग



शिवाचार्य महाराज कौलासकर राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर आचार्य गुरुराज स्वामी अमदपुरकर सिद्धेश्वर महाराज सुकणीकर सिध्दायप्पा महाराज एकलारकर यांचे सर्व गुरुवर्य यांच्या उपस्थितीत व श्री.श्री. १००८ जगद्गुरु भीमाशंकर शिवाचार्य महास्वामी केदारपीठ यांच्या शुभहस्ते शंभू महादेव मंदिराचे व शिवलिंग विरभद्र मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा यामध्ये मुर्तीची स्थापना भगवान महादेव पिंड होम होवन, पाच नद्यांच्या जलाभिषेक करून शिवलिंग स्थापना करण्यात आली. विधी पुजा आर्चा करून विरभद्र मुर्तीचे प्राणप्रतिष्ठा कळशारोहन दैनीथीमान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव बालाजी पा. खतगावकर, लक्ष्मण ठकरवाड, मधुजी गिरगांवकर, रोहित देशमुख गणेश पा.शिंपाळकर तर याचबरोबर राजकीय व सामाजिक पदाधिकारी व गावातील ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने बायलेकीची उपस्थिती होती. गावातून श्री श्री श्री १००८ जगतगुरु व सदगुरु भिमाशंकर शिवाचार्य महास्वामी केदारपिठ महाराज यांच्या भव्य शोभा याञेत गावातील महिलांनी डोक्यावर कळस घेऊन गुरुराज माऊली च्या घोषणाने पाऊल टाकत सहभागी झाले होती तर सकाळी ११ वा जगतगुरु भिमाशंकर केदारपिठ यांचे प्रवचन संपन्न झाल्यावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आली होती.

# ज्येष्ठ नागरिक होणेंच गुन्हा आहे का? : डॉ. वैद्य

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

नुक्तीच जिल्हा नियोजन समितीची बैठक नांदेड जिल्ह्याचे पालक मंत्री अतुल मोरेश्वर सावे यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली.



बैठक नांदेड जिल्ह्याच्या मा.पालक मंत्र्यासह जवळ जवळ एकविस सदस्यांच्या उपस्थित संपन्न झाली.बैठक पालक मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षते खाली पार पडली. बैठकीत नांदेड जिल्ह्याचे तब्बल तिन खासदार व नऊ आमदार लोक प्रतीनिधिसह तथा बाकीचे प्रशास नातील जिल्हाधिकारी आणि ईतर उच्च पदस्थ सदस्य उस्थित होते!

नांदेड जिल्ह्याच्या २०२५-२०२६ साठीच्या ७०३ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. यातील अनेकांना भेटून ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित व इतर मागण्या संदर्भात निवेदने दिलेली असून उर्वरित प्रभूतींना आम्ही देत आहोत व देणार आहोत. कांहीजन फोन उचलत नाहित व नंतरही करत नाहित! कांही जनांना दोन दोन वेळा निवेदने देऊन व सभागृहात बोलतो म्हणूनही गेल्या सात वर्षात त्यांनी सभागृहात एकदाही तोंड उघडली नाहित! खरं तर वरिल सर्वांनाच ज्या आई-वडीलांनी जन्म दिलेला आहे ती आता ज्येष्ठ आई-वडिल झालेली असावित! किमान त्यांची आठवण करून त्यांच्या सारख्या ज्येष्ठ आई-बाबां नागरिकांच्या साठी एकाही सुज्ञ, सुसंस्कारित महाभागानी विशेष निधीसाठी मागनी व तरतूद करण्याची अपेहा असूनही मागनी केल्याचे वाचण्यात आले नाही! केंद्र शासनाच्या अर्थ संकल्पातही ज्येष्ठ माय-बाप नागरिक समूहा साठी खास अर्थिक तरतूद केलेली दिसत नाही! येत्या काही दिवसात राज्य शासनाचाही अर्थ संकल्प जाहिर सादर केला जाईल.किमान महाराष्ट्र शासनाने तरी ज्येष्ठांसाठी मोठी तरतूद करावी असी मागनी डॉ.हंसराज वैद्य यांनी केली आहे. ते म्हणाले की भारतात ज्येष्ठ नागरिक होणेंच (ज्येष्ठ माय बाप होणेंच) गुन्हा आहे काय? असा सवाल डॉ. हंसराज वैद्य यांनी उपस्थित केला.

## अशोक कुरुडे यांना जनहित साहित्यरत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

दि. २७ जानेवारी रोजी सोनखेड ता.लोहा जि. नांदेड येथे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई आणि राजश्री शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा (दे) ता.लोहा यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते.



सदरील संमेलनाचे अध्यक्ष ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ हे होते. या संमेलनात अशोक कुरुडे यांना साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जनहित साहित्यरत्न पुरस्कार प्रदान कडून सन्मानित करण्यात आले. अशोक कुरुडे यांची बालसाहित्य व प्रौढसाहित्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत, तसेच त्यांना यापूर्वी अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

# आगारात कामगार कर्मचाऱ्यांकडून शिकाऊ उमेदवारांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून विविध ट्रेड उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना एसटी महामंडळाने शिकाऊ उमेदवार (प्रेन्टीससिप) म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागीय कार्यशाळेकडून (एसटी वर्कशॉप) नांदेड यांच्या मार्फत (एसटी डेपो) नांदेड आगार येथे एक वर्षाच्या कालावधीसाठी ३६ शिकाऊ पाठविलेले उमेदवार प्रशिक्षणार्थी कार्यरत आहेत. त्यापैकी १८ शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींचा एक वर्षाचा कालावधी ३१ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी पूर्ण झाल्यामुळे एसटी डेपो नांदेड आगारातील कामगार कर्मचाऱ्यांच्या वतीने दि.१ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजी रा.प.म.नांदेड आगारात त्यांचा आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते पुष्पहार,



शाल, प्रत्येकी टिफिन डब्बा भेट देवून सत्कार करून शुभेच्छा रूपी निरोप देण्यात आला.

यामध्ये शिकाऊ उमदेवार ओंकार मॅकलवाड, अनिकेत सोनटक्के, मोहम्मद युसूफ, सय्यद फरीद, विशाल लोकरे, शेख अदनान, आवेस खान यांचा समावेश होता. यावेळी आगार व्यवस्थापक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, या सर्वच शिकाऊ उमेदवारांनी वर्षभरात चांगले काम केले असून याचा फायदा भविष्यात त्यांना नक्कीच कामी येईल, असे प्रतिपादन केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक श्रीनिवास रेणके, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड , पाळी प्रमुख मनोहर माळगे, अविनाश भागवत, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, वाहन परिक्षक नामदेव राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या निरोप समारंभ कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन गुणवंत एच.मिसलवाड यांनी करून आपले विचार मांडले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, एसटी महामंडळामध्ये चालक, वाहक, यांत्रिक, विभागात काम करणारे हे कामगार-कर्मचारी प्रतिकुल परिस्थितीमध्ये कुठेही आपल्या कर्तव्यात तग धरून कमी पडत नसतात, असे प्रतिपादन केले. प्रमुख वक्ते म्हणून ते पुढे बोलताना आपल्या भाषणात म्हणाले की, आज एक वर्षाचा एसटीतील कामाचा अनुभव या शिकाऊ उमेदवारांना भविष्यात त्यांच्या जीवनात औद्योगिक क्षेत्रात, आस्थापनेत या कार्य अनुभवाचा लाभच होईल, असे बोलून एसटी मधील वर्षभरात यांनी मोलाचे योगदान दिले आहे असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार-कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या वंचित बहिणींना लाभ मिळणार का?

**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ,दि. ०२ फेब्रुवारी**

महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत महत्वकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे लाडक्या बहिणींनी महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत प्रचंड मोठी ताकद देत पुन्हा सत्तेत बसवले आहे. मात्र फुलवळ व परिसरातील लाडक्या बहिणीने महायुती च्या उमेदवाराला भरघोस मत देऊन विजयामध्ये हातभार लावला अशा काही लाडक्या बहिणी लाभापासून वंचित आहेत. त्यांना लाभ मिळणार काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

कागदपत्र अभावी अनेक लाडक्या बहिणी या योजनेपासून वंचित आहेत. यामध्ये बँकेमध्ये खाते नसणे, पॅन कार्ड नसणे, आधार कार्ड बँक खात्याला लिंक नसणे, आधार कार्ड अपडेट, आधार कार्ड मोबाईल नंबरला लिंक नसणे यासह अनेक कारणामुळे अनेक लाडक्या बहिणी या योजनेपासून वंचित आहेत. तसेच या योजनेसाठी अनेक बहिणींनी फॉर्म भरून दिले. पण त्यांचा फॉर्म मंजूर झाला नाही. शासनाने नुकतेच निवडणुकीत १५०० रुपया ऐवजी २१०० रुपये देण्याची जाहीर केली आहे. पण त्यांची आतापर्यंत अंमलबजावणी झाली नाही. तसेच हिवाळी अधिवेशनात लाडक्या बहिणीसाठी चौदा हजार कोटीची तरतूदही केली आहे. यांचा लाभ अगोदर ज्या बहिणींनी घेतला आहे त्यांनाच होणार आहे. पण ज्या लाडक्या बहिणी या योजनेपासून वंचित आहेत त्यांना शासन या योजनेत सहभागी करून घेणार की नाही असा सवाल या योजनेपासून वंचित असणाऱ्या लाडक्या बहिणी शासनाला विचारत आहेत.

# मनरेगातून पेव्हर ब्लॉक व पांदण रस्त्यांचा मार्ग मोकळा : भरत गोगावले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळामध्ये मनरेगातून सिमेंट रस्ता पेवर ब्लॉक व पांदण रस्त्याची कामे घेण्याचे मंजूर करण्यात आले होते. प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश झालेले सर्व कामे रद्द करण्याचे रोजगार हमी आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी दिलेले आदेश रद्द करण्याचे आश्वासन रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी विधान परिषदेचे गटनेते हेमंत पाटील यांना दिले आहे त्यामुळे रखडलेली कामे मार्गी लागणार आहेत.

महायुतीच्या मागील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व संदिपान भुमरे यांच्या संकल्पनेतून मनरेगातून सिमेंट रस्ता, पेव्हर ब्लॉक, पांदण रस्ता, व रस्त्याची कामे करण्याचे शासन स्तरावरून मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे राज्यभरामध्ये अनेक ग्रामपंचायतीसाठी अशा कामांना प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. परंतु त्यानंतर लगेच विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ आचारसंहिता लागू झाल्याने ती कामे थांबली आली होती. सदर कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे गरजेचे आहे परंतु रोजगार हमी नागपूर आयुक्तांनी सर्व कामे रद्द करण्याचे आदेश देऊन कर्मचाऱ्यांवर कारवाईची शिफारस केली आहे. आयुक्तांच्या या भूमिकेमुळे राज्यभरातील ग्रामीण विकासाची कामे रखडल्याने लोकप्रतिनिधींबद्दल प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

आयुक्तांच्या या आदेशाचा फटका बसलेले नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर जिल्ह्यातील सरपंचांचे शिष्टमंडळाने विधान परिषद गटनेते हेमंत पाटील यांना भेटून ग्रामीण विकासाच्या कामात अडथळा ठरत असलेले आयुक्तांचे आदेश रद्द करून कामे सुरू करण्यासाठी साकडे घातले. याची तात्काळ दखल घेऊन ना. हेमंत पाटील यांनी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क करून त्याबाबत मराठवाड्यातील सरपंचांची बाजू मांडली त्यावर मंत्री गोगावले यांनी ते आदेश रद्द करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीआधी आधी कामे सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून संस्काराची शिदोरी मिळते : सुनील बिर्ला

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०२ फेब्रुवारी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून विद्यार्थ्यांना आयुष्यभर पुरेल, अशी संस्काराची शिदोरी मिळते.त्यासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील शिबिरात अनुभव घेऊन सुसंस्कारीत राष्ट्र निर्माणासाठी पुढे यावे,असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांनी केले. किनवटच्या सरस्वती विद्या मंदिर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर बोधडी बु.येथे संपन्न झाले.बुधवारी दि. २९ रोजी समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.'युथ फॉर माय भारत, युथ फॉर डिजिटल लिटरसी' या विषयाला घेऊन दि.२३ ते २९ जानेवारीपर्यंतच्या सात दिवसांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.पुढे बोलताना




बिर्ला म्हणाले की,विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेपासूनच कायदा, सुव्यवस्था याचे भान ठेवावे. पोलिसांची प्रत्येक ठिकाणी गरज न पडू देता आपणच सक्षम पोलीस होऊन समाज उभारणीत योगदान द्यावे,असे आवाहन त्यांनी केले. शिबिराच्या एकूणच कार्याचा कार्य अहवाल कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी सादर केला. या सात दिवसांमध्ये विविध उपक्रमांना हाताशी घेऊन विद्यार्थ्यांनी बौद्धिक श्रमदान तसेच मनोरंजनाच्या विविध अशा कार्यक्रमाचा कसा आनंद घेतला, याचा उहापोह प्रास्ताविकातून त्यांनी केला. पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक राष्ट्र कार्यात सहभागी होण्याचे आवाहन करत विद्यार्थ्यांनी लेखन,वाचन व कलागुणांना वाव द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. अशा शिबिरातून विद्यार्थी घडतो व भविष्यात तो भारताचा सक्षम नागरिक तयार होतो,असे मत पत्रकार आशिष देशपांडे यांनी यावेळी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आनंद भंडारे यांनी शिबिराच्या कार्याचे महत्त्व सांगत शिबिरातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा घडतो, हे सांगून अशा शिबिराची आवश्यकता का आहे, यावर भर दिला. अध्यक्षीय समारोपात कृष्णकुमार नेमानीवार यांनी अशा शिबिराची उपयोगिता मांडत मी सुद्धा अशाच शिबिरातून कसा घडत गेलो व आज या शाळेचा मुख्याध्यापक म्हणून काम करतो आहे, हे सांगून विद्यार्थ्यांनी निकोप समाज उभारणीसाठी पुढे यावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन डॉ. किरण आयनेनीवार यांनी केले. नेहा मडावी हिने स्वागत गीत गायिले.कार्यक्रमाधिकारी डॉ. मनोहर थोरात यांनी आभार मानले. यावेळी सात दिवशी शिबिरात भाग घेतलेल्या वैभव मेटकर, करण घोगेवार, दत्ता ढोले, कु. कोमल मेश्राम, कु. नेहा मडावी यांनी आपले अनुभव व्यक्त केले. शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले .या समारोपीय कार्यक्रमासाठी बोधडी येथील शाळेच्या मुख्याध्यापिकाअनिता येरावार , शाळेचे सर्व शिक्षक ,महाविद्यालयातील सर्व सहकारी

प्राध्यापकांसह ग्रंथपाल माधव नेम्मानीवार तसेच शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी,ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## भाजपा सदस्य नोंदणी अभियानास वाशी येथे उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ फेब्रुवारी -**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने महाराष्ट्रात सदस्य नोंदणी अभियान राबवून मोठ्या प्रमाणात भाजपाचे सदस्य करून घ्यावयाचे होते.

त्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी असल्याने भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष महादेव आप्पा आखाडे यांच्या सुपीक डोक्यातून वाशी शहरांमध्ये छत्रपती शिवाजी चौकामध्ये अभियान राबविण्याची कल्पना तालुका अध्यक्षा यांना दिली.

त्यानुसार वाशी तालुका अध्यक्ष राजगुरू कुकडे यांनी शिवाजी चौकामध्ये पाच २५ खुर्च्या टेबल लावून सकाळी दहा ते चार वाजेपर्यंत सदस्य नोंदणी अभियान राबवले.

यामध्ये भाजपा वाशी तालुका सरचिटणीस प्रशांत कुलकर्णी तालुका कोषा अध्यक्ष सुहास चौगुले तसेच विनायक टेकाळे, गणेश कवडे, सुधाकर देवडीकर, विलास क्षीरसागर, यांनी उपस्थित राहून सदस्य नोंदणी केली. यावेळी १०० चे वर सदस्य नोंदणी झाली.

शेवटच्या दिवशी भाजपा नोंदणी अभियान वाशी येथील मुख्य ठिकाणी राबविल्यामुळे गावातील नागरिकांमधून आनंद व्यक्त केला जात असून कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले जात आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### 'पोदार' मध्ये विद्यार्थ्यांची दंततपासणी

**उमरगा, दि.२ फेब्रुवारी -**

शहरातील पोदार जम्बो किड्स शाळेतील नर्सरी, ज्युनिअर व सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा इवायएफएस अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून दात तपासणी म्हणजेच दंतचिकित्सा हा कार्यक्रम संपन्न झाला.ह्या कार्यक्रमास डॉ. साधना ईनामदार उपस्थित होत्या व त्यांनीच सर्व चिमुकल्यांना दातांचे आरोग्य कशाप्रकारे राखता येईल व त्याची निगा कशी राखावी. याबदल मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी प्रत्येक मुलाच्या दातांची तपासणी करून त्या मुलांना एक टूथब्रश व प्रमाणपत्र देऊन दातांच्या आरोग्याबदल मार्गदर्शन केले. ह्या उपक्रमासाठी मुख्याध्यापक श्रीकांत वारुडे, उपमुख्याध्यापक अतुल फावडे, मंजिरी सूर्यवंशी व त्यांच्या सहकारी रागिनी जावळे, अश्विनी पाटील, ज्योती काळे, आश्विनी दुधभाते, नीतीप्रिया पांचाळ, रेणूका हिरमुखे, विजयालक्ष्मी अंबुसे, अनुसया शिंदे, अंजली क्षीरसागर, सरस्वती भालके यांनी परिश्रम घेतले.



### गणेश जयंतीनिमित्त हरिनाम सप्ताह

**येरमाळा, दि.२ फेब्रुवारी -**


धाराशिव तालुक्यातील येडशी येथे दि.२६ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाची सुरुवात दि.२६ रोजी सकाळी हस्ते कलश पूजन करून झाली. विना पुजन देशमुख परिवार यांच्या हस्ते तर टाळ व मृदंग पुजन जेष्ठ ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. येडशी येथील देशमुख गल्लीतील गणेश मंदिरासमोर गणेश जयंतीच्या निमित्त होणाऱ्या या सप्ताहाचे १८ वे वर्ष असुन त्याची सुरुवात विघ्नहर्ता गणेश भक्त मंडळ व परिवार येडशी यांनी केली आहे. या सप्ताहामध्ये दररोज रात्री ९ वाजता किर्तनाचे कार्यक्रम झाले. तर हभप. प्रकाश महाराज बोधले यांच्या दि.२ रोजी झालेल्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.



### सुनील धानुरे यांचा सत्कार

**जळकोट, दि.२ फेब्रुवारी -**

हराळी येथील युवक सुनील धानुरे यांची पाषाण (पुणे) येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. आई-वडिलांनी शेतात कष्ट केल्याची जाणीव ठेवत सुनील धानुरे या युवकांनी वयाच्या २३ व्या वर्षात यश संपादन केले आहे. गेल्या काही वर्षांत हराळी गावातील अनेक युवक विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत शासकीय विभागात विविध पदांवर विराजमान झाले आहेत. हराळी येथील ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजकुमार धानुरे, अनिल धानुरे, उपसरपंच रविंद्र पाटील, अजित सूर्यवंशी, सचिन सूर्यवंशी, राहुल पाटील, संतोष मोरे, श्रीराम धानुरे, आनंद सूर्यवंशी, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, नितीन सूर्यवंशी, मनोज पाटील, धनराज सूर्यवंशी, बाळासाहेब कस्तुरे, ज्योतलींग कंटेकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



### पोलिस अधीक्षक यांची तेरला भेट

**उमरगा, दि.२ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे जिल्हा पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी भेट दिली. तेर येथे जिल्हा पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय पुराणवस्तू संग्रहालयात भेट देऊन पुरातन वस्तूंची पहाणी करून तेर दुरक्षेत्र कार्यालयास भेट देऊन पाहणी केली. यावेळी मेघा राऊत, भाग्यश्री बिराजदर, अविनाश राठोड, किसन काळे, सविता बागडे आदी उपस्थित होते.

### हळदी, कुंकू-माता पालक मेळावा संपन्न

**मंगरूळ, दि.२ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंगरूळ येथे शनिवार १ फेब्रुवारी रोजी बाल आनंद बाजार व माता पालक यांच्यासाठी हळदी कुंक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याकार्यक्रमाचे उद्घाटन उपसरपंच गिरीश डोंगरे, लक्ष्मण माळी, चांदसाहेब शेख, आदमशा फकीर, आप्पासाहेब जेटीथोर, दिलीप जाधव, मनोज डोंगरे, उद्धव हजारे व उपस्थित माता पालक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक डोलारे, हेरकर, रामशेटे, वडुळे, युवा प्रशिक्षणार्थी डोलारे यांच्यासह युवक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## धाराशिवला अद्ययावत सुविधांसह रेल्वेस्थानक होणार तिप्पट मोठे...

# धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाची सुधारित प्रकल्प किंमत ३००० कोटी

**रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली निधीची मागणी... आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**



### रेल्वेमंत्री वैष्णव यांना मुख्यमंत्र्यांचे पत्र : आमदार पाटील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीपासून या प्रकल्पाकडे लक्ष दिले आहे. राज्यात सत्ताबदल झाल्याबरोबर त्यांनी प्राधान्याने हा विषय अजेंड्यावर घेतला. तुळजाभवानीच्या चरणी हा रेल्वेमार्ग समर्पित करण्यासाठी तातडीने राज्याच्या वाट्याचा ५० % हिस्सा देण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री महोदयांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना २० जानेवारी रोजी पत्र लिहून सुधारित किंमतीनुसार सादर करण्यात आलेल्या आराखड्यानुसार केंद्राच्या वाट्याचा निधी लवकर देण्यात यावा अशी मागणी केली असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**

धाराशिव रेल्वेस्थानक प्रस्तावित होते त्यापेक्षा तिप्पट मोठे होणार आहे. नवीन पर्यायी रेल्वेमार्ग (लूप लाईन) उभारला जाणार आहे आहे. प्रवासी बांधवांसह रेल्वेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी विविध सोयीसुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. रस्त्याच्या वरून आणि खालून जाणाऱ्या पुलांची संख्येत वाढ करण्यात आली आहे. सोलापुर शहरातील जागा संपादन करताना तिथले प्रचलित दर गृहीत धरले आहेत. तसेच वाढलेल्या कामांच्या साठी लागणारे वाढीव भूसंपादन या सर्व बाबींचा विचार करत भूसंपादनासाठी तब्बल १ हजार कोटी रुपयांचा आराखडा अंतिम करण्यात आला आहे.

ठाकरे सरकारने राज्य हिस्स्याचा पन्नास टक्के वाटा न दिल्याने रेल्वेमार्गाचे काम अडीच वर्ष रखडले. त्यामुळे प्रकल्प किंमतीत ११७.४९ टक्के म्हणजेच रु.१०६३.२३ कोटींची वाढ झाली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ९०० कोटी रूपयांच्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गासाठी आता ३००० कोटी रुपये लागणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी वाढीव प्रकल्प किंमतीनुसार रेल्वे बोर्डाने निधीची तरतूद करावी अशी मागणी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर आणणाऱ्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाला २०१९ साली मंजुरी मिळाली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कामाचा शुभारंभही झाला. ८४.४४ किमी अंतराच्या महत्वपूर्ण प्रकल्पाचे २०१९ साली भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर राज्यात ठाकरे सरकार आले. तत्कालीन ठाकरे सरकारने राज्याचा हिस्सा तातडीने देणे अपेक्षित असताना एक छदामही दिला नाही. परिणामी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाचे काम पुन्हा अडीच वर्ष रखडले. पूर्वी एकूण ८४.४४ किलोमीटर लांबीच्या या मार्गासाठी एकूण ९०४ कोटी ९२ लाख रुपयांची मंजुरी देण्यात आली होती. आता त्यात साधारणपणे दुपटीने वाढ झाली आहे. आपण सातत्याने विधिमंडळात हा विषय लावून धरला होता. ठाकरे सरकारच्या कालावधीत तत्कालीन परिवहन मंत्री अनिल परब यांनी तातडीने या महत्वपूर्ण रेल्वेमार्गासाठी राज्य वाट्याचा हिस्सा देण्यासाठी पावले उचलली असती आणि निर्णय घेतला असता तर कदाचित हा प्रकल्प आतापर्यंत पूर्णही झाला असता. जून २०२२ मध्ये राज्यात पुन्हा एकदा आपले महायुती सरकार आले. शिंदे-फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गतिमान कारभार सुरू झाला. आपले सरकार आल्याने या रेल्वेमार्गाबाबत सर्व अनुषंगिक बाबींची पूर्तता तातडीने करवून घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीर्थक्षेत्र तुळजापूरला रेल्वेच्या नकाशावर आणण्याचा जिल्हावासीयांना दिलेला शब्द लवकरच पूर्णत्वाला जाईल अशी खात्री आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.

या नवीन रेल्वेमार्गामुळे प्रवासी संख्या निश्चितच वाढणार आहे. त्यामुळे पायाभूत सोयीसुविधांची अडचण होऊ नये याकडे आपण लक्ष वेधले होते. त्यानुसार धाराशिवचे रेल्वेस्थानक आता अधिक सुसज्ज आणि अद्ययावत होणार आहे. मुख्य रेल्वेस्थानकाची इमारत ४००० चौरस मीटरवरून तब्बल १२,६३० चौरस मीटर होणार आहे. एकंदरीत मुख्य रेल्वेस्थानकाची इमारत तिप्पट मोठी होणार आहे. पूर्वीच्या आराखड्यानुसार ११,४०० चौरस मीटर मान्यता असलेल्या सर्व्हिस इमारती सुधारित आराखड्यानुसार १७,६०० चौरस मीटर होणार आहेत. वेगात जाणाऱ्या जलदगती रेल्वेगाड्यांना तात्काळ मार्ग मिळावा यासाठी आवश्यक असणारी पर्याय व्यवस्थाही हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार यार्डाच्या आवश्यकतेनुसार मोठ्या लांबीची लूप लाईन अंथरली जाणार आहे. विविध रस्त्यांखालून जाणाऱ्या पुलांची संख्या यापूर्वी २० होती त्यात वाढ करण्यात आली असून ३१ रस्त्यांच्या खालून रेल्वेमार्गासाठी पूल तयार केले जाणार आहेत. राष्ट्रीय महामार्गावरील सर्वात महत्वाचा पुलाची लांबीदेखील वाढणार आहे. ३८५ मीटर ऐवजी आता हा पूल ३९९ मीटर लांबीचा असणार आहे. याव्यतिरिक्त प्रावशी बांधवांसाठी अनेक महत्वपूर्ण सोयीसुविधांचा यात अंतर्भाव करण्यात आला आहे. पथमार्ग, दादरा, प्लॅटफॉर्म यासह जमिनीखालील आणि जमिनीवरील पाण्याच्या मोठ्या टाक्यांची उभारणीही केली जाणार आहे. यापूर्वी ही सर्व कामे २,८७,८७२ चौरस मीटर जागेवर केली जाणार होती आता त्यात वाढ करण्यात आली असून ४,४४,९२२ चौरस मीटर क्षेत्रावर या सर्व सोयीसुविधा साकारल्या जाणार आहेत.

रेल्वेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची संख्याही ३४२ वरून ३७३ एवढी करण्यात आली आहे. त्यासाठी सुधारित आराखड्यानुसार ३००० कोटी रुपये खर्च येणार असल्याचे रेल्वे बोर्डाने सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

## महात्मा गांधी विद्यालयात भरला आनंद बाजार

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ फेब्रुवारी -**

महात्मा गांधी विद्यालय परंडा येथे चिमुकल्यांनी विविध वस्तूंची दुकाने थाटून व्यापार कसा करावा हे आज सिद्ध करून दाखवले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख दत्त साळुंखे, पोनि. इज्जपवार साहेब, नसीरभाई शहाबर्फी वाले, मेघराज पाटील, भाऊसाहेब खरसडे, श्रीहरी नाईकवाडी, माऊली गोडगे, जनार्धन मेहेर साहेब, नंदू शिंदे, शेरे अनेक पालक, तसेच अनेक महिला पालकांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावून या छोट्या व्यापाऱ्यांचा उत्साह द्विगुणीत केला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ, स्टेशनरी, भाजीपाला, फळे, चहा, दूध अशा विविध वस्तूंची १०० ते १२० दुकाने थाटली होती.

या सर्व मान्यवरांचे स्वागत विद्यालयाचे मुख्याध्यापक रणजीत घाडगे, पर्यवेक्षक काशीद, ठाणंबीर, मिसाळ व विद्यालयातील सर्वच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

## वाशी तालुक्यात वरिष्ठांच्या चुकीमुळे भाजपाला खिंडार ?

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ फेब्रुवारी -**



वाशी तालुक्यातील भाजपचे वाशी शहराध्यक्ष बळवंतराव श्रीमंतराव कवडे, भाजपा महिला कार्यकारिणी सदस्या संजना चौधरी, जिल्हा व्यापारी संघ सदस्य शिवशंकर चौधरी व तालुका उपाध्यक्ष देशमुख विलासराव अशा चार भाजपाच्या तालुका पदाधिकाऱ्याने आपल्या पदाचे राजीनामे जिल्हाध्यक्ष चालुक्य यांच्याकडे पाठवले आहेत.

त्यांच्या प्रमाणेच तालुक्यातील काही भाजपाचे पदाधिकारी राजीनामे देणार असल्याचे विचारात असल्याने तालुक्यातून भाजपाला फार मोठे खिंडार पडणार असल्याचे लवकर दिसून येईल, असे विश्वसनीय गोटातून समजते.

चार पदाधिकाऱ्यांनी राजीनामा पत्रात आपल्या वैयक्तिक अडचणीमुळे राजीनामा देत असल्याचे लिहिले असेल तरी खरे कारण म्हणजे वरिष्ठ नेत्यांच्या कारभाराला व एकाधिकार शाहीला कंटाळून राजीनामे दिले असून अशाप्रकारे तालुक्यातून बरेच कार्यकर्ते नाराज असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. तसेच सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते असूनही त्यांची एकही कामे होत नाहीत; वरिष्ठ नेते स्वतःची च पोळी भाजून घेत आहेत. सामान्य कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करीत आहेत अशा विविध कारणामुळे नाराज होऊन पदाचे राजीनामे दिल्याचे विश्वसनीय समजते.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येत्या काळात होण्याची शक्यता असताना भाजपामध्ये नाराजीचे विपरीत सत्र सुरू असल्याने त्याचा पक्षावर फार मोठा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याकरिता वरिष्ठ नेत्यांनी याची त्वरित दखल घेऊन भाजपामध्ये होऊ लागलेली गळती थांबवावी अशी सामान्य कार्यकर्त्यांची मागणी आहे.

## पायीवारी दिंडी व पालखीचे न.प.च्या वतीने स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ फेब्रुवारी -**

श्री. नाथ संस्थान औसा येथून निघालेली माघ वारी निमित्त पंढरपूरकडे निघालेली पायीवारी दिंडी व पालखीचे तुळजापूर खुर्द येथे आगमन झाले असता नगरपरिषदेच्या वतीने न प. चे कार्यालयीन अधीक्षक वैभव पाठक, कर्मचारी प्रमोद भोजने, न.प. शाळा क्रमांक ३ चे मुख्याध्यापक तुकाराम मोटे सर यांनी स्वागत केले.

यावेळी गणेश नन्नवरे, हणमंत साबळे, हनमंत माळी, शंकर भोजने, संतोष एकदंते, ॲड. बालाजी देशमाने आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना हमीभाव नाही : आ. पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**

केंद्रीय अर्थसंकल्पात डाळ उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले असले तरी, शेतकऱ्यांचा विचार न करता व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठी योजना आखण्यात आल्याचा आरोप आमदार कैलास पाटील यांनी केला. सरकारने शेतकऱ्यांना हमीभाव न देता केवळ उत्पादन वाढीवर भर देणे म्हणजे व्यापारीधार्जिणे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना आमदार पाटील म्हणाले, शेतकऱ्यांना हमीभाव उत्पादन खर्चावर आधारित मिळायला हवा, पण धोरणकर्ते व्यापारी व दलालांचीच अधिक काळजी घेत आहेत. शेतकरी कष्ट करून माल पिकवतो, पण आयात-निर्यात धोरणामुळे त्याला कवडीमोल दराने आपला माल विकावा लागतो.

किसान क्रेडिट कार्ड मर्यादा पाच लाखांपर्यंत वाढविली असली, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. सीबील आणि एकरकमी परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना बँका कर्ज देत नाहीत, त्यामुळे अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहतात, असेही त्यांनी सांगितले.

## १० व्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाची ग्रंथदिंडीने सुरुवात





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**

शिक्षणमहर्षी वसंतराव काळे प्रतिष्ठान, किसान वाचनालय पळसप आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १० व्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाची सुरुवात रविवार, दि.१० जानेवारी रोजी सकाळी भव्य ग्रंथ दिंडीने करण्यात आली.

ग्रंथ दिंडीचे उद्घाटन संमेलनाध्यक्ष आसाराम लोमटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष आ. विक्रम काळे, प्राचार्य अनिल काळे, अनुराधा काळे, शुभांगी काळे, प्राचार्य मधुकरराव कुंभार, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा. अंकुश नाडे, गंगाधर आरडले, बालाजी तांबे, राजकुमार मेढेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रंथदिंडीत विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्ती व महापुरुषांच्या वेशभूषा करून सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या वेशभूषेने सर्व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

पळसप गावातील प्रमुख मार्गावरून ही दिंडी संमेलन स्थळी पोहचली. दिंडीत ज्ञानविकास प्राथमिक विद्यामंदिर पळसप, जि.प. प्राथमिक विद्यामंदिर पळसप, जि.प. हायस्कुल पळसप, वसंतराव काळे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय ढोकी, राजर्षी शाहू विद्यालय गौर (ता. कळंब), सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय शिरढोण, लोकनायक विद्यालय नायगाव, जिजामाता प्राथमिक विद्यालय लातूर, जिजामाता माध्यमिक विद्यालय लातूर यासह धाराशिव व लातूर जिल्ह्यातील शाळेचे विद्यार्थी, किसान परिवाराचे सदस्य, मराठवाड्यातून आलेले साहित्यिक आणि पळसप व परिसरातील ग्रामस्थ सहभागी झाले होते.

## संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार शिक्षण उपसंचालकांना देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षक कर्मचाऱ्यांच्या संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार त्या त्या विभागातील विभागीय शिक्षण उपसंचालक यांना देण्यात यावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या दोन तीन वर्षांपासून अनेक शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक संचमान्यते मुळे त्रस्त आहेत. संचमान्यता दुरुस्तीसाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांना पुणे येथील शिक्षण संचालक कार्यालयात चकरा माराव्या लागतात. अनेकदा चकरा मारुनही दुरुस्तीचे काम होत नाही. मुख्याध्यापक, शिक्षक यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. संचमान्यता दुरुस्ती न झाल्यामुळे शिक्षकांवर टांगती तलवार असते. विभागीय शिक्षण उपसंचालक यांना संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार दिल्यास संचमान्यता दुरुस्ती लवकर होण्यास मदत होईल. शिवाय मुख्याध्यापक, शिक्षक यांना होणारा नाहक त्रासही कमी होईल.

तसेच सेमी इंग्रजी तुकडयांची मान्यता शिक्षणाधिकारी स्तरावरच मिळावी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना शाळाबाह्य कामे देऊ नयेत, वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड वेतनश्रेणीसाठी शिक्षकांच्या ऑफलाईन प्रशिक्षणाचे आयोजन त्वरित करण्यात यावे, माध्यमिक शिक्षक कर्मचाऱ्यांची प्रलंबीत फरक बीले, वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके त्वरित काढावीत, यासह अनेक महत्त्वपूर्ण मागण्या शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.

> उच्च माध्यमिक शाळा, स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालक यांना आहेत. त्या धर्तीवर प्राथमिक व माध्यमिक शिक्षक कर्मचाऱ्यांच्या संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालक यांना देण्यात आले. तर संचमान्यता दुरुस्ती प्रकरणे गतीने निकाली निघतील. शिवाय यासाठी होणारा मुख्याध्यापक व शिक्षक यांचा त्रास कमी होईल.
>
> **- उमाकांत कुलकर्णी,** राज्य कार्याध्यक्ष.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अगोदर सुविधा द्या मगच करांची वसुली करा : सतीश टोणगे

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२ फेब्रुवारी -**

नगर परिषदेने नागरिकांसाठी अगोदर मूलभूत सुविधा द्याव्यात आणि मगच करांची वसुली करावी, तसेच लावलेले दोन टक्के मासिक व्याज माफ करण्यात यावे, अशी मागणी सतीश टोणगे यांनी केली आहे.

गेल्या तीन ते चार महिन्यापासून बाजारपेठा थंड आहेत.व्यापारी वर्गाकडे ग्राहक नाही, तसेच न.प. कडून नागरिकांना मूलभूत सुविधाही मिळत नाहीत. शहरातील प्रत्येक भागात कचऱ्याचे ढिगारे आहेत. नाल्यांची साफसफाई होत नाही, घंट्या गाड्या फिरत नाहीत.

धनेगाव धरणात मुबलक पाणी साठा असतानाही पिण्याच्या पाण्यासाठी नागरीकांना भटकंती करावी लागत आहे. पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. अंधाराचे साम्राज्य आहे.

कसल्याही सुविधा उपलब्ध नसताना न.प.चे कर्मचारी मात्र रजाकारी पद्धतीने करांची वसुली करत आहेत.

मुख्याधिकारी यांनी शहरातील नागरिकांना अगोदर मूलभूत सुविधा द्याव्यात आणि मगच करांची वसुली करावी अशी मागणी माजी नगरसेवक सतीश टोणगे यांनी निवेदनाद्वारे करून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### मन्मथस्वामी जन्मोत्सव साजरा

**शिरूर अनंतपाळ, दि.२ फेब्रुवारी -**

विरशैव-लिंगायत संप्रदायातील १६ व्या शतकातील संतश्रेष्ठ संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांचा ४६४ वा जन्मोत्सव शिरूर अनंतपाळ शहरातील महात्मा बसवेश्वर चौक येथे दयानंद वंलाडे, बंडू शेटे व धनराज सरकाळे यांच्या वतीने जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी विजयकुमार संभाळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व आरती करून साजरा करण्यात आला. यावेळी शंकरराव बेंबळगे, भिमाशंकर सलगरे, बी.बी.शिंदाळकर, गुरुनाथ अचवले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, नियोजन सभापती संतोष शिवणे, सोमेश्वर तोंडारे, व्यंकट हांद्राळे, अमर देवंगरे, राजू शिवणे, शिवकांत संभाळे, गोपाळ हांद्राळे, आसिफ उजेड आदी ग्रामस्थ व भक्ती मंडळी उपस्थित होते.

### हरिश्चंद्र नमनगे यांचे निधन

**शिरूर अनंतपाळ, दि.२ फेब्रुवारी -**



हरिश्चंद्र सखाराम नमनगे यांचे अतिशय अल्प आजारात हृदयविकाराच्या झटक्याने दुपारी ३ वाजता निधन झाले. यांच्यावती अंत्यसंस्कार २ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. हे दैठणा येथील रामराव पाटील विद्यालयाचे संचालक होते. यांच्या पश्चात यांच्या कुटुंबात तीन मुले, पत्नी असा परिवार आहे.

### वाचन करणे हे काळाची गरज आहे : विनायक अहंकारी

**नळदुर्ग, दि.२ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वसंत नगर नळदुर्ग येथे दप्तराविना शाळा उपक्रमांतर्गत वाचनाचे महत्व या विषयावर वाचन संस्कृती जोपासण्यासाठी नळदुर्ग शहरात वाचन कट्टा उपक्रम राबविणारे, अभ्यासु व्यक्तिमत्त्व विनायक अहंकारी यांचे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. विनायक अहंकारी यांनी विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत, अनेक थोर पुरुषांचे उदाहरणे देऊन प्रत्येक विद्यार्थ्याने वाचन करावे, आपले आई,वडील आणि शिक्षक यांचा मान राखावा व त्यांना आयुष्यभर स्मरणात ठेवावे असा संदेश दिला. यावेळी विनायक अहंकारी यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेच्या विकासात योगदान देणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, शिक्षणप्रेमी नागरीक यांची माहिती सोनवणे यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार सोनवणे डी.एन. यांनी केले.

# शेती आणि शेतकऱ्यांसाठी नव्या संधी निर्माण करणारा अर्थसंकल्प : आ. संभाजी पाटील निलंगेकर




**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२ फेब्रुवारी -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पातून शेती आणि शेतकऱ्यांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. उद्योजक, व्यावसायिक,तरुण अशा प्रत्येक घटकासाठी या अर्थसंकल्पाने काही ना काही दिले आहे, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.

आ. निलंगेकर म्हणाले की, देशातील १०० जिल्ह्यांसाठी विशेष प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात आली आहे. तेलबिया उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचे धोरण आखण्यात आले असून १०० टक्के माल खरेदी केली जाणार आहे. यातून शेतकऱ्यांना सुविधा मिळणार आहेत. या अर्थसंकल्पामुळे कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढणार असून असंख्य नव्या संधी निर्माण होणार असल्याचे ते म्हणाले.



मच्छीमारांना ५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, युवा उद्योजकांसाठी कर्ज मर्यादा आणि वारंवारतेचा निकष वाढविणे हे महत्त्वपूर्ण निर्णय आहेत. स्टार्टअपसाठी कर्ज मर्यादा २० कोटी रुपयांची करण्यात आली असून पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी राज्यांना ५० वर्ष बिनव्याजी कर्ज योजनेचाही फायदा होणार आहे.

देशाला पुढे घेऊन जाणारा, सर्व समाजघटकांचा विचार करणारा हा अर्थसंकल्प आहे.यावर्षीच्या अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न करमुक्त करून सरकारने सामान्यांना दिलासा दिला आहे. मध्यमवर्गीय, पगारदार, कष्टकरी यांच्याबाबत आखलेल्या धोरणामुळे सामान्यांच्या विकासाला गती येणार असल्याची प्रतिक्रियाही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केली.

## हिप्परगा ताड व सलगरा मड्डी येथे श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा ताड व सलगरा मड्डी येथे शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा उत्साहात संपन्न झाला.

प्रतिवर्षाप्रमाणे या ही वर्षी हिप्परगा ताड व सलगरा मड्डी येथे श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला असुन श्री. संत एकनाथ महाराज लिखित श्री. भावार्थ रामायणाचे हे दुसरे वर्ष होते शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता ग्रंथ वाचन व निरुपणास सुरुवात करण्यात आली.

तब्बल बारा तास हा सोहळा सुरू होता. श्री. भावार्थ रामायणातील युद्धकांडातील अध्याय क्रमांक ४३ ते ४९ असे सात अध्याय ओव्या ११३५ याचे रात्रभर वाचन व निरूपण करण्यात आले.

या लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्यास परिसरातील तुळजापुर, उमरगा, कळंब, लातूर, सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, मंगळवेढा, परंडा, बार्शी, औसा, अक्कलकोट आदि तालुक्यातील ग्रंथ वाचक व सूचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सुरू केलेले ग्रंथ वाचन निरूपण सरविवार दि.२, फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता श्री लक्ष्मण सावचित्य झाल्या नंतर लक्ष्मण शक्ती सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे स्वयंशासन दिन व निरोप समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ फेब्रुवारी -**

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये आज दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ कार्यक्रम मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून महंमद रफी शेख, ताज्योद्दीन सरवडीकर, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, धनराज तेलंग उपस्थित होते. शाळेत मुख्याध्यापक म्हणून ममता वरवटे व गौस शेख, तर उपमुख्याध्यापक म्हणून सृष्टी बिरादार महंमद व्हंताळे, पर्यवेक्षकपदी यासिन खैराटे यांनी काम पाहिले.

यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांना एक दिवस शाळा चालवण्याचा अनोखा व नाविन्यपूर्ण अनुभव मिळाला उत्कृष्ट अध्यापक म्हणून अक्षरा पवार यासिन खैराटे इसा उस्ताद सिफा शेख अरमान लदाफ या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. नववीच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप दिला. दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला घड्याळ भेट दिले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग, सुमन साठे, कविता केदारे, सखुबाई चव्हाण, वनमाला वाले, सुनिता राठोड, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, शिल्पा चंदनशिवे, ममता गायकवाड, वर्षाराणी पाटील, संजय रूपाजी, सदानंद कुंभार, महंमद फसद शेख यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रहितासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या उर्जेचा वापर करावा : रोहित थोरात

**आलमला फार्मसीचा पुढाकार... राज्यस्तरीय १०व्या फार्मा व्हॉलीकपचे उद्‌घाटन**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२ फेब्रुवारी -**

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याची संस्कृती विश्वेश्वर संकुलाने उत्कृष्टपणे जोपासली आहे. यामुळे या मैदानावरील अनेक खेळाडू विविध स्पर्धेतून पदकं पटकावीत आहेत. महाविद्यालयीन जिवनात विद्यार्थ्यांनी वाईट सवयीपासून दूर रहावे, निरोगी रहावे आणि केवळ राष्ट्रहितासाठी आपल्या उर्जेचा वापर करावा, असे आवाहन जनरल सेक्रेटरी ऑफ महाराष्ट्र युथ ट्रेडीशनल असोशिएशन ऑफ इंडिया तथा फुटबॉल प्लेअर रोहित थोरात यांनी केले.

औसा तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज येथे आयोजित करण्यात आलेल्या दहाव्या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन फार्मा व्हॉली कप २०२५ चे उद्घाटन रोहित थोरात यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाच्या १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आधुनिक व सांस्कृतीक महाकुंभ मेळाव्यावर आधारीत सांघिक पारंपरिक नृत्य करुन आपली संस्कृती जपण्याचे काम केले. असेनमुद करुन विध्यार्थ्याचे कौतुक केले. या स्पर्धेसाठी राज्यातून आलेल्या संघातील स्पर्धकांचे स्वागत करुन शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, लातूर येथील दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू डगवाले, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, डॉ. सचिन घोळवे, प्राचार्य नारायण चाटे, प्रताप भोसले, प्राचार्य डॉ. कैलास कापसे, सय्य्द रहेमान, अमोल कुंभार, कृष्णा लोया व आदित्य बजाज, नसीर फुलारी जालना, अनिरुध्द बिराजदार, नितेश स्वामी, शिवाजी फावडे, संस्थेचे संचालक जयशंकर हुरदळे, विश्वनाथ निलंगेकर, विश्वनाथ बिराजदार, सरपंच विकास वाघमारे, उपसरपंच, इरफान मुलानी, विभागप्रमुख प्रविण साबदे, रेवणसिध्द बुक्का, मंगेश बिडवे, अंकुश बिडवे, संदेश माडे, प्रचार्या स्वाती कापसे, प्राचार्य योगेश माशाळकर व इतर मान्यवर उद्घाटनकार्यक्रमास उपस्थित होते.



स्पर्धेत महाराष्ट्रातील ३९ संघानी सहभाग घेतला आहे.

प्रा.डॉ. सुरज मालपाणी व डॉ. सचिन हंगरगेकर यांनी सुत्रसंचालन केले तर स्पर्धेचे समन्वयक डॉ. प्रसाद कटारे, गोपाळ माळी, प्रा. दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, डॉ. अजय फुगटे, विकास मुगळे, किरण रोडगे, डॉ. मोहमद रईस, युवराज काटु, वागदरे एस.एस., गणेश गोसावी, कापसे विद्या, भागवत सोमवंशी, अजहर ठेंगाडे, गिरीशंकरभावले सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला.

## विलास हसबे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.२ फेब्रुवारी -**

राष्ट्रीय उत्सवाचे औचित्य साधून दैठणा जि.प. शाळेतील विलास हसबे सरांचा सेवापूर्ती गौरव सोहळा शिरूर अनंतपाळ य ठिकाणी शिक्षकी पेशातील ३९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर संपन्न झाला. यावेळी अनेक मान्यवराकडून हसबे यांचे पुष्पगुच्छ देऊन व शाल, श्रीफळ व अनेक प्रकारच्या शब्दसुमनाने सामाजिक राजकीय शैक्षणिक आर्थिक अशा अनेक क्षेत्रातील मान्यवराकडून स्वागत करण्यात आले.

अनेक माजी विद्यार्थ्याकडून या ठिकाणी विलास हसबे यांच्या बाबतीत भावना व्यक्त करण्यात



आल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दैठणा येथील शालेय समितीचे अध्यक्ष सदानंद पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पागे, गणपतराव मोरे यांनी स्थान भूषवले. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटराव पाटील यांच्याकडूनही या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती लावण्यात आली. शिक्षण उपसंचालक संभाजीनगर सुधाकरराव बानाटे, बी.टी. चव्हाण, बिडवे बी.एन., शिंदादाळकर जीएस., बालाजी शिंदे, सुधीर लखनगावे या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते या नात्याने प्रवीण जाहुरे यांच्याकडून हे काम पाहण्यात आले. याप्रसंगी बालूरे डी.टी., दैठणा गावचे सरपंच शेषराव कांबळे, ऊस्तुरगे व्ही.जी., घटकार एस.व्ही., मुख्याध्यापक आर.बी., मुळे विजयकुमार, सांभाळे, हिप्परगे बी.पी., उपसरपंच योगेश बिरादार, दिवेकर एम.के., हंद्राळे व्ही.जी., भारत सातपुते उपस्थिती होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण साकोळे, आनंत डोंगरे यांच्याकडून करण्यात आले. शेवटी परमेश्वर तोंडारे यांच्याकडून आभार प्रदर्शन करण्यात आले.

### आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये कॅम्पस टू कॉर्पोरेट कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**

गडपाटी, धाराशिव येथील आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसी, मध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील नवीन रोजगाराच्या व व्यक्तिमत्व विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेचे विश्वस्त डॉ.प्रतापसिंहजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एकदिवशीय कॅम्पस टू कॉर्पोरेट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील जवळपास १५० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. यावेळी प्रा. विक्रांत नवले व प्रा. विजय सुतार उपस्थित होते.

## हासेगावातील वार्षिक स्नेहसंमेलनाचे थाटात उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२ फेब्रुवारी -**

हासेगाव येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित ज्ञानसागर विद्यालय व गुरुनाथप्पा बावगे इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनचे उद्घाटन औसा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, ओबीसी सेल भाजपाचे जिल्हाध्यक्ष सुधीर पोतदार, हैद्राबाद येथील नारायना इंग्लिश स्कूलचे प्राचार्य हरिश गौडा, शिवम बुके यांच्या हस्ते थाटात करण्यात आले.

लेझीम कवायतीने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक कालिदास गोरे यांनी प्रास्ताविक सादर केले. तर ज्ञानसागर विद्यालयाच्या वतीने शेंडगे यांनी इंग्लिश स्कूलच्या वार्षिक शैक्षणिक प्रगतीचा लेखाजोखा सादर केला. वेताळेश्वर शिक्षण संस्था दर्जेदार शिक्षण कमी दरात शिक्षण देत आहे आणि भविष्यामध्ये सुद्धा देणार असे आश्वासन संस्था सचिव वेताळेश्वर बावगे यांनी दिले.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध क्रीडा व सांस्कृतीक स्पर्धेत प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य, गीत गायन, सामाजिक जाण ठेवून समाज प्रबोधन करण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवून एक पात्री नाटक सादर केला. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, उपाध्यक्ष जयदेवी बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालीका माधुरी बावगे, प्राचार्य नंदकिशोर बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, आनंद शेंडगे, मुख्याध्यापक कालिदास गोरे, प्राचार्य डॉ. नितीन लोणीकर, प्राचार्य डॉ. वीरेंद्र म्ह्श्राम, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्या योगिता बावगे, र्या कल्पना गिरी व हासेगाव पंचक्रोशी मधील सरपंच, उपसरपंच, सोसायटीचे चेअरमन पोलीस पाटील इतर मान्यवर आणि संस्थेतील सर्व युनिटचे शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## बोरोळ येथे व्याख्यान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२ फेब्रुवारी -**

तालुक्यातील बोरोळ येथे श्रीनाथ कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. विवेक सौताडेकर यांचे शिक्षण यशस्वी जीवनाचा पासवर्ड या विषयावरील प्रेरणादायी व्याख्यान देत असताना विद्यार्थ्यांना व पालकांना शिक्षणाबद्दलचे महत्त्व पटवून दिले. ग्रामीण भागामध्ये सुद्धा दर्जेदार शिक्षण मिळते याची उदाहरण त्यांनी व्याख्यानाच्या माध्यमातून दिले.

याप्रसंगी दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व तसेच स्कॉलरशिप व इतर स्पर्धा परीक्षेतील घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान व सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. तसेच याप्रसंगी श्रीनाथ पब्लिक स्कूलच्या चीमुनी व विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर भारदस्त असे नृत्य सादर केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंच प्रमोद मनोहर पाटील हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक जनसेवा सेवा भावी प्रतिष्ठान चे अध्यक्ष गोविंदराव भोपनीकर हे होते.

तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अरविंद भातंब्रे, सोनू डागवाले, ॲड. अजित बेळकोने, प्रदीप गौंड, प्राचार्य निलेश राजमाने, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, दीपक पाटील, ॲड. दयानंद देवणे, बालाजी देवणे, औदुंबर पांचाळ हे होते. हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण पवळे, पूजा गायकवाड, भाग्यश्री पांचाळ, लक्ष्मण देवणे, आरती शेंडगे, राजश्री पाटील, प्रतीक्षा बालूरे, मीरा येणकूरे इ.परिश्रम घेतले.

## प्रजासत्ताक दिनी चित्ररथ सादरीकरणात निलंग्याच्या भूमिपुत्राचा बोलबाला

**१८ पैकी ५ चित्ररथांची केली निर्मिती... मागील ३ वर्षांत तब्बल ११ चित्ररथ केले तयार**

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२ फेब्रुवारी -**

प्रजासत्ताक दिनानिमित्त दरवर्षी २६ जानेवारी रोजी राज्य शासनाद्वारे ध्वजसंचालन पार पडते. या कार्यक्रमात विविध शासकीय विभागाच्या योजनांविषयी माहिती असलेले चित्ररथ बनवून ते पथसंचलनात सहभागी केले जातात.

यामाध्यमातून विभागातील महत्वाच्या योजना हायलाईट केल्या जातात. यावर्षी प्रजासत्ताक दिनानिमित्त दादर येथील शिवाजी पार्कवर पार पडलेल्या पथसंचलनात १८ विभागांनी आपले चित्ररथ सादर केले. यातील ५ चित्ररथ हे लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील डांगेवाडी येथील शुभम हुलसुरे या कलाकाराने बनवले होते हे विशेष.



शुभम हा मुळचा निलंगयांचा रहिवासी आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण हे त्याचे मुळ गाव डांगेवाडी येथे झाले. त्यानंतर त्याने मुंबईतील प्रतिथयश अशा जे जे स्कुल ऑफ आर्टस मधून डिझाईनिंगचे उच्च शिक्षण घेतले आहे.

सध्या तो वडाळ्याच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना डिझाइनिंगचे धडे देतो. त्याची स्वताची डिझाइनिंग एजन्सी सुद्धा आहे. यामाध्यमातून तो फावल्या वेळेत महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांची कामे करतो. या क्षेत्रात काम करण्याचा त्याला तब्बल ५ वर्षांचा अनुभव आहे.

मागील ३ वर्षांत त्याने प्रजासत्ताक दिनाच्या पथसंचनलनासाठी विविध विभागांच्या ११ चित्ररथांची निर्मिती केली आहे.

यंदाच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित पथसंचलनात एकूण १८ विभागांनी आपले चित्ररथ सादर केले. त्यातील ५ चित्ररथ एकट्या शुभम हुलसुरे याने डिझाईन केले होते.

यात गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या संकल्पनेवर आधारित मृदा व जलसंधारण विभागाचा चित्ररथ, भूजल सर्वेक्षण व अटल भूजल योजनेवर आधारित पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे चित्ररथ, महाज्योती ज्ञानदीप समतेचा या संकल्पनेवर आधारित इतर मागास बहूजन कल्याण विभाग, नवीन तंत्रज्ञान व कौशल्य युक्त महाराष्ट्र यावर आधारित कौशल्य व नाविन्यता विभागाचा चित्ररथ तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला त्यावर आधारित अभिजात मराठी दर्जा हा मराठी भाषा विभागाचा चित्ररथ यांचा समावेश होता.